पुढील ग्रंथ

“ जीवितरहस्य अथवा जीवितार्चे कोडें ” ह
रा० सा० हरि गणेश गोडबोले, आत्मविद्या ग्रंथाचे
कर्ते, हे लिहीत आहेत. लवकरच छापण्यास सुरवात
होईल.

स० ग० दाभोळकर.

माझे प्रिय आणि पूज्य वडील बंधु

बाजी नारायण नाबर

(जे परलोकवासी होण्यापूर्वीं ठाणें हायस्कूलचे
हेड्मास्तर होते, व कांहीं वर्षांपूर्वीं पुणें एथें
दक्षिणाप्राइज् कामिटीचे सेक्रेटरी आणि
मराठी ट्रान्स्लेटर होते.)

ह्यांच्या

कर्तव्यनिष्ठा—सत्यप्रीति—सुजनता—प्रेमळ
व निरभिमानवृत्ति आदिकरून
गुणांचे स्मरणार्थ

हा ग्रंथ

मराठी भाषेचे अभिमानी यांस

सन्मानपूर्वक सादर केला आहे.

दत्तात्रेय नारायण नाबर.

प्रस्तावना

ज्या ग्रंथकाराच्या कृतीच्या आधारें हें पुस्तक रचिलें आहे त्याचें नांव मराठी वाचकांस "संसारसुख" ह्या पुस्तकाच्या द्वारें पूर्वींच विश्रुत आहे. मूळ ग्रंथ मीं सहज वाचावयास घेतला असतां मला तो इतका रम्य वाटला कीं त्याचें मराठी भाषांतर करावें अशी माझ्या मनास स्फूर्ति झाली. त्याप्रमाणें कांहीं भाषांतर मीं केवळ आपल्या मनाच्या हौसेकरितां म्हणून केलें. त्या वेळीं तें छापून प्रसिद्ध करावें अशी कल्पना माझ्या मनांत नव्हती. पण पुढें तें भाषांतर पुरें करून प्रसिद्ध करावें व आपल्या जन्मभाषेची यथामति सेवा करावी असा विचार मनांत येऊन मूळ ग्रंथकार सर जॉन लबक् ह्यांजपाशीं भाषांतराची परवानगी मागितली, व ती त्यांनीं आपल्या नेहमींच्या उदार स्वभावास अनुसरून मोठ्या खुषीनें दिली.

सर जॉन लबक् हे इंग्लंड देशांतील एक धनिक गृहस्थ आहेत. त्यांनीं मनांत आणिलें तर केवळ ऐषआरामांत रहाण्यासारखें त्यांचें वैभव आहे. तथापि आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें बजाविणें, व आपल्या देशबांधवांचें आपल्या हातून होईल तेवढें कल्याण करणें ह्यांतच त्यांना सौख्य वाटतें. ते आपली खासगी कामें संभाळून मोठमोठ्या सार्वजनिक कामांत निमग्न असतात. असें असून त्यांनीं आजपर्यंत नानाविध विषयांवर अत्यंत मनोहर आणि उपयुक्त अशीं वीस पुस्तकें लिहिलीं आहेत. व तीं

जगांत जेथें जेथें इंग्रजी भाषेचा प्रसार झाला आहे त्या सर्व देशांत फार लोकप्रिय होऊन त्यांच्या पुनःपुनः आवृत्त्या निघत आहेत. ह्या थोर गृहस्थांची योग्यता ध्यानांत आणून सरकारानें त्यांस मोठमोठे किताव दिले आहेत. व गेल्या वर्षीं त्यांस ब्यारन् ही पदवी देण्यांत आली. म्हणून ह्यापुढें ते लॉर्ड एव्हबरी ह्या नांवानें लोकांस माहीत होतील.

आपल्या जीविताविषयीं आपण विचार करूं लागलों म्हणजे दोन प्रश्न मनापुढें उभे राहतातः—पहिला, ह्या जगांत माझें काय कर्तव्य आहे ? दुसरा, ह्या संसारांत कांहीं सौख्य आहे किंवा नाहीं ? ह्यांपैकीं दुसऱ्या प्रश्नाचें उत्तर " संसारसुख (The Pleasures of Life) " ह्या ग्रंथांत दिलें आहे, व पहिल्याचें उत्तर प्रस्तुत* (The Use of Life) पुस्तकांत दिलें आहे. म्हणून हीं दोन्ही पुस्तकें एकाच ग्रंथाचे दोन भाग आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं.

ह्या पुस्तकांत मूळ ग्रंथाचा सर्व भावार्थ यथामति आणण्याचा प्रयत्न केला आहे. कांहीं ठिकाणीं देशकालवर्तमान ह्यांस अनुसरून अवश्य तो फेरफार करणें भाग पडलें आहे. उदाहरणार्थ, देशभक्ति ह्या प्रकरणांत केवळ भाषांतर करून निर्वाह लागला नसता. कारण मूळ ग्रं-

* जाहिरात प्रसिद्ध झाल्यावर व ग्रंथाचीं बरींच पृष्टें छापून झाल्यानंतर रा. रा. बाळ गंगाधर टिळक यांनीं ह्या ग्रंथास "संसारकर्तव्य" हें दुसरें नामाभिधान सुचविलें. तें यथार्थ आहे, आणि एका भागाचें नांव संसारसुख व दुसऱ्याचें संसारकर्तव्य ह्या योजनेला हि युक्त आहे, म्हणून मुखपृष्ठावर व बाइंडिंगचे कव्हरावर दोन्ही नांवांचा उल्लेख करण्यांत आला आहे. ब० ग० दाभोळकर.

थांत इंग्लंड देशास अनुलक्षूनच त्या विषयाचा विचार केला आहे. तो मराठी वाचकांसाठीं लिहिलेल्या पुस्तकांत सर्वथा अस्थानीं झाला असता. त्याचप्रमाणें दुसऱ्या कांहीं थोड्या स्थळीं मूळ ग्रंथाचें धोरण लक्षांत ठेवून नवीन मजकूर घालण्याचें धाष्टर्य निरुपायास्तव केलें आहे.

मूळ ग्रंथांत इंग्रजी कवींचीं पद्यें ठिकठिकाणीं घालून शोभा आणिली आहे. त्यांपैकीं बहुतेकांचा भावार्थ पद्यरूपानें मराठींत आणण्याचा प्रयत्न अल्पमतीनें केला आहे. व संस्कृत आणि प्राकृत ग्रंथांतील समानार्थक पद्यें अवलोकनांत आलीं तेवढीं घातलीं आहेत.

हें पुस्तक तयार करण्याच्या कामीं रा० रा० नारायण चिंतामण केळकर, बी. ए., श्रीनिवास त्र्यंबक द्रवीड, बी. ए., एलएल्. बी., व तुकाराम विठ्ठल ठाकूर ह्यांनीं साहाय्य केलें आहे, व रा० रा० दत्तात्रेय बळवंत पारसनीस ह्यांनीं कांहीं उपयुक्त सूचना केल्या आहेत, त्याबद्दल त्या सर्वांचा मी आभारी आहें. फ्रेंच व लॅटिन् भाषेंतील वचनांचा अर्थ करण्याच्या कामीं रेव्हरंड् मि० हेन्री ब्रूस ह्यांनीं मदत केली त्याबद्दल त्यांचे आभार मानणें जरूर आहे.

सरतेशेवटीं, मराठीभाषेचे निःसीम भक्त रा० रा० बळवंत गणेश दाभोळकर ह्यांनीं ह्या पुस्तकास आपल्या अमूल्य ग्रंथमालिकेंत स्थान देऊन त्याचा बहुमान केला, व प्रकाशनाचें काम चांगल्या रीतीनें तडीस नेलें, ह्याबद्दल त्यांचे आभार मानून ही प्रस्तावना पुरी करितों.

द० ना० नाबर.

दुसरी आवृत्ति.

पहिल्या आवृत्तींत राहिलेलीं अशुद्धें दुरुस्त केलीं आहेत; व क्वचित् स्थलीं थोडा नवीन मजकूर घातला आहे.

द० ना० नावर.

अनुक्रमणिका आणि प्रस्तावना.

(ओंवी–अर्ध)

प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थी पंचीकरण ॥

—रामदास

"ह्या जगांत माझें कर्तव्य काय आहे?" ह्याचें उत्तर हा प्रस्तुत ग्रंथांतील विषय असल्याबद्दल ग्रंथकर्त्यांनीं आपल्या प्रस्तावनेंत सांगितलेंच आहे. माझ्या मतें सर जॉन लवक् ह्यांनीं आपल्या विचारसरणींत ऐहिक आणि पारमार्थिक अशा दोन्ही दृष्टींनीं ह्या विषयाचें प्रतिपादन केलेलें आहे. प्रकरण १ ते १३ ऐहिक कर्तव्याविषयींचीं आहेत; आणि प्रकरण १४ ते १९ हीं पारमार्थिक विचाराचीं आहेत. आतां सर जॉन लवक् ह्यांचा विचारमालिका कशी सुरू होते तें पाहूं.

ह्या सृष्टीचें क्षणभर अवलोकन केलें असतां आपणांस असें दिसून येईल कीं आपण ह्या सर्वांचे अधिपति आहों. सकल स्थावरजंगमात्मक वस्तु आपणांकरितांच निर्माण झालेलें आहे. मग असें आहे तर, प्राणिमात्रांप्रमाणें प्रजोत्पादन करून लय पावणें एवढीच मनुष्यजन्माची इतिकर्तव्यता आहे, कीं जीवित सफल होण्यास श्रेष्ठ असें आपलें कांहीं संसारकर्तव्य आहे? मनुष्य लक्षांत घेईल तर हा अत्यंत महत्वाचा प्रश्न सकृद्दर्शनीं त्याच्या पुढें उभा राहील. (प्रकरण १–पृष्ठ १)

ह्या प्रश्नाचें उत्तर देऊं लागलों म्हणजे, ऐहिक दृष्टीनें विचार करतां, कोणतेंहि संसारकर्तव्य नीटनेटकें बजावितां येण्यास द्रव्याची प्रथमतः अपेक्षा दिसून येते. कारण द्रव्याच्या अनुकूलतेनें सर्व कांहीं साध्य होतें. मात्र तें सं-

पादन करण्यास व्यवहारचातुर्य आधीं असावें लागतें. (प्रकरण २–पृष्ठ ३५ व प्रकरण ३–पृष्ठ ५९)

पण व्यवहाचातुर्य हें नैसर्गिक आहे. तें मुद्दाम ओढून ताणून आणूं म्हटलें तरी त्यापासून व्हावा तसा कार्यभाग होणार नाहीं. म्हणून द्रव्यसंपादनाकरितां पुष्कळांना श्रमच करावे लागतील, आणि श्रम करणारास विश्रांतीची किंवा मनोरंजनाची अवश्यकता मागोमाग आलीच. (प्रकरण ४–पृष्ठ ८५)

आतां श्रम किती करावे आणि विश्रांति किती घ्यावी ह्याचा तरी मेळ पाहिजे. म्हणजे मनुष्यानें आपल्या आरोग्याकरितां जपलें पाहिजे. (प्रकरण ५–पृष्ठ १०९)

एथपर्यंत विचार झाल्यानंतर पुढें असें उघड होतें कीं मनुष्य कितीहि चतुर असला किंवा त्यानें कितीहि श्रम केले तरी त्याला एकट्याला द्रव्यसंपादनाचा मार्ग सुसाध्य होणार नाहीं. तो ज्या राष्ट्रदेहाचा अवयव असेल त्याची अवस्था जर उत्तम असेल, म्हणजे त्या राष्ट्राची सांपत्तिक स्थिति जर बरी असेल, तरच त्याला सर्वांबरोबर द्रव्यसंपादनाचा मार्ग सुखकर होईल. म्हणून राष्ट्रत्वाकरितां, त्याच्या उन्नतीकरितां, किंवा राष्ट्रीय शिक्षणाकरितां प्रत्येकानें आपणांकडून होईल तेवढा प्रयत्न केला पाहिजे. (प्रकरण ६–पृष्ठ १२७)

पुढें असा विचार होतो कीं, राष्ट्र म्हणजे अनेक व्यक्तींचा समुदाय, आणि त्या अनेक व्यक्तींपैकींच आपण एक, त्या अर्थीं राष्ट्रीय शिक्षण म्हणजे प्रत्येकाचें आत्मशिक्षणच होय. (प्रकरण ७–पृष्ठ १४५)

आतां आत्मशिक्षण हें वाचनानें प्राप्त होतें. म्हणजे मागच्यास ठेंच पुढचा शहाणा ह्या न्यायानें पूर्वींच्या लोकांच्या अनुभवाचें शिक्षण वाचनानें मिळतें. आणि तें गरिबांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वांस साध्य करून घेण्याचा पुस्तकालयें हा राजमार्ग असून, सांप्रतकालीं तो खुला आहे. (प्रकरण ८—पृष्ट १६२ व प्रकरण ९—पृष्ठ १७५)

वाचनाचा परिणाम देशभक्ति हा आहे. कै० महादेव गोविंद रानडे, श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाड हे देशभक्तीचे मूर्तिमंत पुतळे होते व आहेत. ते त्यांचें वाचन म्हणूनच होत. (प्रकरण १०—पृष्ठ १८७)

देशाविषयीं एकदां प्रीति उत्पन्न झाली म्हणजे प्रत्येक नागरिकाचें आपल्या देशाविषयीं काय कर्तव्य आहे हें मनांत येतें. (प्रकरण ११—पृष्ठ २०९) व आपण ज्या समाजांत राहतों त्या समाजाविषयींचें प्रेम दुणावून सामाजिकवर्तनाचा आळा आपणांला बसतो.(प्र. १२पृ. २२९)

अर्थातच देशाच्या कल्याणाकरितां मनुष्यानें, आपला अमोल वेळ फुकट दवडूं नये. देशभक्तीच्या उद्योगांत त्याचा अंत व्हावा. (प्रकरण १३—पृष्ठ २४९)

एवंच द्रव्य ह्या मध्यबिंदूपासून देशकल्याणाविषयीं सतत उद्योगापर्यंतच्या त्रिज्येनें जें वर्तुल काढितां येईल त्याच्या आंत संसारसंबंधी मनुष्याचें ऐहिक कर्तव्य संपतें. कारण देशभक्ति ही एकप्रकारें ईशभक्तिच आहे, आणि देशकार्यांत गढून जाणें ही ऐहिक दृष्टीनें परमेश्वराशीं तद्रूपताहि आहे. प्रस्तुत ग्रंथाचा पहिला भाग एथें पुरा होतो.

आतां उद्योगानें (तपानें) माणूस बुद्धिमान् होतो,

म्हणजे स्वयंजोति होतो. (पृष्ठ २९४ ह्यावरील टिपेंत* ह्याविषयीं मीं उल्लेख केला आहे.) ही ज्योति सदैव प्रकाशित राहण्याकरितां उद्योगाचे ठायीं **श्रद्धा** असली पाहिजे. पारमार्थिक दृष्टीनें परमेश्वरप्राप्तीचा निर्झर श्रद्धेपासून उगम पावतो. (प्रकरण १४—पृष्ठ २७१)

उद्योगाचे ठायीं श्रद्धा असावी, त्याप्रमाणेंच तो सदिच्छेनें, सद्धेतूनें किंवा सदाशेनें करावा; आणि प्राणिमात्रांच्या कल्याणाकरितां औदार्यानें म्हणजे **सुजनतेनें** करावा. (प्र० १५—पृष्ठ २८९ व प्र० १६—पृष्ठ २९९)

मात्र त्या सुजनतेची पात्रता अंगीं येण्यास **सद्वर्तन** आवश्यक आहे. इतकेंच नाहीं तर, परमेश्वरप्राप्तिरूप वर्तुलाचा तो मध्यबिंदुच आहे. (प्र० १७—पृष्ठ ३१३)

कारण सद्वर्तनानें **शांति** आणि **सौख्याचा** लाभ होतो. आणि हेंच मानवधर्माचें किंवा संसारकर्तव्याचें सार आहे. (प्रकरण १८—पृष्ठ ३३९ व प्रकरण १९—पृष्ठ ३५९—७६). एथें प्रस्तुत ग्रंथाचा दुसरा भाग पूर्ण होतो.

एकंदरीनें पाहतां, वित्तशुद्धीनें ऐहिकदृष्ट्या आणि चित्तशुद्धीनें पारमार्थिक दृष्ट्या परमेश्वरप्राप्ति करून घेणें हा मानवजीविताचा किंवा संसाराचा उद्देश होय, हा प्रस्तुत ग्रंथांतील विषयाचा इत्यर्थ आहे.

बळवंत गणेश दाभोळकर. प्रकाशक.

---

* हे स्वयंज्योति गृहस्थ **रा० रा० गणेश कृष्ण आपटे,** ता० १५ नवंबर १९१२ रोजीं परलोकवासी झाले. त्यांचेविषयीं माझी अत्यंत पूज्यबुद्धि असल्यामुळें त्यांचें निधनवृत्त एथें नमूद करून ठेवितों. **ब० ग० दा०.**

प्रकरण १

अत्यंत महत्त्वाचा प्रश्न

(ओंवी)

धन्य धन्य हा नरदेहो । एथील अपूर्वता पहा हो ॥
जो जो कीजे परमार्थ लाहो । तो तो पावे सिद्धीतें ॥ १

—रामदास

प्रकरण १

अत्यंत महत्त्वाचा प्रश्न

ह्या संसारांत आपणास पुष्कळ गोष्टी शिकावयाच्या आहेत. त्यांपैकीं अत्यंत महत्त्वाची गोष्ट ह्या जगांत कसें रहावें ही होय. लोक आपल्या जीविताच्या संरक्षणासाठीं जितकी काळजी वाहतात तितकी दुसऱ्या कशाचीहि वहात नसतील. पण तें जीवित उन्नत आणि सफल होण्याकरितां मनापासून खटपट करणारे लोक फार थोडे असतात.

जीवित सफल करून घेणें ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. हिपॉक्रेटिस् ह्यानें आपल्या वैद्यक ग्रंथाच्या आरंभीं असें म्हटलें आहे कीं " आयुष्य अल्प आहे, ज्ञान अनंत आहे; अनुकूल समय थोडे व चंचल आहेत; अनुभवजन्य ज्ञान संशयात्मक आहे. व सत्य अनुमान फार कठिण आहे. " एका संस्कृत कवीची अशाच अर्थाची उक्ति आहे:—

(श्लोकार्ध)

*अनंत पारं किल शब्दशास्त्रं । स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः ॥

—सुभाषित

(श्लोकार्ध)

* शास्त्रें फार अपार जीवित तुझें अत्यल्प कीं मानवा ।
तेंही विघ्नशताभिभूतचि असे नाहींचरे वानवा ॥

ह्या जगांत सुख आणि यश ह्या दोहोंची प्राप्ति आ-ह्मां मनुष्यांच्या स्थितीपेक्षां देखील कृतीवर जास्त अ-वलंबून आहे. मनुष्याच्याच कृतीमुळें असंख्य लोकांचा नाश झालेला आहे. पंचमहाभूतांकडून नाश पावलेले लोक त्या मानानें फार कमी असतील. मनुष्यांच्या हातून जित-क्या घरांदारांचा व शहरांचा विध्वंस झाला आहे त्या मानानें वादळ व धरणीकंप ह्यांनीं केलेला नाश कांहींच नाहीं. नाश दोन प्रकारचे आहेत. एक कालगतीमुळें झालेला व दुसरा मनुष्यांच्या कृतीनें झालेला.

मनुष्यकृतीनें होणारा नाश सर्वांत भयंकर आहे. व मनुष्याचे अत्यंत दुष्ट शत्रू मनुष्याच्याच हृदयांत वास करितात.

" आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैवरिपुरात्मनः "

ह्या गीतावाक्यांत सांगितल्याप्रमाणें आपलें हित किंवा अहित करून घेणें हें आपल्या स्वाधीन आहे. पुष्कळ लोक इतरांस दुःख देण्याचाच धंदा करितात, अथवा अशा प्रकारचे धंदे करितात कीं त्यांपासून दुसऱ्यांस त्रासच होतो. तारुण्याच्या धुंदींत मनुष्याच्या हातून अनन्वित कर्में घडतात आणि वृद्धपणीं त्यांचा त्याला पस्तावा हो-तो पण मग पस्तावा होऊन काय उपयोग ? जी गोष्ट एकदां झाली ती कांहीं केल्यानें नाहींशी होणार नाहीं. मनुष्यें स्वार्थ साधण्याच्या नादांत शहाणपणास अगदीं रजा देतात. त्यामुळें त्यांचा स्वार्थहि साधत नाहीं व त्यांच्या हातून इतरांचें नुकसान होतें.

(ओंव्या)

कडाडीं लोटला गाडा । कां शिखरौनी सुटला धोंडा ॥
तैसा न देखे जो पुढां । वार्धक्य आहे ॥ १
कां आड वोहळा पाणी आलें । कां जैसें म्हैसयाचें झुंज माजलें ॥
तैसें तारुण्याचें चढलें । भुररें जया ॥ २
न करावें तें करी । असंभाव्य मनीं धरी ॥
चिंतू नये तें विचारी । जयाची मति ॥ ३
रिघे जेथ न रिघावें । मागे जें न घ्यावें ॥
स्पर्शे जेथ न लागावें । अंग मन ॥ ४

—ज्ञानेश्वरी

मनुष्याला ह्या जगांत अनेक प्रकारचीं संकटें व दु:खें प्राप्त होतात, ही गोष्ट खरी आहे. परंतु पुष्कळ दु:खें टाळण्यासारखीं असून लोक तीं टाळीत नाहींत, व पुष्कळ सौख्य मिळण्यासारखें असून तें मिळवीत नाहींत. म्हणून मनुष्यास होणाऱ्या दु:खांसंबंधानें बऱ्याच अंशीं तो स्वत:च दोषास पात्र असतो; व त्यामुळें तर मनास अधिकच उद्वेग होतो; कारण

(आर्या)

जिव्हेनें उक्त तसे लेखनिनें लिखित शब्द बहु असती ॥
" करितां, झालें असतें " यांसम दु:खद दुजे न मज दिसती ॥ १

—व्हिटियर

पुष्कळ वेळां असें घडतें कीं, ज्या गोष्टी आपण वाईट समजतों त्या मूळच्या कांहीं वाईट नसतात. चांगल्या गोष्टींचा दुरुपयोग किंवा अतिरेक झाल्यामुळें त्या वाईट होतात. यंत्रांतलि एकादें चक्र योग्य ठिकाणीं असतें, तोंपर्यंत तें सुरळीत चालतें. परंतु तें स्वस्थानापा-

सून यत्किंचित् हाललें तर सर्व यंत्राचा विघाड होतो. त्याचप्रमाणें आपण सृष्टिनियमाच्या विरुद्ध वागूं लागलों म्हणजे आपणास दुःख भोगावें लागणें हें साहजिकच आहे. धैर्य हा गुण चांगला आहे. पण त्याचाच अतिरेक झाला तर विवेकशून्यता होते. प्रेमाचा अतिरेक झाला तर मानसिक दुर्बलता येते. मितव्ययाचा अतिरेक झाला म्हणजे लोभ होतो. जी गोष्ट एकाला अमृतप्राय आहे, तीच दुरुपयोगामुळें दुसऱ्याला विषप्राय होते. सृष्टिनियम आहेत त्याहून भिन्न असते तर चांगलें झालें असतें, असें कोणाच्यानें म्हणवणार नाहीं. कोणी मनुष्य पडला आणि त्याचा पाय मोडला तर हा त्याच्या निष्काळजीपणाचा परिणाम होय. त्याबद्दल गुरुत्वाकर्षणाच्या नियमास दोष देण्यांत काय अर्थ आहे? गुरुत्वाकर्षणाच्या नियमांत फेरफार केल्यानें हल्लींपेक्षां चांगली स्थिति प्राप्त होईल असें मुळींच नाहीं.

आपलीं बहुतेक दुःखें आपल्याच दोषांमुळें आपणांस प्राप्त होतात. आपल्या हातून दोन प्रकारचे दोष घडण्याचा संभव असतो. एकादी गोष्ट नीतीविरुद्ध किंवा अयोग्य आहे असें कळत असून ती केल्यामुळें होणारे दोष हे एका प्रकारचे होत; व आपल्या अज्ञानामुळें व गैरसमजुतीमुळें होणारे हे दुसऱ्या प्रकारचे होत. ह्यांपैकीं पहिले दोष आपल्या हातून घडूं नयेत म्हणून आपणास आपली हृदयस्थ सद्बुद्धि नेहमीं सांगत असते. असें असून तिचें न ऐकतां जर ते प्रमाद आपण केले तर ते जाणून बुजून केले असें म्हटलें पाहिजे.

(श्लोक)

यत्कर्म कुर्वतोऽस्य स्यात्परितोषोंऽतरात्मनः ॥
तत्प्रयत्नेन कुर्वीत । विपरितं तु वर्जयेत् ॥ १

—मनु

भावार्थः–आपल्या अंतरात्म्यास जें केल्यानें संतोष वाटेल तें कृत्य प्रयत्नानें करावें, व त्याच्या उलट प्रकारचें कृत्य आपल्या हातून होऊं नये अशी खबरदारी घ्यावी.

दुसऱ्या प्रकारचे दोष टाळण्याकरितां आपली विचारशक्ति, आपल्या वडिलांची व मित्रांची सल्ला, व आपलें शिक्षण ह्यांची मदत घेतली पाहिजे. आपलें शिक्षण चांगलें होण्याविषयीं आपण फार काळजी घेतली पाहिजे. आपणां सर्वांस आमरणान्त निदान एका शिष्यास तरी शिकविणें भाग आहे. तो शिष्य दुसरा कोणी नाहीं, तर स्वतः आपणच होय.

मनुष्य स्वतःच्या प्रयत्नानें जें शिक्षण मिळवितो तें जसें त्याच्या अंगीं बाणून जातें, तसें दुसऱ्याचें शिक्षण बाणत नाहीं. पुष्कळांची अशी कल्पना असते कीं, शाळा सोडली म्हणजे आपलें शिक्षण संपलें. पण खरोखर म्हटलें तर त्यावेळीं शिक्षणास कोठें नुकती सुरुवात होते व मनुष्य मरेपर्यंत तें चालूच असतें. सेनेका म्हणतो, “ लोक आपल्या बुद्धीचा जर चांगला उपयोग करितील, आणि सुख मिळण्याकरितां जशी खटपट करितात त्याप्रमाणें सद्गुण संपादण्याकरितां करितील, तर किती तरी कल्याण होईल बरें ! ”

आमच्या ह्या हिंदुस्थान देशांत प्राचीन काळापासून दैवावर भरंवसा ठेवण्याचा प्रघात चालत आला आहे.

दैववादी लोकांना असें वाटतें कीं, पुढें होणाऱ्या सर्व गोष्टी ठरलेल्याच असतात आणि मनुष्यानें कांहीं केलें तरी होणार तें कांहीं चुकत नाहीं.

(श्लोक)

यदभावि न तद्भावि । भावि चेन्न तदन्यथा ॥
इति चिंताविषघ्नोऽयं । अगदः किं न पीयते ॥ १

—हितोपदेश

भावार्थः—

(आर्या)

होणार तें चुकेना, होणार न जें घडे कदा तें न ॥
चिंताविषशामक हें औषध ऐसें किमर्थ सेविसि न ॥ १

ह्या लोकांना असें वाटतें कीं, मनुष्यप्राणी हे केवळ ईश्वरानें आपल्या खेळाकरितां निर्मिलेल्या कळसूत्री बाहुल्या आहेत. आतां हें मत खरें आहे कीं काय? जीवितासंबंधानें कांहीं सिद्धांत आपणास ठरवितां येतील कीं नाहींत? व संसारसागरांतून आपली नाव इष्ट दिशेनें चालविण्याची शक्ति मनुष्याच्या अंगीं आहे किंवा नाहीं? अथवा ती नाव जिकडे यदृच्छेनें जाईल तिकडे मनुष्यास जाणें भाग आहे? आमच्या मतें ह्या प्रश्नांचें उत्तर अगदीं उघड आहे: मनुष्यप्राणी हा कळसूत्री बाहुलीप्रमाणें नसून त्याच्या अंगीं पराक्रम आहे, व आपली स्थिति बरी-वाईट करून घेण्याचें सामर्थ्यहि आहे. जर मनुष्याची स्थिति चांगली नसली तर हा त्याचाच दोष आहे. एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे कीं,

(श्लोकार्ध)

उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ।

दैवेन देयमिति का पुरुषा वदन्ति ॥

—हितोपदेश

भावार्थः—

(आर्या)

उद्योगी नरसिंहा लक्ष्मी येउनि स्वयेंचि कीं वरिते ।
दैवचि देणार असें वदती पुरुषार्थहीन केवळ ते ॥ १

आतां, जर आपली भावी स्थिति चांगली-वाईट करण्याचें आपल्या हातांत आहे, तर ह्या जगांत आपणास काय कर्तव्य आहे व ह्या जीविताचें उत्तम सार्थक कोणत्या रीतीनें होईल ह्याचा प्रथम विचार केला पाहिजे. कांहीं लोकांस ह्या जगांत आपणास कांहीं कर्तव्य आहे असें वाटत नाहीं; म्हणून त्यांच्या सर्व क्रिया आणि आचरण ह्यांत कांहीं धरबंद नसतो. कांहीं लोक ह्या जगांत आपलें कर्तव्य ओळखितात आणि आपलें आचरण त्या कर्तव्याच्या अनुरोधानें ठेवितात. आपलें पहिलें कर्तव्य म्हटलें म्हणजे आपणामध्यें जी सत्कार्यशक्ति आहे तिचा अपव्यय होऊं न देतां, तिच्याकडून जेवढें कार्य घडण्यासारखें आहे तेवढें उत्तम रीतीनें करून घेणें हें होय.

हंबोल्ट म्हणतो, “ प्रत्येक मनुष्यानें आपल्या सर्व गुणांचा उत्तम विकास होईल, आणि आपली सर्व बाजूंनीं उन्नत अवस्था होईल असा यत्न करावा. ” पण हा यत्न केवळ स्वार्थबुद्धीनें करितां कामा नये. कारण तशा बुद्धीनें केल्यास त्यांत मुळींच यश येणार नाहीं हें खास समजावें. बेकन म्हणतो, “ स्वतःचें हित साधणें हा ह्या जीवितास शोभण्यासारखा हेतु नाहीं. ” बुद्ध,

प्लेटो, आरिस्टाटल, सेंटपाल, ज्ञानदेव, तुकाराम, ह्यां-सारख्या अत्यंत थोर पुरुषांनीं जी आत्मोन्नति करून घे-तली, ती स्वार्थ साधण्याकरितां नव्हे. केवळ स्वार्थ साधून त्यांना कधींहि संतोष झाला नसता. ह्यावरून आ-पली उन्नति करावयाची ती परहिताकरितां करावयाची हें उघड आहे. अशा दृष्टीनें पाहिलें असतां आपलें आयुष्य अत्यंत मनोहर आहे असें दिसून येईल. स्वार्थ-लंपट मनुष्याच्या आयुष्यांत कांहीं मौज नाहीं, कारणः—

(श्लोक)

दानेन पाणिर्नतु कंकणेन । श्रोत्रं श्रुतेनैव न कुंडलेन ॥
विभाति काया करुणापराणां । परोपकारैर्नतु चंदनेन ॥ १

—भर्तृहरि

भावार्थः—

(श्लोक)

श्रुतेंचि कीं श्रोत्र न कुंडलानें । दानेंचि कीं पाणि न कंकणानें ॥
साजे तसा देहहि हा न आनें । परोपकारें नच चंदनानें ॥ १

—**वामन**

ज्याप्रमाणें एकाद्या मनुष्यास श्रीमंत होण्याची इच्छा असल्यास आपला आदा आणि खर्च काय आहे हें पहाणें जरूर आहे, त्याचप्रमाणें आत्मोन्नति करण्याची ज्याला इच्छा आहे त्यानें नेहमीं आत्मपरीक्षण कर-ण्याची संवय ठेविली पाहिजे. “ तूं स्वतःची ओळख करून घे ” अशा अर्थाचें ग्रीक भाषेंत एक वचन आहे. व संस्कृत ग्रंथांतहि आत्मज्ञानाचें महत्त्व फार वर्णिलें आहे.

(श्लोक)

नानाशास्त्रं पठेल्लोके । नानादैवतपूजनम् ॥

आत्मज्ञानं विना पार्थ । सर्वं कर्म निरर्थकम् ॥ १

—उत्तरगीता

भावार्थः—मनुष्य नाना शास्त्रांचें पठण करो, किंवा नाना दैवतांची पूजा करो; आत्मज्ञानावांचून सर्व खटपट व्यर्थ आहे.

ह्यावरून आपणा स्वतःची ओळख आपण करून घेणें हें काम जसें फार महत्त्वाचें आहे, तसेंच कठिणहि आहे असें दिसून येईल. **मॉंटेन** म्हणतो,

" ' अहं ' ह्या व्यक्तीसारखा राक्षस किंवा अद्भुत पदार्थ ह्या जगांत अद्यापि माझ्या पाहण्यांत आला नाहीं."

सर **टी. ब्राउन** नामक एका विख्यात इंग्रजी ग्रंथकाराचे आयुष्यांत विशेष महत्त्वाची किंवा चळवळीची अशी एकहि गोष्ट घडली नाहीं. परंतु त्याला आत्मज्ञान करून घेण्याची संवय असल्यामुळें त्याचें आयुष्य किती मनोरंजक झालें तें पहा ! तो म्हणतो, " माझ्या आयुष्याचीं तीस वर्षें म्हणजे केवळ चमत्कारपूर्ण अशीं मला वाटतात. त्यांची हकीकत सांगितली असतां ऐकणारास ती इतिहासासारखी न वाटतां कवितारूप व काल्पनिक भासेल. "

(श्लोक)

प्रत्यहं प्रत्यवेक्षेत । नरश्चरितमात्मनः ॥
किं नु मे पशुभिस्तुल्यं । किं नु सत्पुरुषैरिति ॥ १

—सुभाषित

भावार्थः—प्रति दिवशीं मनुष्यानें आपल्या वर्तनाचें निरीक्षण करावें, व तें पशूंच्याप्रमाणें होत आहे किंवा सत्पुरुषांच्या प्रमाणें होत आहे हें पहावें.

दुसऱ्यांनीं केलेला उपदेश आजपर्यंत कोणास आ-

वडला नाहीं. तथापि जे पहिल्या प्रथम फुकटची सल्ला घेणार नाहींत, त्यांना कधीं ना कधीं तीच सल्ला पश्चात्तापाच्या रूपानें भारी किंमतीस विकत घ्यावी लागेल. म्हणून ज्याला ह्या जगांत कांहीं कर्तव्य आहे, व ह्या आयुष्याचें सार्थक करून घ्यावयाचें आहे, त्याला कांहीं उपयुक्त सूचना कराव्या हाच ह्या ग्रंथाचा मूळ उद्देश आहे.

सत्कार्य करण्याची सोन्यासारखी संधि आली असतां मनुष्यें ती कशी दवडून टाकतात, ह्याचा विचार केला असतां अत्यंत खेद वाटल्यावांचून रहाणार नाहीं. जिच्या योगानें हजारों गोरगरीबांस सुखी करितां आलें असतें अशी सामग्री हातीं असूनहि तिचा व्यर्थ अपव्यय करणारे लोक थोडे आहेत काय ?

आपण ज्या सुखांचा उपभोग घेतो तीं सुखें सत्य आहेत किंवा मिथ्या आहेत ह्याचा आपण विचार केला पाहिजे, व जीं मिथ्या सुखें आहेत त्यांचा त्याग केला पाहिजे. पुष्कळ गोष्टी सुख ह्या नांवानें मोडतात एवढ्याच कारणावरून त्या आपण करितों. पण त्यांनाच जर दुसरें कांहीं नांव दिलें तर त्यांचा आपणास तिटकारा वाटेल. कांहीं उपयुक्त काम केल्याशिवाय वेळ घालविणें ह्यांतच कितीएकांस सुख आहे असें वाटतें. जो मनुष्य निरुद्योगी असतो त्याचें " सुखाचें शरीर " आहे, असें म्हणण्याचा परिपाठ आहे. कितीएकांस असें वाटतें कीं सौख्य काय तें पंचेंद्रियांचेंच होय. मानसिक आनंदाची त्यांना कल्पनाच नसते. पण

खरोखर म्हटलें असतां मानसिक सौख्य शारीरिक सुखापेक्षां अधिक सरस आणि टिकाऊ असतें.

आपण आपल्या शरीराची हयगय करितों. कधीं कधीं बेपर्वाईनें शरीरास अपाय करून घेतों पण शरीर एक वेळ बिघडल्यावर आपल्या हातून काय काम होणार आहे? आपले मानसिक व्यापार सुरळीत चालणें हें देखील शरीराच्या सुस्थितीवर अवलंबून आहे. कलाकौशल्याचे पदार्थ पाहून आपणास किती मौज वाटण्यासारखी आहे? पण मुंबई शहरांतील कितीसे लोक तेथील चित्रशाळा पहाण्यास जात असतील? शास्त्रीय चमत्कारांपासून होणारा आनंद अनुभविण्यास आपण आपल्या अंगीं पात्रता आणीत नाहीं. अजबखाना पहाण्यास जाणारे कितीसे लोक असतील? व तेथील चमत्कारिक वस्तु पाहून खरा आनंद पावणारे कितीसे लोक आहेत? ज्या पृथ्वीवर आपण राहतों व ज्या आकाशाचें आपल्यावर छत आहे, त्यांतील अनंत सुंदर वस्तु व बहुविध चमत्कार ह्यांपासून होणाऱ्या उत्कृष्ट आनंदाचा लाभ आपण घेत नाहीं. संगीताचा आपण बराच उपभोग घेतों. तरी पण ती कला आपल्या देशांत दुर्गुणी लोकांच्या हातीं अधिक गेल्यामुळें संगीताचा आनंद आपणास व्हावा तसा होत नाहीं. आपण मनुष्यें विचारवंत आहों. पशूंना केवळ उपजतबुद्धि मात्र असते. आह्मी त्यांच्यापेक्षां फार श्रेष्ठ आहों असा आह्मी गर्व वाहतों. पण आमच्या विचारशक्तीच्या योगानें आह्मीं मनुष्यजातीच्या सुखांत कितीशी भर घातली आहे

बरें? कितीएकांच्या मतें तर विचारशक्तीपासून मनुष्यें सुखापेक्षां दु:खच अधिक भोगतात. मनुष्यें व्यर्थ काळजीनें झुरणीस लागतात. पण पशु आपणास मुळींच त्रास करून घेत नाहींत. "वाजे पाऊल आपुलें। म्हणे मागें कोण आलें ॥" ह्या न्यायानें भलत्याच शंका, भलत्याच प्रकारचें भय, व भलतीच काळजी मनांत आणून मनुष्य आपणास कष्टी करून घेतो. ह्या जगांत पुष्कळ गोष्टींचा आपणास खुलासा होत नाहीं, म्हणून त्याबद्दल विनाकारण त्रासून उपयोग नाहीं.

चिंतेनें आपणास व्यापून घेणें जरी इष्ट नाहीं, तरी पण अगदींच बेफिकीर रहाणें हेंहि चांगलें नाहीं. आपण नेहमीं सावधगिरीनें वागलेंच पाहिजे. ज्या कामांत आपल्या हातून मुळींच चूक होणार नाहीं अशी खातरी आहे त्यांत देखील सावधपणा ठेविला पाहिजे. लॉर्ड चेस्टरफील्ड म्हणतो, "आपल्या सद्गुणांचा उपयोग करण्यांतच जास्त खबरदारी ठेवण्याची जरूर असते. दुर्गुण टाळण्यास तेवढ्या सावधपणाची जरूर नाहीं. कारण दुर्गुणाचें खरें स्वरूप इतकें ओंगळ आहे कीं तें पहातांच आपणास त्याची किळस वाटण्यासारखी आहे. परंतु दुर्गुण बहुधा सद्गुणाचें सोंग घेत असतो व म्हणूनच आपण त्याच्या मोहांत पडतों." आपल्या सर्वांच्या पहाण्यांत असे पुष्कळ लोक येतात कीं त्यांच्यामध्यें बरेच चांगले गुण असून ते हळूहळू निर्दय आणि पाषाणहृदयी बनतात. लार्ड पामर्स्टन ह्याचें असें म्हणणें होतें कीं, "सर्व मुलें जन्मतात तेव्हां चांगलींच असता-

त." ह्या त्याच्या म्हणण्यावर बरीच टीका झाली होती. परंतु कसेंहि असलें तरी एवढी गोष्ट निर्विवाद आहे कीं, कोणीहि मनुष्य पक्का दुष्ट बनावयास बराच काळ लागतो.

"जगांत मनुष्यावर दुर्गुणाचा पगडा बसतो ही मोठी वाईट गोष्ट आहे ह्यांत संशय नाहीं पण त्यांतल्या-त्यांत सुदैवाची गोष्ट ही आहे कीं, आपला मूळचा स्वभाव बदलून आपणास पक्के दुष्ट होण्यास बराच अवकाश लागतो व बरीच खटपट करावी लागते. आपण सद्गुणापासून पतन पावतों पण आकाशांतील उल्कांप्रमाणें आमचा अधःपात एका क्षणांत होत नाहीं."[१]

आतां व्यक्तीला क्षणभर सोडून एकंदर मनुष्य जातीकडे वळलें असतां किती असंख्य सुखसाधनांची हेळसांड आपणाकडून होत आहे हें दिसून येईल. न्यूटन ह्यानें आपल्या सर्व शोधांअंतीं आपल्या अज्ञानाविषयीं जे उद्गार काढले, तेच उद्गार हल्लीं देखील मनुष्यजातीस लागू पडण्यासारखे आहेत. आपण सर्व मनुष्यें समुद्रकिनाऱ्यावर खेळणाऱ्या लहान मुलांप्रमाणें आहोंत. मुलांना जशी एकादी चकचकीत शिंप सांपडावी किंवा समुद्रांतील एकादी चमत्कारिक वनस्पति भरतीच्या वेगानें किनाऱ्यास लागलेली सांपडावी, तद्वत् आह्मांस आजपर्यंत लागलेल्या शोधांची स्थिति आहे. पण ज्ञानाचा जो अफाट महासागर तो आह्मापुढें तसाच असून त्यांतील अनंत अमोलिक रत्नांचा शोध अद्यापि झालेला नाहीं. असा एकहि पदार्थ नाहीं कीं ज्याचे एकंदर गु-

१. सर टी. ब्राउन्

णधर्म आपणांस कळले आहेत. आपण निर्वाहाकरितां रात्रंदिवस खपतों. पण सृष्टींतील निरनिराळ्या शक्ति व जड पदार्थांचे गुणधर्म हे हल्लीं आपणांस कळता-त त्याहून जरा जास्त कळतील तर आपल्या निर्वाहाची योग्य सामग्री एक दोन तासांच्या श्रमानें मिळवितां येईल, आणि आपल्या मनाची उन्नति व गुणांचा विकास क-रण्यास आपणांस हवी तेवढी फुरसद सांपडेल. वाफे-च्या शक्तीचा उपयोग जेवढा होण्यासारखा आहे ते-वढा अद्याप आपणांस करून घेतां येत नाहीं. विजेचा उपयोग आपल्या बाळपणांत फारसा ठाऊक नव्हता; व हल्लीं नुकता कोठे समजूं लागला आहे. नद्यांच्या जलौघाची शक्ति अजून बहुतेक फुकट जात आहे. श-स्त्रप्रयोगाच्या दुःसह वेदना नष्ट करणारें औषध जर पूर्वींच सांपडलें असतें तर किती मनुष्यांच्या व जना-वरांच्या यातना चुकल्या असत्या! अशा प्रकारचीं उ-दाहरणें देऊं लागल्यास एक मोठा स्वतंत्र ग्रंथ होईल. ह्यावरून आणखी लक्षावधि शोध होण्यासारखे आहेत ह्याबद्दल कोणाला शंका वाटणार नाहीं. व ते शोध क-दाचित् आपल्या नजरेच्या आटोक्यांतले देखील असती-ल. ह्याप्रमाणें ज्ञानाच्या महासागराचें मंथन करणें हें जें सर्व जगास अत्यंत कल्याणकारक काम, तें तसेंच पडून राहिलें आहे. असें असून जीं राष्ट्रें आपणांस ख्रि-स्तानुयायी म्हणवितात तीं एकमेकांचा नाश करण्यांत व जमिनीसाठीं पशूंप्रमाणें झगडण्यांत अगणित द्रव्या-चा चुराडा करितात हें मोठें आश्चर्य नव्हे काय?

मागच्या पिढीच्या वेळीं मुलांस लिहिणें वाचणें शिकविण्याची जरूर आहे असें लोकांस वाटत नसे. व हल्लीं देखील शेंकडा ९० मुलांस लिहितां वाचतां येत नाहीं. असें असून शिक्षण फार होत आहे अशी ओरड करणारे लोक आहेतच. ह्या ओरड करणारांपैकीं कांहींच्या म्हणण्याचा खरा भावार्थ असा असतो कीं जें शिक्षण मिळतें तें लोकांच्या स्थितीस अनुरूप असें नाहीं. हें म्हणणें कांहीं अंशीं खरें आहे. कांहीं लोकांस मुलांच्या शिक्षणार्थ खर्च करावासा वाटत नाहीं. पण त्यांना असें समजत नाहीं कीं आज्ञानापासून होणाऱ्या नुकसानीपुढें शिक्षणाचा खर्च कांहींच नाहीं. हल्लीं बहुतेक मुलांस शिक्षण मिळण्याची सोय झाली आहे. परंतु शिक्षणपद्धति ज्या प्रकारची असावी त्या प्रकारची नाहीं. एथें ह्या विषयासंबंधानें विशेष चर्चा करणें अप्रासंगिक होईल. परंतु एवढें तरी सांगणें जरूर आहे कीं, आमच्या शाळांमधून नैतिक शिक्षणाची अगदीं हयगय होते. ह्यामुळें कांहीं वाईट परिणाम झाले आहेत. उदाहरणार्थ कित्येकांची अशी कल्पना झालेली दिसते कीं " नीतिविरुद्ध कांहीं आचरण घडल्यास तें अयोग्य आहे हें खरें, व त्यापासून कदाचित् इतर लोकांस त्रास होईल; पण तें करणारास निदान ह्या जन्मांत तरी अधिक सुखाचा व समृद्धीचा लाभ होईल. त्याचप्रमाणें विषयासक्ति, अनियमित वर्तन, लोभ, आलस्य इत्यादि दुर्गुण कितीहि निंद्य असले तरी त्यांपासून फार झालें तर इतर मनुष्यांचें नुकसान होईल, पण

आपली स्वतःची तरी चैन होईल. कोणालाहि काय, आपल्या स्वतःपुरतें पाहिलें असतां सुख आणि स्वस्थता ह्यांशिवाय दुसरें काय पाहिजे? सद्वर्तन, परोपकार इत्यादि गोष्टी फार चांगल्या व प्रशंसनीय असतील, पण त्यांच्यासाठीं आपणास सभ्य प्रकारच्या मौजा देखील टाकून द्याव्या लागतील, व सारा जन्म स्वार्थत्यागांतच घालवावा लागेल."

(श्लोक)

वृथा चिंताडोहीं अहह बुडुनि नित्य खपणें ।
वृथा गोपवृत्ती धरुनि लघु कर्मींहि करणें ॥
वृथा वाग्देवीची अनवरत सेवा, वद खरें ।
प्रियेसंगें कुंजीं वसुनि रमणें श्रेष्ठ न वरें? ॥ १*

पण खरोखर पाहिलें असतां, ही त्यांची कल्पना किती मिथ्या आहे बरें! दुर्गुणापासून मनुष्यास स्वतंत्रता व स्वस्थता मिळते हें म्हणणें अगदीं खोटें आहे, एवढेंच नाहीं तर, दुर्गुणी मनुष्यास ज्याःधन्यांच्या गुलामगिरींत राहावें लागतें त्यांसारखे दुष्ट धनी त्रिभुवनांत नसतील. हे धनी कोण म्हणाल तर त्याचेच अंतःकरणांतील कामादिक षड्रिपु हे होत.

तसेंच कितीएक तरुण लोकांस असें वाटतें कीं, दुर्व्यसन हें पुरुषार्थाचें लक्षण आहे. पण तसें म्हणावें तर अगदीं दुबळे आणि मूर्ख लोक देखील दुर्व्यसनी असूं शकतात. खरोखर म्हटलें तर सद्गुणी होण्यासच पुरुषार्थाची जरूर आहे. सद्गुणी मनुष्यच खरोखर स्वतं-

---

* मिल्टनचें लिसिडस नामक काव्य

त्र असतो. दुर्व्यसन म्हणजे गुलामगिरीच होय. ज्या वर्तनाच्या योगानें मनुष्याची अवनति होते तें वर्तन नीतिविरुद्ध आहे असें आपण म्हणतों. पण असें समजा कीं, लोकांच्या नैतिक कल्पनांमध्यें कांहीं विलक्षण फेरफार होऊन ज्याला आज दुर्वर्तन म्हणतात त्याला उद्यां सद्वर्तन हें नांव मिळालें, तरी त्या वर्तनापासून मनुष्याचें सुख व शांति ह्यांचा नाश पूर्वींप्रमाणें होणारच. म्हणून अमुक एक प्रकारचें वर्तन मनुष्याची अवनति करितें, ह्याचें कारण त्याला लोक दुर्वर्तन म्हणतात हें नव्हे; तर उलट पक्षीं तें वर्तन अवनति करणारें असतें म्हणून त्याला दुर्वर्तन म्हणतात.

दुःख आणि दुराचरण ह्यांचा निकट संबंध आहे असें दाखविणारीं वचनें धर्मग्रंथांमध्यें पुष्कळ आहेत. पण ह्या विषयावर लौकिक व्यवहारांत निष्णात अशा एका मनुष्याचें मत दिलें असतां अधिक प्रासंगिक होईल असें वाटतें. लॉर्ड चेस्टरफील्ड ह्यानें आपल्या मुलास पाठविलेल्या एका पत्राच्या शेवटीं म्हटलें आहेः—"माझ्या मुला, सद्गुणापासून मोठमोठे लाभ होतात. व जर तुला मोठेपणा व सुजनता मिळवावयाचीं असतील तर तूं सद्गुणी मनुष्यांचा कित्ता वळीव. तोच सुखप्राप्तीचा खरा मार्ग आहे."

प्रसिद्ध फ्रेंच तत्त्ववेत्ता डेकार्ट ह्यानें आपल्या वर्तनासंबंधानें चार नियम केले होतेः—पहिला, ज्या धर्मांत व ज्या कायद्याच्या अमलाखालीं आपण लहानाचे थोर झालों तो धर्म व ते कायदे पाळणें. दुसरा, जेव्हां

कोणतेंहि कृत्य करण्याचा प्रसंग येईल तेव्हां चांगला विचार करून तावडतोब तें करणें व परिणामाबद्दल खंती न बाळगणें. तिसरा, आपल्या इच्छा तृप्त करण्याचा प्रयत्न न करितां त्यांचें दमन करणें ह्यांतच सौख्य समजणें. चौथा, सत्यशोधन हा आपला नित्यव्यासंग समजून त्यांतच सारा जन्म घालविणें.

लिली ह्यानें आपल्या एका ग्रंथांत उपदेश केला आहे:—“ रात्रीं लवकर निजावें आणि पहांटेस पक्षी उठतात तेव्हां उठावें. आनंदी वृत्ति ठेवावी पण विनय सोडूं नये. गंभीरपणानें वागावें पण अगदींच उदास होऊं नये. धैर्य धरावें पण अविचारी होऊं नये. आपला पोषाख नीटनेटका ठेवावा. आहार परिमित व पथ्यकर असा ठेवावा. आपले मनोरंजनाचे विषय अपायकारक नसावे. कारणावांचून कोणावर विश्वास ठेवूं नये व अविश्वासहि धरूं नये. त्याचप्रमाणें अंधपणें ज्याच्या त्याच्या तंत्रानें वागूं नये.* आपल्याच मतासंबंधानें विनाकारण दुराग्रह धरून बसूं नये. देवाची सेवा करावी. देवास भिऊन वागावें. देवावर भक्ति ठेवावी म्हणजे तो आपलें कल्याण केल्यावांचून राहणार नाहीं.”

जे लोक अविचारी, दुष्ट, आणि स्वार्थपरायण असतात ते आपलें काल्पनिक हित साधण्याच्या नादांत स्वतःस व दुसऱ्यांस असुखी करतात यांत मोठेंसें नवल नाहीं. पण पुष्कळ सन्मान्य लोक व ग्रंथकार ह्यांचे

---

* मूढः परप्रत्ययनेयबुद्धिः । —कालिदास
भावार्थः—मूर्ख मनुष्य दुसऱ्याच्या तंत्रानें वागतो.

ह्यातूनहि जाणून बूजून नव्हे पण चुकीनें अशा प्रकारचे परिणाम होतात; असें सांगितलें तर कितीएकांस कदाचित् आश्चर्य वाटेल. त्यांनीं पापयुक्त जीवित हेंच सुखमय जीवित असें वर्णन केलें आहे. त्यांनीं सद्गुणास स्वार्थत्याग हें नांव दिलें आहे; आणि तामसवृत्तीलाच धर्म ही संज्ञा दिली आहे. ह्यामुळें त्यांच्या उपदेशांचा असा अर्थ होतो कीं, ज्यांना सद्गुणी, पुण्यवंत आणि धर्मनिष्ठ व्हावयाचें असेल, त्यांनीं ह्या जगांत सुख म्हणून भोगतां कामा नये; पण दुःख मात्र सोसलें पाहिजे. अशा प्रकारच्या उपदेशामुळें लक्षावधि लोक पुण्यप्राप्तीसाठीं म्हणून शरीरास नानाप्रकारें दंडितात व अनेक प्रकारच्या यातना भोगतात. धर्माच्या नांवानें जगांत अगणित लोकांचा छळ झालेला आहे, व हजारों लोकांचे जीव बळी पडले आहेत. ज्या लोकांनीं हा छळ केला ते धर्मनिष्ठ होते, सदय अंतःकरणाचे होते, व सुस्वभावी होते. पण धर्माच्या संबंधानें त्यांच्या कल्पना अगदीं चुकीच्या होत्या. हल्लीं देखील नेहमीं आपल्या पहाण्यांत कांहीं सन्मान्य लोक येतात; त्यांचें असें मत असतें कीं ज्या ज्या गोष्टी सुखप्रद आहेत त्या त्या नीतिविरुद्ध असल्याच पाहिजेत. त्यांच्या मतें धर्माचें स्वरूप कुब्जेप्रमाणें वांकडें, दुर्मुखलेलें व उदासीन असें आहे. ह्या सृष्टीमध्यें आनंददायक, सुखकर, सुंदर, आणि रमणीय अशा ज्या ज्या वस्तु आहेत त्या त्या इष्ट नसून अनिष्ट आहेत. त्या वस्तु म्हणजे आह्मांस आनंद आणि सुख व्हावें म्हणून त्या कल्याणनिधान परमेश्वरानें

दिलेल्या सर्वोत्कृष्ट देणग्या नव्हत; तर पड्रिपूंनीं आ-ह्मांस पकडण्यासाठीं पसरलेले ते कपटपाशच आहेत.

(आर्या)

दुःखाचा लवलेशहि जेथें ठाउक नसे असा स्वर्ग ॥
साधाया खचित नसे दुःखपथाविण जनीं दुजा मार्ग ॥ १

—कूपर

आतां ही गोष्ट खरी आहे कीं, ह्या संसारांतून मार्गक्रमण करीत असतांना आपणास दुःखाचे प्रसंग कधीं ना कधीं यावयाचेच. पण ज्याप्रमाणें ऊन आहे तेथें सावली असतेच, त्याप्रमाणें सुख आहे तेथे दुःख असावयाचेंच. आयुर्मर्यादेमुळें आपल्या इष्टमित्रांच्या वियोगाचें आपणां सर्वांस भोगावें लागणारें दुःख अपरिहार्यच आहे. पण त्या खेरीजहि दुसरीं पुष्कळ दुःखें भोगावीं लागतात व तीं भोगावीं लागणें साहजिकच आहे. ह्याचें कारण एक तर असें आहे कीं, आपल्या जीविताचा अनेक गोष्टींशीं संबंध आहे, व ज्ञानासंबंधानें जग अद्यापि बाल्यावस्थेंतच आहे. आपल्या जीवितरक्षणाचीं सर्व साधनें अद्याप आपणांस कळलेलीं नाहींत. आपल्या सभोंवतालच्या पदार्थांचें व शक्तींचें स्वरूप आणि गुणधर्म आपणांस पूर्णपणें अवगत झाले नाहींत. अशी स्थिति आहे तोंपर्यंत आपणांस बरींच दुःखें भोगावीं लागणारच. पण कूपर कवीच्या वर निर्दिष्ट केलेल्या उक्तीप्रमाणें स्वर्गास जाऊं इच्छिणारानें ह्या जगांत दुःखच सोसलें पाहिजे. नाहींतर त्याला स्वर्गप्राप्ति व्हावयाची नाहीं. म्हणजे जो मनुष्य ह्या जगांत सुख भो-

गील, त्याला पुढें यमयातनाच भोगाव्या लागणार असा अर्थ होतो. अशा प्रकारच्या चुकीच्या कल्पनांमुळें पुष्कळ लोकांच्या मनाला विनाकारण त्रास, काळजी, व अस्वस्थता उत्पन्न झालेली आहे. इंग्लंडसारख्या देशांत देखील पुष्कळ तरुण मनुष्यें, आपण आनंद व सुख भोगलें हें पाप झालें असें समजून त्याबद्दल खेद पावतात, व स्वतःस व्यर्थ दोष लावून घेतात. खरोखर म्हटलें तर त्यांना खेद करण्याचें कांहीं कारण नसून उलट असें सुख आपणास प्राप्त झालें, व दुःखानें आणि रोगानें गांजलेल्या लोकांस आनंदी करण्याची अमोलिक शक्ति आपणांमध्यें आहे, ही ईश्वराची मोठी कृपा आहे, असें त्यांनीं समजलें पाहिजे. आपल्या हिंदुस्थान देशांत तर अशा विकारांची प्रवृत्ति पुष्कळच आहे. हें जग म्हणजे केवळ मिथ्या आहे; आपलीं बायकामुलें वगैरे आपले कोणी नव्हत; संसार असार आहे; संसारांत कांहीं सौख्य नाहीं; अशा प्रकारच्या कल्पना संस्कृत व मराठी ग्रंथांत जागोजाग आढळतात. त्याच कल्पनांच्या अंमलाखालीं आपल्या देशांत अनेक लोक घरदार व संसार सोडून संन्यास व अरण्यवास पतकरीत आले आहेत. ह्या मार्गाला निवृत्तिमार्ग असें म्हणतात. ह्या निवृत्तिमार्गाचा अतिरेक होऊं लागला म्हणून भगवद्गीतेमध्यें प्रवृत्तिमार्ग व निवृत्तिमार्ग ह्यांचा मेळ घालून दिला आहे.

(श्लोक)

नकर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ॥

नच संन्यसनादेव । सिद्धिं समधिगच्छति ॥ १
नियतं कुरु कर्म त्वं । कर्म ज्यायो ह्यकर्मणः ॥
शरीरयात्रापि च ते । न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ २
कर्मेंद्रियाणि संयम्य । य आस्ते मनसा स्मरन् ॥
इंद्रियार्थान् विमूढात्मा । मिथ्याचारः स उच्यते ॥ ३
यस्त्विंद्रियाणि मनसा । नियम्यारभतेऽर्जुन ॥
कर्मेन्द्रियैःकर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ४

भावार्थः—

(आर्या)

नैष्कर्म्य तो न पावे, कर्माचा जो करी अनारंभ ॥
केवळ संन्यासानें पुरुषास न मुक्तिचा समारंभ ॥ १

—मोरोपंत

(श्लोक)

कर्मत्यागाहुनी कर्म । श्रेष्ठ तें नित्य तूं करी ॥
देहनिर्वाहाहि तूझा । न घडे कर्म टाकितां ॥ २

—वामन

(आर्या)

कर्मेंद्रियांसि दमुनी, विषय स्मरतो मनामधें मूढ ॥
म्हणती त्यातें ज्ञानी मिथ्याचारी सदा महामूढ ॥ ३

—मोरोपंत

(श्लोक)

अर्जुना इंद्रियातें जो । मनें करुनि आंवरी ॥
कर्मेन्द्रियें कर्मयोग । करी निष्काम थोर तो ॥ ४

—वामन

निवृत्तिमार्गालाच अनुलक्षून तुकाराम बोवांचा खालील अभंग आहे:—

नको त्यजूं स्त्रियापोर । बांधी सोपे माड्या घर ॥
आल्या अतीथा आदर । याहुनि धर्म कोणता ॥ १

आपण ह्या जगांत कोठून आलों, कोठें जाणार, वगैरे प्रश्न फार गूढ आहेत. त्या प्रश्नांचीं उत्तरें आपणांस मिळत नाहींत, म्हणून मनाचा संताप करून घेणारे पुष्कळ लोक आहेत. पण जे साधु आणि शहाणे आहेत ते असें कधीं करीत नाहींत. कधीं त्यांना ह्या जगांतील लोकांच्या दुराचरणाबद्दल राग येत असेल, व कधीं लोकांच्या दैन्यावस्थेबद्दल कींव येत असेल. पण ज्यांनीं म्हणून ह्या जगांत आपलें कर्तव्य बजाविलें आहे त्यांना आपल्या स्थितीबद्दल कधींहि असंतोष वाटत नाहीं.

(आर्या)

ईश दयामय आहे ऐसें वाटे सुनिश्चयें ज्याला ॥
त्यालाच ह्या जगाचा कळला गूढार्थ, तो न अन्याला ॥ १

—व्हिटीयर

सेनेका म्हणतो, " जगांत असें एकहि कर्तव्य नाहीं कीं, जें केल्यानें मनुष्यास आनंद प्राप्त होणार नाहीं. त्याचप्रमाणें दुराचरणास प्रवृत्त करणारा असा एकहि मोहपाश नाहीं कीं, जो मनुष्यास तोडतां येणार नाहीं."

मिल्टन् कवीनें म्हटलें आहे:—

(आर्या)

निंदूं नको विधीला, त्यानें कर्तव्य आपुलें केलें ॥
तूं आचरी स्वधर्मा, ह्याहुनि कांहीं दुजें नसे उरलें ॥ १

सृष्टीपासून आह्मां मनुष्यांस आनंद व्हावा असाच सृष्टिकर्त्याचा हेतु स्पष्ट दिसतो. कारण, तसा हेतु नसता तर त्यानें ही सृष्टि सौंदर्यमय आणि संगीतपूर्ण

केली आहे तशी केली नसती. तेव्हां मिल्टननें म्हटल्याप्रमाणें सृष्टिकर्त्यानें आमच्याकरितां जें करावयाचें तें केलें आहे. आपण सन्मार्गानें वागून आपलें कर्तव्य करणें व तसें करून आपणा स्वतःस अनुपम आनंदाचा लाभ करून घेणें व आपल्या इष्टमित्रांस शांतीचा लाभ करून देणें हें काम आपलें आहे.

हल्लींच्या काळांत जेवढे शोध लागले आहेत, व जे चमत्कार दृष्टीस पडतात व जी प्रगति झाली आहे, तशी पूर्वी कधींहि नव्हती. अशा कालांत आपला जन्म झाला हें आपलें भाग्य समजलें पाहिजे. त्याबद्दल गर्व वाहण्याचें कांहीं कारण नाहीं, तर देवाचे उपकार मानले पाहिजेत.

ईश्वरानें दिलेल्या असंख्य देणग्यांचा अव्हेर न करितां आपण संतोषानें व कृतज्ञतेनें त्यांचा पूर्ण उपभोग घेणें हेंच योग्य आहे. पण आपणास दुःखाचे व काळजीचे प्रसंग कधींच येऊं नयेत, अशी आशा करणें व्यर्थ आहे. वालपोल् ह्यानें म्हटलें आहे कीं, “ विचारशील लोकांना संसार हा हास्यरसप्रधान नाटकाप्रमाणें भासतो. आणि विकारवश लोकांना शोकरसप्रधान नाटकाप्रमाणें भासतो.” खरोखर म्हटलें तर संसारांत शोकाचे प्रसंग फार थोडे व आनंदाचे प्रसंगच फार असतात. आणि संसार सुखमय किंवा दुःखमय होणें हें बऱ्याच अंशीं मनुष्याच्या स्वतःच्या वर्तनावर अवलंबून असतें.

(श्लोकार्ध)

सुखस्य दुःखस्य न कोपि दाता । परो ददातीति कुबुद्धिरेषा ॥

—अध्यात्म रामायण

भावार्थः—सुख आणि दुःख हीं दुसऱ्यापासून प्राप्त होतात ही कल्पना अगदीं मिथ्या आहे.

साक्रेटीस ह्याचें तर असें म्हणणें आहे कीं, "जो खरा साधु आहे त्याला जिवंतपणीं किंवा मरणानंतर देखील कांहीं विपत्ति प्राप्त होत नाहीं."

(श्लोक)

या विवेकविकासिन्यो । मतयो महतामिह ॥
न ता विपदि मज्जंति । तुंवकानीव वारिणि ॥ १

—योगवासिष्ठ

भावार्थः—ज्याप्रमाणें भोंपळे पाण्यांत बुडत नाहींत त्याप्रमाणेंच विवेकवान् मनुष्यें विपत्तीच्या प्रसंगीं शोकसागरांत बुडत नाहींत.

कसेंहि असलें तरी संसार कष्टमय आहे म्हणून सांगणाऱ्या साधुसंतांपेक्षां तो सुखमय आहे असें सांगणाऱ्या साधुसंतांचेंच म्हणणें अधिक खरें आहे. पण आपण काय करितों कीं, सुखामध्यें वर्षांचीं वर्षें जातात त्याचा मुळींच विचार करीत नाहीं; पण दुःखामध्यें जो अल्पकाळ जातो त्याचा मात्र ध्यास लावून घेतों. आपले सर्वच प्रयत्न सफल होतील अशी आशा करूं नये. सृष्टिनियमाचे व्यापार देखील कधीं कधीं बिनचूक घडत नाहींत. मग आपली काय कथा? पण "आरोग्य, बल आणि संपत्ति ह्यांची अनुकूलता असेल तेव्हां

मदोन्मत्त होऊं नये. तसेंच, विपत्ति आली असतां धैर्य सोडून निराश होऊं नये."

कित्येकांना असें वाटतें कीं, सन्मार्ग फार विकट आणि त्रासदायक आहे; आणि कुमार्ग फार सोपा आणि रमणीय आहे. पण ज्यांना चांगलें शिक्षण मिळालें आहे त्यांना सन्मार्गच सुलभ आणि रमणीय वाटतो, व कुमार्गाविषयीं त्यांना फार तिरस्कार वाटतो. सन्मार्ग आवडणें किंवा कुमार्ग आवडणें हें बऱ्याच अंशीं संवयीवर अवलंबून आहे. म्हणून लहानपणापासून सन्मार्गाकडे मन वळविण्याची संवय ठेविली पाहिजे.

तथापि अनीतीचे कित्येक प्रकार सकृद्दर्शनीं फार मोहक दिसतात व त्यांपासून क्षणमात्र सुखाचा अनुभवहि येतो, ही गोष्ट कबूल केलीच पाहिजे. आणि पुष्कळ लोकांचें कुमार्गांत पाऊल पडतें त्याचें हेंच कारण आहे. पण जे लोक अशा मोहांत पडतात त्यांना एक क्षणभर सुख वाटेल, पण पुढें दीर्घकालपर्यंत दुःख भोगावें लागेल. राईएवढा लाभ होईल, पण पर्वताएवढी हानि होईल. त्यांनीं एका मेजवानीकरितां आपली सर्व मिळकत विकल्यासारखें होईल. सारांश, ह्या जगापुरतीच ज्यांची नजर आहे त्यांना देखील सुख पाहिजे असेल तर त्यांनीं सन्मार्गानेंच वागलें पाहिजे. आत्मनिग्रहानें जेवढें सुख प्राप्त होईल त्याचा लक्षांशहि स्वैरवर्तनापासून होणार नाहीं.

संपत्ति आणि सुख हीं नेहमीं एकत्र असतातच असें

१. आलफ्रेड धि ग्रेट

नाहीं. सुखाचीं सर्व साधनें अनुकूल असतांहि पुष्कळ लोकांची स्थिति अगदीं बापुडवाणी दिसण्यांत येते. नशिबानें पुष्कळ दिलें तरी त्यापासून संतोष होणें हें मनाच्या स्वाधीन आहे.

(अभंग)

मन करा रे प्रसन्न । सकलसिद्धीचें कारण ॥
मोक्ष अथवा बंधन । सुखसमाधान इच्छा ते ॥ १
चित्त समाधाने । तरी विष वाटे सोनें ॥
चिंताच्या तळमळें । चंदनेंहि अंग पोळे ॥ २

—तुकाराम

संपत्ति, अधिकार, आणि मानमरातब ह्या गोष्टी सर्वांसच साध्य नाहींत. सौजन्य, औदार्य आणि शहाणपणा हे गुण प्रत्येकास जोडितां येण्यासारखे आहेत. मनुष्याच्या मिळकतीपेक्षां त्याच्या आंगचे गुण हीच त्याची खरी संपत्ति समजली पाहिजे. " संसार हें एक नाटक आहे. मनुष्यें त्यांतील नट आहेत. राजा, प्रजा, श्रीमंत, गरीब, इत्यादि त्यांतील निरनिराळ्या भूमिका आहेत.* हें आयुष्य संपल्यावर हें नाटक बंद होईल, व एथील नाटकी पोषाक काढून टाकावा लागेल. मग दरएक मनुष्याच्या बऱ्या-वाईट कर्मांचा निवाडा होईल. श्रीमंती, अधिकार, मोठेपणा, वगैरे गोष्टी त्या-

१. सेंट क्रिस्टोम

(श्लोक)

*एकदां तरुण, बाल एकदां । भाग्यवंतहि अभाग्य एकदां ॥
एकदां जरठ जाय सत्वरी । धर्मराजसदना नटापरी ॥ १

—वामन

च्यावरोबर येणार नाहींत." त्या निवाड्याच्या वेळीं आपलीं कर्में चांगलीं ठरतील असें आपण आचरण ठेविलें पाहिजे.

(श्लोक)

धनानि भूमौ पशवश्च गोष्ठे । भार्या गृहद्वारि जनः स्मशाने॥
देहश्चितायां परलोकमार्गे । कर्मानुगोगच्छति जीव एकः ॥ १

—भर्तृहरि

भावार्थः—

(श्लोक)

व्रजांत धेनू धन तें निधानीं । स्त्री मंदिरीं बंधुजन स्मशानीं ॥
चितेंत काया, परलोकपंथें । जीवासवें कर्मचि एक जातें ॥ १

आपल्या कर्मांचा निवाडा कोणत्या तत्त्वावर होईल वरें? आह्मीं किती कामें केलीं याचा विचार व्हावयाचा नाहीं, तर आह्मीं किती प्रयत्न केला ह्याचा विचार होणार. जगांत आह्मीं यशस्वी झालों कीं नाहीं हें पाहण्यांत येणार नाहीं; तर यशस्वी होण्याची आमची योग्यता होती किंवा नाहीं ह्याचा विचार होईल.

(श्लोक)

कर्मण्येवाधिकारस्ते । मा फलेषु कदाचन ॥
मा कर्मफलहेतुर्भुर्मा ते संगोस्त्वकर्मणि ॥ १

—भगवद्गीता

भावार्थः—कर्तव्य करावें एवढाच मानवाचा अधिकार आहे. त्या कर्तव्याच्या फलाविषयीं त्यानें आसक्ति ठेवूं नये, व कर्तव्य करण्यास कधींहि चुकूं नये.

(अभंग)

धन्य तोचि प्राणी क्षमा ज्याचे अंगीं । न भंगे प्रसंगीं धैर्यबळ ॥

न म्हणे कोणासी उत्तम वाईट । महत्त्व वरिष्ठ जेथें नसे ॥ १
अंतरीं सबाह्य सारिखें निर्मळ । हृदय कोमळ गंगारूप॥
तुका म्हणे काया कुरवंडीन तया । ठेवीन मी पायां मस्तक हें ॥ २

—तुकाराम

खरें सुख मिळण्याकरितां आपण शहाणपणानें व सन्मार्गानें वागलें पाहिजे. कुमार्गानें वागून व विषयासक्त होऊन सुख मिळणार नाहीं. सारांश, सद्गुण हेंच खरें स्वार्थसाधन आहे व अनीति हाच खरा स्वार्थनाश आहे.

(श्लोक)

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते । कार्याकार्य व्यवस्थितौ ॥
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं । कर्मकर्तुमिहार्हसि ॥ १

—भगवद्गीता

भावार्थः—

(आर्या)

कार्याकार्य विचारीं यास्तव शास्त्र प्रमाण तुज ताता ॥
जाणुनि शास्त्रविधीतें कर्म करायासि योग्य हो आतां ॥ १

प्रकरण २

व्यवहारचातुर्य

(ओंवी)

जो दुसऱ्याचें अंतर जाणे। देश काल प्रसंग जाणे ॥
तया पुरुषा काय उणें। भूमंडळीं ॥ १

—रामदास

प्रकरण २

व्यवहारचातुर्य

संसारांत मनुष्याला यश येण्यास बुद्धिपेक्षांहि धोरण असण्याची फार जरूरी आहे. पण ज्यांच्या अंगीं हा गुण स्वभावतःच नसतो त्यांना तो सुलभ रीतीनें प्राप्त होण्याजोगा नाहीं. तथापि अमुक अमुक प्रसंगीं दुसऱ्या मनुष्यास काय आवडण्याचा संभव आहे ह्याचा विचार करण्याची संवय ठेविली असतां धोरण हा गुण मनुष्यास कांहीं अंशीं मिळवितां येईल.

दुसऱ्यांना संतुष्ट करण्याची संधि मिळाल्यास ती कधीं व्यर्थ दवडूं नये. सर्वांशीं सौजन्यानें वागणें आपणास अत्यंत आवश्यक आहे. सौजन्यानें वागण्यापासून आपलें कांहीं खर्च होत नाहीं, पण आपणास सर्व गोष्टी प्राप्त होतात. ज्या गोष्टी निवळ द्रव्यानें प्राप्त होण्यासारख्या नाहींत त्या सौजन्यानें सहज प्राप्त होतात. म्हणून ज्या ज्या मनुष्याशीं आपला संबंध येईल, तो तो मनुष्य आपलासा करून घेण्याचा प्रयत्न आपण केला पाहिजे. बर्लें हा एकदां एलिझाबेथ राणीस म्हणाला कीं " आपण लोकांचीं अंतःकरणें आपणाकडे ओढून घेतलीं म्हणजे त्यांचीं मनें व धनें हीं आपणांस सहज साध्य होतील. "

ज्या ठिकाणीं शक्तीचा कांहीं उपयोग होत नाहीं त्या ठिकाणीं धोरणानें काम करून घेतां येतें.

(श्लोकार्ध)

उपायेन हि यत्कुर्यान्न तच्छक्यं पराक्रमैः ॥

--हितोपदेश

भावार्थः–युक्तीनें जें कार्य होईल तें पराक्रमानेंहि होणार नाहीं.

सूर्य आणि वायु ह्यांच्या गोष्टीचें देखील तात्पर्य हेंच आहे. ती गोष्ट अशी कीं, एकदां सूर्य आणि वायु ह्यांच्यामध्यें मोठा कोण अशाबद्दल भांडण लागलें. तेव्हां एक मनुष्य रत्स्यानें चालला होता त्याच्या आंगावरची घोंगडी जो उडवील तो मोठा असें ठरलें. नंतर वायूनें मोठा जोर करून घोंगडी उडविण्याचा यत्न केला. परंतु वारा जसजसा सोसाट्यानें वाहूं लागला तसतशी त्या मनुष्यास थंडी लागून तो आपली घोंगडी आपल्या अंगाभोंवती घट्ट गुंडाळून घेऊं लागला. नंतर सूर्यानें आपल्या किरणांनीं त्याची थंडी नाहींशी करून त्याच्या अंगांत उष्णता आणिली. तेणेंकरून त्या मनुष्यानें आपली घोंगडी फेंकून दिली आणि आंगरखाहि काढून टाकला. वायूनें हा प्रकार पाहून सूर्य मोठा आहे असें कबूल केलें.

ही गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवावी कीं, मनुष्य गोडीगुलाबीनें जें कांहीं करील तें जुलमानें करणार नाहीं. आणखी केव्हां झालें तरी मनुष्यावर सक्ती न करितां त्याला खुष ठेवून त्याजकडून काम करून घ्यावें. शेक्सपिअर कवीनें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं,

(ओंवी)

खड्गानेंहि मान कापितां । जें कृत्य न करी मानव सर्वथा ॥
तेंहि करील तो तत्वता । स्मितवदनें सेवाधितां ॥ १

राजनीतीचा असा एक उत्कृष्ट नियम आहे कीं, " राजानें प्रजेवर करडा अंमल गाजविण्याचा यत्न सहसा करूं नये. "

ज्या ज्या मनुष्याशीं आपला संबंध जडेल त्याचा आपणावर विश्वास बसावा, व त्याच्या विश्वासास आपण पात्र व्हावें अशा रीतीचें वर्तन ठेवावें. पुष्कळ लोकांचें जें वजन असतें त्याला त्यांच्या हुषारीपेक्षां त्यांची इभ्रत हीच विशेषतः कारणीभूत असते. फ्रान्सिस् हॉर्नर ह्या नांवाचा एक गृहस्थ होता. तो एकाद्या मोठ्या हुद्यावर नसूनहि त्याचें सरकारदरबारांत फार वजन असे. त्याच्या संबंधानें सिडनी स्मिथनें म्हटलें आहे कीं, सदाचरणाचे सर्व नियम त्याच्या चेहेऱ्यावर जणूं काय कोरल्याप्रमाणें दिसत होते.

दुसऱ्यांची इच्छा तृप्त करण्याचा यत्न करावा. पण तो शहाणपणानें व रास्त प्रकारानेंच करावा. जेथें नाहीं म्हणण्याची अवश्यकता असेल तेथें नाहीं म्हणण्यास भिऊं नये. ' होय ' असें पुष्कळ म्हणूं शकतील पण लोक खुष होतील अशा रीतीनें ' होय ' म्हणण्याचें काम सर्वांसच साधत नाहीं. आणि नाहीं म्हणणें तर त्याहीपेक्षां कठिण आहे. ज्या ठिकाणीं नाहीं म्हटलें पाहिजे त्या ठिकाणीं नाहीं ह्मणण्याचा धीर न झाल्यामुळें पुष्कळ लोक नाश पावले आहेत. ' भीड भिकेची बहिण ' अशी आपणांत एक म्हण आहे. प्लूटार्क म्हणतो कीं, एशियामायनरमधील लोकांनीं आपलें स्वातंत्र्य गमावलें ह्याचें कारण योग्य प्रसंगीं त्यांस ' नाहीं '

ह्या शब्दाचा उपयोग करितां आला नाहीं हें होय. म्हणजे स्पष्ट व निर्भीड भाषणाच्या उणीवीमुळें हें इतकें नुकसान झालें. व्यवहारांत नाहीं म्हणणें हें कधीं कधीं जरूर असतें. पण तें दुसऱ्यांस न दुखवितां म्हणतां आलें पाहिजे. आपल्याजवळ कांहीं कामासंबंधानें लोक आले असतां आपल्याशीं व्यवहार करण्यांत त्यांना आनंद वाटेल, व पुनः आपल्याजवळ कामासंबंधानें त्यांना यावेंसें वाटेल, अशा रीतीनें आपण त्यांच्याशीं वर्तन ठेवावें. मनुष्याच्या मनोवृत्तींचा व्यवहाराशीं पदोपदीं किती संबंध येतो हें पुष्कळांस ठाऊक नसतें. आपणास दुसऱ्यांनीं प्रेमानें व आदरानें वागवावें असें प्रत्येकास वाटत असतें. मोकळेपणाची व संतोपकारक वागणूक ठेवल्यानें एकदा सौदा जसा ठरवून घेतां येईल तसा किंमतींत कांहीं फेरफार केल्यानेंहि येणार नाहीं.

आपली वागणूक दुसऱ्यांस संतोपकारक होईल असें करणें हें फारसें अवघड नाहीं.

(ओंवी–अर्ध)

हें आपणाकडेचि येतें । राजी राखणें समस्तांतें ॥ १

—रामदास

“ दुसऱ्यांस खुप करण्याचें मनांत असलें म्हणजे तसें करण्याची निम्मे खुबी साधली म्हणून समजावें. ” तसेंच ज्याला इतरांस खुप ठेवण्याची मनापासून इच्छा नाहीं, त्याला लोक कधींहि वश होणार नाहींत. हा महत्त्वाचा गुण जर लहान वयांतच संपादन केला नाहीं

---

१ चेस्टरफील्डचीं आपल्या मुलांस पत्रें.

तर पुढें तो आपल्या अंगीं आणण्याचें काम फार कठिण जाईल. अंगांत दुसरा कांहीं विशेष गुण नसतां, फक्त चांगल्या रीतीभातींच्या योगानेंच पुष्कळ लोक जगांत सर्वांचा लोभ संपादन करितात. आणि उलटपक्षीं असेहि पुष्कळ लोक असतात कीं, त्यांच्यामध्यें बरेच्च चांगले गुण असतात, त्यांचें अंतःकरण उदार असतें, व त्यांचे हेतूहि चांगले असतात; पण फक्त त्यांची लोकांशीं वागणूक दिसण्यांत जराशी अडदांड असल्यामुळें पुष्कळ लोक त्यांचा तिटकारा करितात. लोकांस खुष करितां येत असलें म्हणजे आपलें काम साधतें एवढेंच नाहीं, तर त्यापासून आपल्या मनालाहि एक प्रकारचें सौख्य वाटतें. ह्याचा अनुभव सहज घेतां येण्याजोगा आहे.

कसाहि प्रसंग असला तरी सावधपणा राखून चित्त शांत ठेवावें. मन उदार असावें. कोणत्याहि व्यवहारासंबंधानें बोलणें करीत असतां चित्ताचा स्थिरपणा व शांतपणा हे गुण फार अमोलिक आहेत. अडचणीच्या व संकटाच्या प्रसंगीं हे गुण असल्यास बहुतकरून आपलें संरक्षण होईल.

आपणापेक्षां कमी हुषार लोक भेटले असतां त्यांचा अवमान करणें योग्य नाहीं. एकादी जिनगी आपणास वारसपणाच्या हक्कानें प्राप्त झाली असतां जसें गर्व मानण्याचें कारण नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या अंगीं असलेल्या हुषारीबद्दल वृथा अभिमान वाटण्याचें कारण नाहीं. संपत्ति किंवा हुषारी ह्यांचा चांगला उपयोग क-

रण्यांत कायतो खरा मोठेपणा आहे. दुसरें असें कीं, पुष्कळ लोक खरोखर फार हुपार असून ते बाह्यतः तसे दिसत नाहींत, म्हणून ते हुपार नाहींत असें समजणें चुकीचें होईल.

मनुष्याची परीक्षा करण्याचें काम पुस्तकवाचनापेक्षां फार कठिण आहे. एकाद्या मनुष्याच्या स्वभावाची परीक्षा त्याच्या मुद्रेवरून बऱ्याच अंशीं करितां येते. " जेव्हां मनुष्याच्या बोलण्यावरून त्याचा हेतु एक प्रकारचा दिसतो व चर्येवरून दुसऱ्या प्रकाचा दिसतो, तेव्हां अनुभवी लोक चर्येवरून दिसलेलाच हेतु खरा मानितात."[1]

(श्लोक)

आकारैरेव चतुरास्तर्कयन्ति परेङ्गितम् ॥
गर्भस्थं केतकीपुष्पमामोदेनैव षट्पदाः ॥ १

—सुभाषित

भावार्थः—चतुर लोक दुसऱ्याचें हृद्गत चर्येवरून ओळखतात. पानामध्यें झांकलेलें केतकीपुष्प भ्रमर हे वासानेंच ओळखतात.

एकाद्या मनुष्यानें आपल्याविषयीं अतिशय प्रेम दाखविलें असतां त्याच्यावर फाजील विश्वास ठेवूं नये. मनुष्यांचें प्रथमच्याच भेटीसरसें एकमेकांवर प्रेम बसत नसतें. म्हणून जर एकाद्या अपरिचित मनुष्यानें आपणाविषयीं अत्यादर दाखविला, किंवा कांहीं मोठी गोष्ट करण्याचें वचन दिलें, तर त्या मनुष्याच्या बोलण्यावर फारसा विश्वास ठेवूं नये. जरी त्याचें बोलणें

१. इमरसन्

कपटाचें नसलें, तरी तो मनांत आहे त्यापेक्षां जास्त बोलून दाखवीत आहे, किंवा त्याच्या मनांत आपणाकडून कांहीं तरी फायदा करून घ्यावयाचा आहे, असें खास समजावें.

(अभंग)

मैंद मुखींचा कोंवळा । भाव अंतरीं निराळा ॥
जैशी वृंदावन कांति । उत्तम धरूं नये हातीं ॥
वक ध्यान धरी । सोंग करून मासे मारी ॥ १

—तुकाराम

ह्यासाठीं, जो जो मनुष्य मित्रत्व दाखवितो, तो तो आपला मित्रच आहे, असें समजूं नये. तसेंच, क्षुल्लक कारणावरून एकादा मनुष्य आपला शत्रु आहे असें समजूं नये.

आह्मी मनुष्यें विचारी व बुद्धिमान् प्राणी असल्याबद्दल फुशारकी मारितों. पण मनुष्यें नेहमीं विचारानेंच वागतात असें समजूं नये. मनुष्यप्राणी मोठा विचित्र आहे. तो कधीं विचारानें वागतो, पण पुष्कळ वेळां दुराग्रह आणि विकारवशता ह्यांचा त्याच्यावर अंमल चालतो. म्हणून लोकांस आपलेसे करून घ्यावयाचे असल्यास केवळ तार्किक प्रमाणांनीं त्यांची खातरी करून कार्य होत नाहीं, तर त्यांच्या मनोवृत्तीहि वळविल्या पाहिजेत. हा नियम व्यक्तींस लागू आहेच, पण जनसमुदायासंबंधानें तर विशेष लागू आहे.

वादविवाद करण्यापासून कधीं कधीं अनिष्ट परिणाम होतात. त्यापासून मित्रांमित्रांमध्यें उदासीनता व

गैरजमज होण्याचा संभव असतो. वादविवादांत आपण आपल्या मित्रांस जिंकल्यानें त्यांची मैत्री नाहींशी होण्याचा संभव असतो. व तसें झाल्यास एकंदरींत आपला तोटाच होईल. वादविवाद करण्याची जरूर पडेल, तेव्हां ज्या गोष्टी आपणास कबूल असतील त्या कबूल कराव्या. पण अमुक मुद्याकडे तुमचें दुर्लक्ष झालें आहे असें आपल्या प्रतिपक्ष्यास सविनय कळवावें. वादविवाद करतेवेळीं बहुतेक लोकांस आपली चूक कळत नाहीं, व ज्यांना कळते त्यांना ती कबूल करावीशी वाटत नाहीं. बरें, वादविवादांत आपण हरलों असें त्यांना वाटलें तरी त्यांची वादाच्या मुद्यासंबंधानें खातरी होते असें नाहीं. तार्किक प्रमाणांनीं एकाद्याची खातरी करणें बहुधा अशक्य आहे असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं. आपले विचार सुबोध रीतीनें व थोडक्यांत त्याला सांगावे. आणि तेणेंकरून त्याचा स्वतःच्या मतावरील विश्वास कांहींसा उडाला तरी पुष्कळ झालें असें समजावें. त्यांचें मतांतर होण्याचा तो आरंभ समजावा.

संभाषण चांगल्या रीतीनें करितां येणें ही तरी एक स्वतंत्र कलाच आहे. ज्याच्यापाशीं पुष्कळ ज्ञानसंचय आहे त्याला उत्तम प्रकारें संभाषण करितां येईलच असा नियम नाहीं. चेस्टरफील्ड ह्यानें म्हटलें आहे कीं, " पुष्कळ लोक केवळ पलटणीचे कप्तान असूनहि इतकें उत्तम संभाषण करितात कीं, डेकार्ट अथवा न्यूटनसारख्या तत्त्ववेत्त्याच्या संगतीपेक्षां त्यांचीच सं-

गति मला आवडेल. " पण ह्या म्हणण्यांतहि फार अतिशयोक्ति आहे.

चांगल्या प्रकारचें संभाषण करितां येणें जसें अवश्य आहे, त्याचप्रमाणें दुसऱ्याचें भाषण शांतपणें ऐकून घेणें हेंहि महत्त्वाचें आहे. व हें जरी फारसें अवघड नाहीं तथापि फार सोपेंहि नाहीं. दुसऱ्याचें सर्वच भाषण आपण टीकाकार किंवा न्यायाधीश या नात्यान ऐकून उपयोग नाहीं. उतावळीनें आपलें मत होऊं देतां कामा नये. बोलणाराच्या मनोवृत्तीशीं आपली तद्रूपता करावी. दुसऱ्याचें भाषण प्रेमानें व कळकळीनें ऐकलें तर आपली सल्लामसलत घेण्यास लोक वारंवार येतील. पुष्कळ लोकांस काळजीच्या व विपत्तीच्या समयीं आपणापासून साहाय्य होऊन त्यांचें सांत्वन होईल. व आपणांसहि त्यामुळें समाधान वाटेल.

आपण लहान वयांत असतांना आपल्या बोलण्यास फार मान मिळण्याची आशा धरूं नये. त्यावेळीं आपण स्वस्थ बसून दुसऱ्याचें बोलणें ऐकावें, व आपल्यासभोवतीं काय होतें तें पहावें. " खेळ चालत असतां खेळणारापेक्षां बाहेर उभे असलेल्या लोकांसच खेळ चांगला दिसतो" अशी इंग्रजी भाषेंत एक म्हण आहे. आपल्यासभोंवतीं ज्या गोष्टी चालत असतात त्यांत आपलें कांहीं अंग नसलें, व आपणाकडे कोणाचें लक्ष नसलें, तरी त्या गोष्टी अवलोकन करण्यास आपणास कांहीं अडचण पडते असें नाहीं. उलट असें आहे कीं, कांहीं कांहीं गोष्टी अदृश्यपणानें आपणास पहा-

ण्यास मिळाल्या तर त्यांत फायदाच आहे.

पुष्कळ लोकांस विचार करण्याचा कंटाळा असतो. असे लोक तुमची योग्यता तुम्ही दर्शवाल तीच खरी मानतील. तुमच्या गुणांची खरी परीक्षा करण्यास लागणारी मेहनत त्यांच्यानें होत नाहीं. " जगांत आपली किंमत कमी-जास्त होणें हें आपल्या स्वाधीन आहे. "

आपण कोणाचें शत्रुत्व संपादन करूं नये; कारण त्यासारखी हानिकारक दुसरी गोष्ट नाहीं.

(ओंवी–अर्ध)

वैर करितां वैरचि वाढे । आपणास दुःख भोगणें घडे ॥

—रामदास

" मूर्ख मनुष्यास मूर्खासारखाच जबाब देऊं नये, नाहींतर तुम्ही त्याच्याप्रमाणेंच मूर्ख आहां असें दिसून येईल. " " रागावलेल्या मनुष्याचा राग मृदु उत्तरानें शांत होतो. " रागाचें उत्तर देणें हें वेडेपणाचें आहे. पण एकाद्याची थट्टा करणें, हें त्याहीपेक्षां मूर्खपणाचें काम होय. शेंकडा नव्वद लोक शिव्यागाळी किंवा एकादी दुखापत सोसतील, पण त्यांना कोणीं हांसलेलें खपणार नाहीं. तुम्हीं त्यांना दुसरें कांहीं केलें तरी ते विसरतील, पण त्यांची टवाळकी केली तर ते त्याचा राग मनांत ठेवितील.

(ओंवी–अर्ध)

वेड्यास वेडें म्हणों नये । वर्म कदापि बोलों नये ॥

—रामदास

१, लेब्रेयर २. इंग्रजी म्हणी

(ओंवी)

हृदयीं तप्तलोहाचें सळ । साहों येईल चिरकाळ ॥
परि दुष्ट शब्दांची जळजळ । मरणांतींहि शमेना ॥ १

—रामदास

मनुष्यास भ्रम असलेला आवडतो, पण त्याचा भ्रम कोणी नाहींसा केला तर त्याला तें आवडत नाहीं. ट्रासिलस नांवाचा एक मनुष्य अथेन्स शहरांत होता. त्याला वेड लागलें होतें, व त्याला असा भ्रम झाला होता कीं, बंदरांतील सर्व जहाजें आपलीं आहेत. त्याला क्रिटो ह्या नांवाच्या गृहस्थानें बरा केला, तेव्हां त्याचा भ्रम नाहींसा झाला. त्याबद्दल त्याला कांहीं उपकार न वाटतां उलट तो आपणास लुटलें म्हणून आक्रोश करूं लागला. लॉर्ड चेस्टरफील्ड म्हणतो, "थट्टेच्या मौजेसाठीं आपला मित्र गमावणारा मनुष्य मूर्ख खराच. पण आपला मित्र नाहीं किंवा शत्रुही नाहीं अशा मनुष्याची थट्टा करून त्यास आपला शत्रु करणें हेंहि मूर्खपणाचेंच लक्षण आहे."

(ओंवी)

बहुकाळींचा मित्रसंबंधु । तोडी एक बोखटा शब्दु ॥
जैसा कांजीचा स्वल्प बिंदु । घटचि नाशी दुग्धाचा ॥ १

—रामदास

दुसऱ्यांनीं आपला अपमान केला, अथवा ते आपणासच हांसत आहेत, अशा प्रकारचा संशय क्षुल्लक कारणावरून मनांत आणूं नये. "ते पोट धरून हांसत होते, ह्यावरून ते माझ्याच संबंधानें बोलत असावे"

असा तर्क करूं नये. पण खरोखर तुमची थट्टा कोणीं केली, तर राग येऊं देऊं नये; व मनापासून हांसावें, म्हणजे थट्टा करणाराची फजिती करण्याची आपणास संधि सांपडते. आपली थट्टा केली असतां जो मनुष्य रागावत नाहीं तो सर्वांस आवडतो. कारण त्या मनुष्याच्या ठिकाणीं सुस्वभाव व तारतम्य आहे असें दिसून येतें. आपली थट्टा झाली असतां आपणच हांसलों म्हणजे लोक थट्टा करण्याचें सोडून देतात.

आपलीं कोणत्याहि विषयासंबंधानें मतें असतील, तीं निर्भीडपणें सांगण्यास भिऊं नये. कधीं कधीं त्यामुळें आपला उपहास होईल, पण त्यामुळें आपणास कांहीं अपाय होणार नाहीं. आपलीं खरीं मतें एक प्रकारचीं असून तीं दुसऱ्याप्रकारचीं आहेत असें ढोंग करणें हें मोराचीं पिसें धारण करणाऱ्या डोमकावळ्याप्रमाणें हास्यास्पद आहे. पण आपलीं मतें जशीं आहेत तशीं लोकांच्या नजरेस आल्यास त्यांत कांहीं लाजेचें कारण नाहीं. कांहीं लोक कधीं कधीं केवळ काल्पनिक कारण मनांत आणून त्यामुळें त्रास करून घेतात, व दुसऱ्यांवर रागावून त्यांचा स्नेह तोडतात, तसें आपण करूं नये.

मोकळ्या मनानें वागावें, पण ज्या गोष्टी बोलण्यासारख्या नाहींत त्या बोलूं नयेत. स्वतःविषयीं फार बोलूं नये, स्वतःस अनुकूल किंवा प्रतिकूल असेंहि कांहीं बोलूं नये. पण दुसरे लोक स्वतःविषयीं कांहीं बोलत असले, तर त्यांस खुशाल बोलूं द्यावें. त्यांस तें आव-

डतें म्हणून ते बोलतात. व तुम्हीं त्यांचें बोलणें लक्ष देऊन ऐकलें तर त्यांचें तुमच्याविषयीं चांगलें मत होईल. निदान कोणी मनुष्य मूर्ख अथवा जडबुद्धि आहे असें आपणांस वाटलें तर तसें त्यास बहुधा समजूं देऊं नये. जेथें तसें समजूं देणें आपलें कर्तव्यच असेल तेथें मात्र तसें करावें. जर विनाकारण आपण तसें केलें तर त्या मनुष्याचा अन्याय केल्यासारखें होईल. कदाचित् आपलें मत चुकीचें नसेल कशावरून ? त्याचेंहि आपणाविषयीं तशाच प्रकारचें मत झाल्यास त्याचा फारसा अन्याय होणार नाहीं.

बर्क साहेबानें एके ठिकाणीं म्हटलें आहे कीं, "मी एकाद्या सबंध राष्ट्रावर कसलाहि आरोप कधींहि आणणार नाहीं." त्याप्रमाणेंच एकाद्या जातीच्या किंवा धंद्याच्या सर्व लोकांवर दोषारोप करणें ह्यांत वेडेपणा व अन्याय आहे. एकट्याच मनुष्यास दुखविलें असलें तर तो तुमचा अन्याय विसरेल किंवा त्याबद्दल क्षमा करील. पण लोकसमाजाकडून तसें होण्याची आशा नसते. आणि एकटा मनुष्य देखील नुकसानीबद्दल क्षमा करील, पण अपमानाबद्दल करणार नाहीं. आपली कोणी फजिती केली असतां ती गोष्ट मनुष्याच्या हृदयांत जशी सलते तशी दुसरी कोणतीहि सलत नाहीं. दुसऱ्यांस चिडविलें किंवा त्यांचा मूर्खपणा उघड केला तर त्यापासून आपलें कार्य कधीं साध्य होणार नाहीं.

गेटी नामक प्रसिद्ध जर्मन् तत्त्ववेत्त्यानें एकरमन नामक मनुष्याशीं संवाद ह्या नांवाच्या आपल्या एका ग्रंथांत इंग्रज लोकांविषयीं असें म्हटलें आहे:—

" हे लोक एकाद्या जनसमाजांत येतांना पाहावे. त्यांच्या चेहऱ्यावरून व वागणुकीवरून त्यांची शांतता व स्वावलंबन हीं दिसून येतात. ते जेथें जातात तेथले ते जणूं काय धनीच आहेत आणि सर्व जगावर जणूंकाय त्यांची सत्ता आहे असें वाटतें.

एकरमन---जर्मन् लोकांपेक्षां इंग्लिश लोक जास्त बुद्धिमान् किंवा सुशिक्षित अथवा उदार मनाचे असतात असें तुमचें म्हणणें आहे काय ?

गेटी---माझ्या बोलण्याचा मुद्दा तुम्ही समजला नाहीं. मी इंग्लिश लोकांची तारीफ करितों ती तुम्ही म्हणतां त्या गुणांसंबंधानें नाहीं. त्यांचें श्रेष्ठत्व वरील गुणांवर किंवा त्यांच्या कुलावर किंवा संपत्तिवर मुळींच अवलंबून नाहीं. ज्या गुणामुळें ते श्रेष्ठ आहेत तो हा कीं, ईश्वरानें त्यांना जसे केले आहेत तसे आपण आहों असें दाखविण्याचें त्यांना धैर्य आहे. त्यांच्यामध्यें अर्धवटपणा नाहीं. त्यांचा जो कांहीं गुण असेल तो पूर्ण असतो. ते शहाणे असले तर पुरे शहाणे असतात. कधीं कधीं पुरे मूर्खहि असतात हें मी कबूल करितों. पण अर्धवट शहाण्यापेक्षां पुरा मूर्ख बरा असें मी समजतों."

कोणतेंहि काम करीत असतां किंवा बोलणें चालवीत असतां शांतपणा ठेवावा. पुष्कळ लोकांना आपलें सर्व बोलणें तुम्हीं ऐकून घ्यावेंसें वाटतें. मग त्यांची विनंति तुम्हीं मान्य केली नाहीं तरी त्यांना फारसें वाईट वाटणार नाहीं. वाद करण्याची हौस ज्याला आहे असा मनुष्य भेटला असतां त्याला यथेच्छ बोलूं द्यावें.

म्हणजे तो कंटाळून आपोआप बोलणें बंद करितो.

कांहीं झालें तरी क्रोध येऊं देऊं नये. आणि जर राग आला तर तोंड आवरून धरावें. व राग आला असें लोकांस कळूं देऊं नये.

(दिंडी)

क्रोध सोडुनियां शांतचित्त व्हावें ।
क्षुब्ध होतां मन कुमार्गेंचि धांवें ॥
सौम्य शब्दांनीं कोप शांत होतो ।
तीव्र शब्दें मानवा क्रोध येतो ॥ १

—**इंग्रजी म्हणी**

(ओंवी)

क्रोध तोचि अपस्मार । क्रोध तोचि भूतसंचार ॥
क्रोधें कीजे पिशाच नर । परम चतुर विवेकी ॥ १

—**मुक्तेश्वर**

ज्या ठिकाणीं तुमची जरूर नाहीं तेथे जाऊन आगंतुकी करूं नये. तुम्हाला कांहीं सत्कृत्य करावयाचें असल्यास जगांत पुष्कळ जागा आहे. जेम्स राजा एकदां एका माशीला उद्देशून बोलला,

“ माझीं एवढीं मोठीं तीन राज्यें असतां तूं माझ्या डोळ्यांतच कां उडतेस ? तुला दुसरी जागाच मिळत नाहीं कीं काय ? ”

कित्येकांस भलत्याच वेळीं भलतीच गोष्ट बोलण्याची वाईट लकब लागलेली असते. ज्या गोष्टीपासून पूर्वींच्या दुःखाची आठवण होईल, किंवा मतभेद उत्पन्न होईल अशा गोष्टीचा ते अवेळीं उल्लेख करितात.

मनुष्यस्वभावाचें ज्ञान असणें ही गोष्ट फार मह-

त्वाची आहे. कोणावर विश्वास ठेवावा व कोणावर ठेवूं नये, तसेंच कोणावर किती व कोणत्या बाबतींत विश्वास ठेवावा, ह्याचा निर्णय शहाणपणानें करितां आला पाहिजे. पण ही गोष्ट कांहीं सोपी आहे असें नाहीं. आपल्याबरोबर व आपल्या हाताखालीं काम करण्यासाठीं लागणारे लोक चांगल्या परीक्षेनें पसंत करितां येणें फार महत्त्वाचें आहे. तसेंच, जो मनुष्य ज्या कामास योग्य त्याची त्याच कामावर योजना करितां येणें हेंहि फार अवश्य आहे. नाहींतर 'घोड्यावर हौदा व हत्तीवर खोगीर', असा प्रकार होतो.

"एकाद्या मनुष्याविषयीं तुमच्या मनांत कांहीं संशय असल्यास त्याला कामावर लावूं नये. व ज्याला कामावर लाविला त्याच्याविषयीं संशयखोर असूं नये."[1]

संशयखोर लोकांचा संशय चुकीचा असण्याचा बराच संभव असतो. विश्वास ठेवणाऱ्या लोकांचा विश्वास अपात्रीं असण्याचा संभव त्या मानानें फार कमी. विश्वास पूर्ण असावा; पण अविचाराचा नसावा. मर्लीन ह्या नांवाचा एक मनुष्य होता तो फार शहाणा होता. व्हायव्हेन नांवाच्या एका कपटी स्त्रीनें त्याला सांगितलें कीं, माझ्यावर तूं पूर्ण विश्वास तरी ठेव, नाहींतर मुळींच ठेवूं नको. हें तिचें म्हणणें त्यानें वेडेपणानें कबूल केल्यानें त्याचा सर्वस्वीं नाश झाला.

नेहमीं फार धूर्तपणानें वागावें. आपली मसलत गुप्त ठेवावी. जर तुम्हीं आपली मसलत गुप्त ठेविली नाहीं तर

१. कान्फ्युशस

लोक तरी कां ठेवितील? "शहाण्याचें तोंड त्याच्या हृदयांत असतें, व मूर्खाचें हृदय त्याच्या तोंडांत असतें" अशी इंग्रजींत एक म्हण आहे. म्हणजे शहाण्या मनुष्यास जें जें वाटेल तें सर्वच तो बोलून दाखवीत नाहीं. पण मूर्ख मनुष्य जें मनांत येईल तें विचार न करितां बोलून टाकतो.

आपल्या विचारशक्तीचा उपयोग करावा. आपली विचारशक्ति नेहमीं बिनचूक असते असें जरी नाहीं, तरी तिची मदत घेतल्यानें आपल्या हातून पुष्कळ कमी चुका होतील.

"भाषण हें रुप्यासारखें आहे किंवा असलें तरी पाहिजे. पण मौन हें सोन्यासारखें आहे" अशी इंग्रजींत म्हण आहे. तिचा अर्थ असा कीं, पुष्कळ प्रसंगीं बोलण्यापेक्षां मौनच जास्त श्रेयस्कर असतें.

पुष्कळ लोक भाषण करितात तें त्यांच्यापाशीं कांहीं बोलण्यासारखें असतें म्हणून नाहीं, तर कांहींतरी बोलण्याची त्यांना हौस असते म्हणून बोलतात. विचार करून जे शब्द येतील तेच बोलावे. जिभेला येतील ते बोलूं नयेत. वाचाळपणा किंवा कांहींतरी बोलण्याची हौस ज्याला असते त्याला बहुधा आपल्या कामांत यश येणार नाहीं. "पुष्कळ लोक बोलण्याच्या भरांत जें मनांत असतें त्याहून भलतेंच कांहीं तरी बोलून जातात. व मग त्यांना वाटतें कीं, असें आपण बोललों नसतों तर बरें झालें असतें. किंवा ते कांहीं तरी गैरशिस्त गोष्ट बोलतात. ती बोलण्यांत त्यांचा कांहीं हेतु असतो

असें नाहीं. पण त्यांच्या जिभेला कांहीं तरी चाळा करावासा वाटतो. अशा प्रकारची बेसुमार बडबड करण्याची ज्याला संवय आहे त्याला संसारांत अनेक अडचणी व त्रास उत्पन्न होतात. ज्याला उद्देशून ती बडबड असेल त्याच्या मनांत त्वेष उत्पन्न होतो. इतर लोकांमध्यें कलह माजतो. व पूर्वीं थोडीशी चुरस असते ती सहज नाहींशी होण्यासारखी असली तरी वाढते."
"ज्या मनुष्याला चांगलें भाषण करण्याची अक्कल नाहीं, व मौन केव्हां धारण करावें हें समजण्याचें तारतम्य नाहीं, तो मोठा अभागी होय."

डेमारेट्स याजविषयीं प्लूटार्कनें एक आख्यायिका सांगितली आहे ती अशीः—एका सभेंत डेमारेट्स हजर असून कांहीं बोलला नाहीं. तेव्हां त्याला एकानें प्रश्न केला कीं, तुम्ही कांहीं बोललां नाहीं ते तुम्हीं मूर्ख आहां म्हणून कीं तुम्हाला शब्द आठवेनात म्हणून? त्यावर डेमारेट्स ह्यानें उत्तर केलें कीं, जो मनुष्य मूर्ख आहे त्याला आपलें तोंड आवरतां येणारच नाहीं.

सालोमन् ह्यानें म्हटलें आहे:—

" एकाद्या अगदीं मूर्ख मनुष्यास देखील ताळ्यावर आणितां येईल; पण उतावीळपणें बोलण्याची संवय ज्याला लागली आहे त्याची सुधारणा करणें फार कठिण आहे."

आपलें श्रेष्ठत्व दाखविण्याचा कधीं यत्न करूं नये. लोकांचा कमीपणा त्यांस दाखवून दिला असतां त्यांना जसें दुःख होतें तसें दुसऱ्या कशापासून होत नाहीं.

१. बटलरचीं व्याख्यानें २. लेब्रेयर

आपल्या बोलण्याच्या खरेपणाबद्दल फार आग्रहानें बोलूं नये. आपणास आपल्या म्हणण्याच्या खरेपणाबद्दल कितीहि खातरी असली तरी कदाचित् आपली चूक असण्याचा संभव आहे. आपल्या स्मरणशक्तीला एकादे वेळीं विलक्षण भूल पडते. आणि आपले डोळे व कान कधीं कधीं आपणास फसवितात. आपल्या मनांत कांहीं खोटे ग्रह झालेले असतात. जरी आपलें म्हणणें खरें असलें तरी त्याच्या खरेपणाबद्दल अति आग्रह न धरल्यानें कांहीं नुकसान होणार नाहीं.

कोणतेंहि कृत्य करावें कीं नाहीं, ह्यासंबंधानें बेताबाहेर विचार करीत बसूं नये. आणि संधि आली असतां ती दवडूं नये. एकादी गोष्ट अगदीं साध्य होण्याच्या बेतास आली असतां देखील अनेक विघ्नें येऊन ती साध्य होत नाहीं.

योग्य समयाची वाट कशी पहावी हें ज्याला ठाऊक आहे त्याला सर्व गोष्टी साध्य होतात, असें एका ठिकाणीं म्हटलें आहे; संधी आली म्हणजे ती तात्काळ साधावी.

(ओंवी)

योग्य समय दैवें आलिया । न होय कार्याची स्फूर्ति जया ।।
स्फूर्ति मागुनी होतां तया । नकारघंटा गळां पडे ।। १

भर्तृहरीनें म्हटलें आहे:—

का हानिः समयच्युतिः ।

भावार्थः—चांगली संधि आली असून ती व्यर्थ घालविली तर त्यासारखी दुसरी हानि नाहीं.

एकदां आलेली संधि दवडली म्हणजे पुनः दुसरी येण्याचा बहुधा संभव नसतो.

(श्लोक)

संसाराब्धिस जेधवां भरति ये, तैं तीस जे साधिती ।
भाग्या पावति तेचि, दीन दुसरे मागें सदा लोंवती ॥
आहे पूर्ण समुद्रि नाव आपुली आतां, क्रमूं मार्ग रे ।
राहे जों अनुकूल ओध, अथवा भग्नाश होऊं खरे ॥ १

—शेक्सपिअर

सावधगिरी ठेवावी पण फाजील सावधगिरी ही बरी नाहीं. चूक होईल म्हणून फाजील भीति बाळगूं नये. " ज्या मनुष्याच्या हातून कधींच चूक होत नाहीं त्याच्या हातून कांहींच होणार नाहीं. "

पोपाख नीटनेटका करावा. पोपाख करणें जर अवश्य आहे तर तो चांगला करावा हेंच योग्य आहे. पण त्यांत नटवेपणा करूं नये. व पैशाचा व वेळाचा व्यर्थ खर्च करूं नये. कापड चांगलें असावें. एकाद्या मनुष्याची परीक्षा करितांना लोक त्याच्या पोपाखावरून किती भुलतात ह्याचा विचार केला तर खरोखर आश्चर्य वाटण्यासारखें आहे. ज्या लोकांचा आपल्याशीं संबंध येतो त्यांपैकीं पुष्कळ लोक आमच्या पोपाखावरून बऱ्याच अंशीं आमची परीक्षा करीत असतात. व पुष्कळ लोकांस आमच्या बाह्य देखाव्याशिवाय आमची परीक्षा करण्यास दुसरें कांहीं साधन नसतें. " डोळे आणि कान मनुष्यांचें अंतःकरण खुलें करितात. " म्हणजे बाह्य स्वरूपानें व बोलण्यानें डोळे व कान तृप्त झाल्यावर अंतःकरणहि प्रसन्न होतें. जगांत एका मनुष्यास तुमची पूर्ण माहिती असली तर शंभर माणसें केवळ

तुमचें बाह्य स्वरूप पहात असतात. दुसरी गोष्ट अशी कीं, आह्मीं आपल्या पोषाखाबद्दल जर निष्काळजी व अव्यवस्थित असलों, तर दुसऱ्या कामांतहि तसेच असूं असें लोकांनीं अनुमान केलें, तर त्यांस फारसा दोष देतां येणार नाहीं.

मंडळींत असतांना ज्यांच्या रीतीभाती सर्वांत उत्तम व संतोषकारक असतात त्यांचें वर्तन लक्षपूर्वक पहावें. रीतीभातींच्या योगानें मनुष्यास मनुष्यत्व येतें अशी एक जुनी म्हण इंग्रजी भाषेंत आहे. तींत थोडीशी अतिशयोक्ति आहे, पण बराच सत्याचा भाग आहे. "सुभग आकृति ही एक कायमचें शिफारसपत्र आहे.[1]" "चांगल्या रीतीभातींचा परिणाम प्रत्येक मनुष्यावर थोडाबहुत होतोच. आणि कित्येकांवर तर त्यांचाच सर्व परिणाम होतो.[2]" "मनुष्याच्या अंगीं कितीहि चांगले गुण असले व कितीहि ज्ञान असलें तरी त्यांच्या योगानें दुसऱ्याचें मन वश होत नाहीं. तें वश झाल्यावर कदाचित् त्यांच्या योगानें आपली छाप कायम ठेवितां येईल. आपल्या मुद्रेनें व हावभावांनीं नेत्र खुष करावे. मधुर आणि चित्तवेधक भाषणानें कान तृप्त करावे. मग अंतःकरण सहजच तुम्हांस वश होईल.[3]" डोळे आणि कान प्रत्येकाला आहेत. पण चांगली विचारशक्ति सर्वांना नसते. जग ही एक रंगभूमि आहे; आपण सर्व नट आहों. एकादें नाटक ज्या रीतीनें करून दाखवावें त्याप्रमाणें श्रोतृजनांवर त्याचा बरा

१. बेकन २. बिशप मिडलटन ३. लॉर्ड चेस्टरफील्ड

वाईट परिणाम होतो, हें प्रत्येकास माहीत आहे.

लॉर्ड चेस्टरफील्ड आपल्या मुलासंबंधानें एके ठिकाणीं म्हणतो:—लोक मला सांगतात कीं, माझ्या मुलाची ज्या ज्या लोकांना चांगली माहिती झाली आहे ते सर्व त्याच्यावर प्रेम करितात. पण माझी अशी इच्छा आहे कीं, त्याची माहिती होण्यापूर्वीच केवळ दृष्टादृष्ट होतांच तो लोकांस आवडावा. आणि नंतर सावकाश त्यानें त्यांची प्रीति संपादन करावी. बाह्य देखाव्यासंबंधाच्या गोष्टी फारशा महत्वाच्या नाहींत असें ज्याला वाटतें त्याला मानवी स्वभावाची मुळींच माहिती नाहीं असें म्हटलें पाहिजे. ह्या गोष्टीकडे जितकें लक्ष द्यावें तितकें थोडें. ह्याच गोष्टींनीं अंतःकरण वश होतें, व अंतःकरणाच्याच तंत्रानें विचारशक्ति बहुधा जात असते.

मनुष्याला संसारांत विद्वत्तेपासून जितकी मदत होते तितकीच बहुधा मोहक रीतीभातींनीं होते. “ एकाद्यानें हत्ती नेला तरी त्याला कोणी बोलत नाहीं. पण दुसऱ्या एकाद्यानें बाहेरून जरा आंत नजर फेंकिली तर ती खपत नाहीं. ” ह्याचें कारण काय? पहिला आपलें काम लोकांस खुप ठेवून करितो व दुसरा लोकांस दुखवून करितो. होरेस म्हणतो कीं, तारुण्य, वक्तृत्व, कला, इत्यादि गुण अंगीं असून मोहक वागणूक नसेल, तर त्यांचा व्हावा तसा उपयोग होत नाहीं.

प्रकरण ३

द्रव्य

(ओंव्या)

आधीं प्रपंच करावा नेटका । मग पहावें परमार्थविवेका ॥
एथे आळस करूं नका । विवेकीहो ॥ १

प्रपंच सोडोनि परमार्थ केला । तरी अन्न मिळेना पोटाला ॥
मग त्या करंट्याला । परमार्थ कैंचा ॥ २

—रामदास

प्रकरण ३

द्रव्य

मितव्ययाचें महत्त्व पुष्कळ लोकांस जितकें कळावें तितकें कळत नाहीं. एक वृद्ध मनुष्य म्हणतो, 'माझ्या मुला, तुझी श्रीमंती किंवा गरिबी ही तुझ्या प्राप्तीपेक्षां तुझ्या खर्चावर जास्त अवलंबून राहील.'

श्रीमंत होण्याची गोष्ट राहूं द्या. पण अडचणीच्या प्रसंगाकरितां कांहीं द्रव्य राखून ठेवणें हें प्रत्येकास अवश्य आहे. इंग्रजींत अशी एक म्हण आहे कीं, "दारिद्र्य दाराजवळ येऊन डोकावूं लागलें म्हणजे घरांत असलेलें प्रेम खिडकीवाटे पळून जाऊं लागतें."

(श्लोक)

माता निन्दति नाभिनन्दति पिता भ्राता न संभाषते ।
भृत्यः कुप्यति नानुगच्छति सुतः कान्ताच नालिङ्गते ॥
अर्थप्रार्थनशङ्कया न कुरुते संभाषणं वै सुहृत् ।
तस्माद्द्रव्यमुपार्जयस्व सुमते द्रव्येण सर्वे वशाः ॥ १

—सुभाषित

भावार्थः—दरिद्री मनुष्यास आई देखील टाकून बोलते, बाप त्याजवर प्रेम करीत नाहीं, भाऊ त्याच्यांशीं भाषण करीत नाहीं; त्याजवर नोकर देखील रागावतो; त्याचा मुलगा त्याची आज्ञा मानीत नाहीं; त्याची बायको सुद्धां निष्ठुर होते; तो द्रव्य मागेल ह्या भीतीनें मित्र त्याला विचारीनासा होतो, तस्मात् हे सुमते, द्रव्यप्राप्तीचा उपाय कर. द्रव्यानें सर्व अनुकूल होतात.

(अभंग)

धनवंता लागीं । सर्व मान्यता हे जगीं ॥

माता पिता बंधुजन । सर्व मानिती वचन ॥
जंव चाले मोठा धंदा । तंव वहीण म्हणे दादा ॥
सदा शृंगार भूषणें । कांता लवे बहुमानें ॥ १

—तुकाराम

पण कसेंहि असलें तरी आपल्या मुलांमाणसांस अन्नवस्त्राची तूट पडणें, किंवा प्रसंगविशेषीं औषधाची जरूर पडल्यास तें न मिळणें, किंवा त्यांना कधीं कधीं विसावा घेण्याची आणि हवापाणी बदलण्याची संधि न मिळणें, ह्यासारखें दुःख नाहीं. आपण योग्य प्रकारें उद्योग केला असता व चैनीचे पदार्थ घेण्यांत पैसा उध- ळला नसता, तर त्यांना विपत्ति भोगावी लागली नस- ती, असा पश्चात्ताप होणें हें तर फारच दुःखकारक आहे. केवळ द्रव्यलोभामुळें खर्चाची काटकसर करणें हें अयोग्य आहे. पण आपलें स्वावलंबन राखण्याकरितां मितव्यय करणें हें उचित आहे एवढेंच नाहीं, तर प्रत्येक पुरुषाचें कर्तव्य आहे.

आपल्या लोकांत खाणेंपिणें, पोषाख, वगैरे नेहमींच्या व्यवहारांत बराच मितव्यय दिसून येतो, व तो प्रशं- सनीय आहे. तथापि त्यापासून आपला जसा फायदा व्हावा तसा होत नाहीं. ह्याचीं अनेक कारणें आहेत. त्यांपैकीं एक मुख्य कारण हें आहे कीं आपण कांहीं प्रसंगीं बेसुमार उधळेपणा करितों. जी रक्कम जमा हो- ण्यास कित्येक वर्षांचा उद्योग आणि मितव्यय लाग- तात, तीच रक्कम एकाद्या विवाहासारख्या प्रसंगीं आपण दोन तीन दिवसांत सहज खर्चून टाकितों. धर्मशा-

ऱ्याप्रमाणें असल्या मंगलकार्यांस लागणारा खर्च फार थोडा आहे. असें असतां ऋण काढून सण करण्याची जी प्रबळ रूढि पडली आहे ती फार घातक आहे. तिच्या योगानें अनेक मोठीं घराणीं धुळीस मिळाल्याचीं उदाहरणें प्रत्यहीं नजरेस पडतात.

आपल्या प्राप्तीचा व खर्चाचा नेहमीं हिशोब ठेवणें हें फार अवश्य आहे. आपण अगदीं बारीक सारीक गोष्टींचा तपशील लिहिला पाहिजे असें नाहीं. पण पैसा कसकसा आपल्या हातांतून जातो, व निरनिराळे जिन्नस विकत घेण्यांत आपला किती खर्च होतो हें आपणास समजणें अवश्य आहे. ज्या मनुष्याला आपलें उत्पन्न किती व खर्च किती हें माहित आहे त्याच्या हातून सहसा उधळपट्टी होणार नाहीं. उधळे लोक डोळे झांकून खर्च करीत असतात. ज्याचे डोळे उघडे आहेत तो नाशाच्या मार्गानें जाऊन आपला कडेलोट करून घेणार नाहीं.

ह्याकरितां कांहीं करावयाचें झालें, तरी आपल्या प्राप्तीपेक्षां जास्त खर्च करूं नये. दर वर्षीं कांहीं तरी शिल्केंत टाकावें. आणि कांहीं झालें तरी कर्ज करूं नये. "ऐकाद्या मनुष्याचें वार्षिक उत्पन्न शंभर रुपये आहे व खर्च नव्याणव रुपये आहे, तर त्या मनुष्यास सुख होईल. जर वार्षिक उत्पन्न शंभर रुपये व खर्च एकशें एक रुपये असेल तर त्याला दुःख होईल. आतां

१. डेव्हिड कॉपरफील्ड

ह्या दोघांच्या खर्चामध्यें फक्त दोनच रुपयांचें अंतर असून इतका फरक पडतो. ”

कर्जबाजारीपणा म्हणजे शुद्ध गुलामगिरी आहे. ‘ सदा कर्ज काढी सदा दुःख जोडी ’ अशा अर्थाची इंग्रजींत म्हण आहे. संसारांत पुष्कळ गोष्टी दुःखदायक आहेत. “ भूक, थंडी, आंगभर वस्त्र नसणें, अतिश्रम करावे लागणें, अपमान होणें, आपल्यावर वहीम येणें, विनाकारण टपका मिळणें, इत्यादि गोष्टी फार क्लेश-कारक आहेत. पण कर्ज त्याहून अतिशय कष्टप्रद आहे. जर एकाद्याला महिन्यास दोन रुपयांहून जास्त मिळवितां येत नाहीं, तर त्यानें दररोज अर्धा शेर लाह्या किंवा कुरमुरे घेऊन त्यांवर निर्वाह करावा. पण दुसऱ्याची एक कवडी उसनी घेऊन त्याचा ऋणी होऊं नये. ”[1]

“ जगामध्यें नेहमीं दोन प्रकारचे लोक असतात; एक मितव्ययी, ज्यांनीं द्रव्याचा संग्रह केलेला असतो. दुसरे उधळे, ज्यांनीं सर्व द्रव्य खर्चून टाकिलेलें असतें. मोठमोठ्या हवेल्या, गिरण्या, पूल, जहाजें, आणि मनुष्याच्या उन्नतीस व सुखास कारण होणारीं दुसरीं मोठमोठीं कामें, मितव्यय करून धनाढ्य झालेल्या लोकांकडून झालीं आहेत. ज्यांनीं आपली संपत्ति उधळून टाकिली ते मितव्ययी लोकांचे नेहमीं गुलाम झाले आहेत. असें व्हावें हा सृष्टिनियंत्याचा नियम दिसतो. ”[2]

प्लूटार्क म्हणतो कीं, “ आर्टेमिसच्या देवळांत कोणी ऋणपीडित लोक गेले असतां त्यांना त्यांच्या

१. होरेस् २. कॅव्डन्

सावकारांपासून कांहीं त्रास होत नाहीं, व त्यांस तेथें
सुखानें राहतां येतें. पण त्यांना एफिसस् शहरापर्यंत गेलें
पाहिजे. मितव्ययरूपी आश्रयस्थान जें आहे त्याची मात्र
तशी गोष्ट नाहीं. तें प्रत्येक सुजाण मनुष्याला सर्वत्र
मिळण्यासारखें आहे. त्याचा आश्रय केला असतां आ-
नंदानें आणि अब्रूनें सुखांत राहतां येतें." ह्याकरितां
कोणाचें कर्ज काढूं नये व व्यापाराशिवाय कोणास कर्ज
देऊं नये. पैसा उसना दिला तर परत येण्याचें दूरच,
पण त्याबद्दल फुकाचे आभारसुद्धां मिळत नाहींत.
कारण, देणेकरी लोकांस नेहमीं असें वाटतें कीं, सावकार
हा आपला शत्रु आहे. म्हणून आपल्या शक्तीप्रमाणें
द्यावयाचें असेल तें फुकट द्यावें, पण परत मिळण्याच्या
आशेनें देऊं नये.

पैसा पहिल्यानें थोडा मिळाला म्हणून नाउमेद हो-
ऊं नये. वाईट दिवस नेहमीं तसेच राहतात असें नाहीं.
आणि पैसा पहिल्यापासूनच पुष्कळ मिळूं लागला तर
तो सर्व खर्च करूं नये. कांहीं आपत्कालाकरितां सांठ-
वून ठेवावा. कारण जसे वाईट दिवस नेहमीं राहत नाहींत,
त्याप्रमाणेंच चांगले दिवसहि सदासर्वकाळ नसतात,
आणि जसजसा काळ जातो तसतशीं खर्चाचीं नवीन द्वारें
उत्पन्न होतात. पुष्कळ धंदेवाले लोक प्रथमच फार द्रव्य
मिळूं लागल्यामुळें बेफाम होऊन रसातळास गेले आहेत.

श्रीमंत होण्याकरितां फार उतावीळ होऊं नये. "चि-
तार्‍यानें प्रथम आपल्या तसबिरीची किंमत थोडी आ-
ली म्हणून तसबीर चांगली काढण्यास आळस करतां

कामा नये. म्हणजे कालांतरानें त्याच्या चित्राच्या योग्यतेप्रमाणें किंमत मिळूं लागेल."

पैसा कसा मिळेल म्हणून नेहमीं काळजी करीत वसूं नये. लक्षाधीश होणें हें थोड्याच लोकांचे नशिबीं असतें. पण उद्योगानें व मितव्ययानें पाहिजे त्याला आपला निर्वाह करितां येण्यासारखा आहे. मनुष्य लबाडीनें श्रीमंत झाल्याचें आपण ऐकितों. पण गरिबी देखील पुष्कळ वेळां लबाडीमुळें प्राप्त होते. खरोखर म्हटलें तर ज्याच्या जवळ थोडें द्रव्य आहे ते गरीब नव्हत. तर ज्यांना पुष्कळ गोष्टींची हांव असते तेच गरीब.

(आर्या)

कोण दरिद्री ? ज्याच्या चित्तीं तृष्णा सदा विशाळ वसे ॥
श्रीमान् कोण म्हणावा जो नर संतुष्टचित्त नित्य असे ॥ १

—पद्यरत्नावली

सर जेम्स पेजेट ह्या प्रख्यात गुरूनें आपल्या एका भाषणांत आपल्या विद्यार्थ्यांच्या पुढील आयुष्यक्रमाची माहिती सांगितली ती एणेंप्रमाणें:—एक हजार विद्यार्थ्यांपैकीं दोनशें असे निघाले कीं, त्यांपैकीं कांहींनीं आपला धंदा सोडून दिला, कांहीं वारसपणाच्या हक्कानें श्रीमंत झाले, व कांहीं अकालीं मरण पावले. बाकी ८०० पैकीं ६०० लोक स्वपराक्रमानें बऱ्याच स्थितीस पावले. त्यांपैकीं कांहींना चांगलेंच यश आलें. एकंदरीपैकीं फक्त ९६ लोक असे निघाले कीं, त्यांच्या हातून कांहींच झालें नाहीं. ह्यांपैकीं १९ लोक परीक्षेंत कधींच

१. रस्किन्

पास झाले नाहींत. १० लोकांनीं व्यसनानें आपलें मातेरें करून घेतलें. एकंदर हजारांपैकीं फक्त २५ लोकांनाच अपरिहार्य अडचणीमुळें अपयश आलें.

कोणत्याहि मनुष्यानें जो धंदा पतकरला असेल त्यांत तरबेज होण्याची खटपट करावी. म्हणजे त्याला काम व पैसा मिळण्याची अडचण बहुधा पडणार नाहीं. कालिदास कवीनें म्हटलें आहे:—

न रत्नमविष्याति मृग्यते हि तत्।

ह्याचा भावार्थ असा कीं, रत्न ग्राहकांस शोधीत नाहीं. त्यालाच ग्राहक शोधीत येतात. त्याचप्रमाणें तुकाराम-बोवांचा एक सुंदर दृष्टांत आहे:—

(अभंगचरण)

न लगे चंदना सांगावा परिमळ। वनस्पति–मेळ हाकारूनि॥

संसारांत निर्वाहास लागणाऱ्या वस्तु मिळण्यास खरोखर कोणालाहि फारशी अडचण पडणार नाहीं. परमेश्वरानें आपणांस हवा, प्रकाश, पाणी वगैरे पुष्कळ वस्तू फुकट दिल्या आहेत. आणि कांहीं वस्तु मिळविण्याकरितां मेहनत करावी लागते खरी, पण ती फार नाहीं. चैनीच्या पदार्थांची मात्र तशी गोष्ट नाहीं. ते मिळविण्यास फार खर्च लागतो. फ्रांकलिन ह्यानें म्हटलें आहे कीं, "एका व्यसनास जेवढा खर्च लागतो तेवढ्यांत दोन मुलांचें चांगलें संगोपन व शिक्षण होईल."

भारी व्याज कबूल करणारें कूळ बुडतें आहे असें समजावें, हें ड्यूक ऑफ् वेलिंगटनचें वाक्य नेहमीं ध्यानांत ठेवावें.

एकाच व्यापारांत आपलें सर्व भांडवल गुंतवूं नये. कारण जरी एकाद्या व्यापारांत पैसा घालण्याविषयीं चांगल्या हुषार मनुष्याची सल्ला मिळाली असली, व पोक्त विचार करून आपलेंहि मत तसेंच झालें असलें, तरी अशी एकादी अकल्पित गोष्ट घडून येते कीं, त्यामुळें आपला सर्व अजमास चुकतो, व त्या व्यापारांत आपणास बूड येते. मोठमोठे हुषार व्यापारी आणि पेढीवाले ह्यांच्या हातूनहि चुका होतात. आपण केलेला अजमास ठोकळ मानानें बरोबर ठरावा ह्यापेक्षां कोणाहि समंजस व्यापाऱ्याची अधिक अपेक्षा नसते. दोन आणि दोन चार होतात, हा अंकगणिताचा सिद्धांत आपण लहानपणींच शिकतों. व सिद्धांत ह्या नात्यानें तो अगदीं बरोबर आहे. पण व्यवहारामध्यें त्याची सत्यता दिसून येत नाहीं. संसारामध्यें अनेक अकल्पित कारणांमुळें दोन आणि दोन ह्यांची बेरीज कधीं बावीस होईल व कधीं तीन देखील होईल. आजूबाजूंच्या गोष्टींचा विचार न करितां एकाद्या सिद्धांताच्याच अनुरोधानें व्यवहार केल्यामुळें अनेक होतकरू व्यापाऱ्यांचीं दिवाळीं निघालीं आहेत.

कसाहि प्रसंग आला तरी डगमगूं नये; व शांतपणा कायम ठेवावा. लार्ड ब्रोह्याम ह्याच्याविषयीं असें सांगतात कीं, फोटोग्राफ काढतेवेळीं देखील त्याच्यानें शांतपणानें बसवत नसे. त्यामुळें त्याची तसवीर नेहमीं पुसट येत असे. ब्यागेहॉट ह्याचें असें म्हणणें होतें कीं, पुष्कळ लोकांस एका खोलींत शांतपणें बसतां न आल्यामुळें त्यांना धंद्यांत बूड आली आहे.

प्रत्येक मनुष्य एकप्रकारचा धंदेवालाच आहे, असें म्हटलें असतां चालेल. आपणां सर्वांस कांहीं तरी कर्तव्य-कर्म आहेच. दुसरें कांहीं नसलें तरी घरांतील व्य-वस्था ठेवावयाची असते. व आपला खर्च बेताबातानें चालवावयाचा असतो. ह्या लहानशा धंद्यांत देखील मोठ्या धंद्याप्रमाणेंच अडचणी व संकटें येत असतात.

धंद्यांत यश येण्यास बुद्धिमत्ता फारशी नसली तरी चालेल. पण चतुरपणा, काळजी, आणि सावधान चित्त हे गुण अवश्य आहेत. " तुम्ही आपलें दुकान संभाळा म्हणजे दुकान तुम्हांस संभाळील " अशी एक इंग्रजी म्हण आहे, तिचा अर्थ असा कीं, आपल्या धंद्यावर आपलें चांगलें लक्ष असलें म्हणजे आपणास चांगली प्राप्ति होण्यास कठिण पडणार नाहीं. झेनाफन् ह्यानें अशाच अर्थाची एक गोष्ट सांगितली आहे ती अशी:— इराणच्या बादशहापाशीं एक उमदा घोडा होता, तो लवकर पुष्ट व्हावा असें त्याच्या मनांत असल्यामुळें त्यानें एका चांगल्या अश्ववैद्यास युक्ति विचारिली. तेव्हां त्या वैद्यानें त्याला सांगितलें कीं, ह्या घोड्यावर धन्याची नजर नेहमीं असावी म्हणजे तो तावडतोब पुष्ट होईल.

धंद्यास योग्य अशा संवयी आपणांस लावून घेणें फार जरूर आहे. एका अनुभवी गृहस्थानें आपला ह्या संबंधाचा अनुभव सांगितला आहे तो असा:—" माझ्या पहाण्यांत असे बरेच लोक आले कीं ते हुशार आणि अब्रूदार असून त्यांना संसारांत यश आलें नाहीं. ह्याचें मुख्य कारण एवढेंच कीं, ते बहुतेक आळशी व

अनियमित होते; त्यांना दुसऱ्याबरोबर राहून समाधानानें काम करतां येत नसून लहान सहान गोष्टींत ते आपलाच हेका धरून बसत असत; सारांश ज्याला आपण व्यवहारशून्य म्हणतों त्या प्रकारचे ते लोक होते."

लहान कामांत काय आणि मोठ्यांत काय, व्यवस्था आणि टापटीप हीं अवश्य आहेत. जेथली वस्तू तेथें असावी हा नियम फारच महत्त्वाचा आहे. आपलें काम झाल्याबरोबर हातांतील वस्तू जागच्या जागीं ठेवण्यास थोडीशी खटपट पडते खरी, पण पुनः त्या वस्तूची गरज लागली म्हणजे ती शोधण्यास लागणारी कितीतरी खटपट वांचते. झेनाफन् म्हणतोः—"अव्यवस्था म्हणजे काय? समजा कीं, एकाद्या शेतकऱ्यानें आपल्या कोठारांत बाजरी, गहूं व वाटाणे निरनिराळे न ठेवतां एकत्र ठेविले. व नंतर भाकरी करण्याकरितां शेर दोन शेर बाजरी किंवा गहूं, किंवा आंबटी करण्याकरितां वाटाणे काढावयाचे असले म्हणजे त्याला एक एक कण वेंचून काढावा लागला. ह्याचें नांव अव्यवस्था. दुसरी गोष्ट गलबताची घ्या. गलबतावर प्रसंगास उपयोगीं पडणारें सर्व सामान जागच्या जागीं ठेवण्याची फार जरूर असते. समुद्रांत तुफान केव्हां होईल ह्याचा नेम नसतो. व मग त्या प्रसंगीं लागणारी वस्तू जर आयत्या वेळीं मिळाली नाहीं तर सगळ्या गलबतास जलसमाधि मिळण्यास कांहीं वेळ लागणार नाहीं." म्हणून सर्व वस्तू जागच्या जागीं ठेवण्याची, म्हणजे व्यवस्थितपणानें वागण्याची आपणास संवय लागणें अत्यंत अवश्यक आहे.

आरिस्टाटलपासून कार्लाइलपर्यंत बहुतेक तत्त्ववेत्त्यां-
नीं व्यापारी व धंदेवाले लोकांस तुच्छ मानिलें आहे;
अथवा कोणताहि धंदा किंवा व्यापार करणें हें हलकट-
पणाचें काम मानिलें आहे. प्लेटो नामक विख्यात ग्रीक
तत्त्ववेत्त्यानें "उत्तम प्रजासत्ताक राज्य कसें असावें"
ह्याविषयीं एक ग्रंथ लिहिला आहे. त्यांत त्यानें व्यापारी
लोकांस नागरिक वर्गांतून वगळले आहेत. व्यापारा-
सारखा हलकट धंदा परकी लोकांनीं पाहिजे तर करावा
असें त्याचें मत होतें. वास्तविक म्हटलें म्हणजे व्यापा-
राचा आणि दुकानदारीचा धंदा पुष्कळांनीं पतकरल्या-
शिवाय निभावच लागणार नाहीं; म्हणून जर का
त्या धंद्यापासून मनुष्याच्या स्वभावावर अनिष्ट परिणाम
होत असतील, व त्याच्या मानसिक उन्नतीस विघ्न होत
असेल, तर जगाची फारच हानि होईल ह्यांत शंका नाहीं.
पण सुदैवानें तसा प्रकार मुळींच नाहीं. धंद्यांत गुंतलेल्या
लोकांस विद्याव्यासंग ठेवण्यास थोडाच वेळ फावतो
हें खरें आहे. तथापि त्या थोड्याच वेळाचा उपयोग
करून कांहीं व्यापारी मोठे ग्रंथकार व शास्त्रज्ञ झाले अशीं
अनेक उदाहरणें आहेत. त्यांपैकीं कांहीं एथें सांगतों.
नास्मिथ हा एक कारखानेवाला असून मोठा ज्योतिषी
झाला. ग्रोट हा एक पेढीवाला असून अति विख्यात
इतिहासकार झाला. ह्यानें ग्रीस देशाचा मोठा इतिहास
लिहिला आहे. तो केवळ अमूल्य आहे. सर जेम्स
इव्हान्स ह्याचा कागदाचा कारखाना असून तो इंग्लं-
डांतील प्राक्कालीन वस्तुसंशोधक सभेचा अध्यक्ष व

रायल सोसायटी म्हणून शास्त्रज्ञ लोकांची मोठी सभा आहे तिचा खजीनदार झाला. प्रेस्टविच् हा प्रथम व्यापारी असून मग आक्सफोर्ड एथील विद्यालयांत भूगर्भशास्त्राचा अध्यापक झाला. राजर्स हा पेढीवाला असून कवि झाला. ज्या ग्रंथाच्या आधारें हें पुस्तक रचिलें आहे त्याचे कर्ते सर जॉन लबॉक ह्यांचे वडील पेढीवाले असून मोठे गणिती होते, व रायल सोसायटीचे खजीनदार व उपाध्यक्ष होते. अशीं आणखी पुष्कळ उदाहरणें आहेत. पण तीं स्थलसंकोचास्तव एथें देतां येत नाहींत.

कार्लाइल नांवाचा तत्त्ववेत्ता कांहीं वर्षांमागें इंग्लंडांत होऊन गेला. ह्याला व्यापाराचें जें मुख्य तत्त्व कीं, माल सवंग मिळेल तेथें घेऊन महाग विकेल तेथें विकावा, तें अगदीं नापसंत होतें. तो म्हणतो कीं, सुती कापड व दुसरे इंग्लंडांत होणारे पदार्थ, ह्यांची कमींत कमी किंमत एकदां ठरवून टाकावी. व त्यानंतर ती कधीं कमी करूं नये. आणि इंग्रजांनीं दुसऱ्या राष्ट्रांपेक्षां कमी किंमतीनें आपला माल विकून त्यांचें नुकसान करूं नये. कारण ते दुसऱ्या राष्ट्रांतील लोकांचे बंधु आहेत. म्हणून दुसरीं राष्ट्रें विकतील त्याच किंमतीनें त्यांनींहि आपला माल विकावा. हें कार्लाइलचें मत कधींहि अमलांत आणितां येणार नाहीं. व तें अर्थशास्त्राच्या अगदीं विरुद्ध आहे. इंग्लंड देशांत तेथील लोकांस पुरेसें धान्य होत नाहीं. म्हणून ज्या देशांत धान्य पिकतें त्या देशांत सुती कापड वगैरे पदार्थ पाठवून त्याच्या मोब-

दला इंग्लंडास धान्य न्यावें लागतें. देशादेशांतील व्यापार नेहमीं जिनसांची अदलाबदल करून होत असतो. त्यांत पैशाची देवघेव फारशी होत नसते. इंग्लंडानें होईल तेवढ्या कमी दरानें आपलें कापड विकलें नाहीं तर त्या देशाचें फार थोडें कापड परदेशीं विकलें जाईल. व थोडें कापड विकलें तर परदेशांतून धान्यहि त्या मानानें कमी घेणें भाग पडेल. कार्लाइलच्या म्हणण्याप्रमाणें अमुक प्रमाणाच्या खालीं किंमत उतरावयाची नाहीं असें केलें तर पुष्कळ लोकांस कापडाची जरूर असून त्यांच्यानें ठरलेली किंमत देववणार नाहीं. इंग्लंडास थोड्या किंमतीनें कापड विकणें पुरवत असून त्यानें तसें विकूं नये, असें कार्लाइलचें म्हणणें आहे. तेणेंकरून असें होईल कीं, ज्यांना कापडाची जरूर आहे त्यांना तें मिळणार नाहीं व इंग्लिश लोकांस पुरेसें धान्य मिळणार नाहीं. आपल्या देशांत जो पदार्थ थोड्या खर्चानें तयार होण्यासारखा आहे तो देऊन त्याच्या मोबदला आपल्या देशांत थोड्या खर्चानें होत नाहीं तो पदार्थ घेणें हें तर व्यापाराचें मुख्य तत्त्व आहे. ज्या ठिकाणीं पदार्थ स्वस्त मिळेल तेथें तो विकत घ्यावा, व जेथें पदार्थाची भारी किंमत येईल तेथें तो विकावा हें केवळ व्यापारी लोकांसच फायदेशीर आहे असें नाहीं, तर सर्व लोकांच्या हिताचें आहे. कारण, तसें केल्यानें ज्यांना माल विकण्याची जरूर आहे त्यांचा माल खपतो, व ज्यांना माल विकत घेण्याची जरूर आहे त्यांना तो मिळतो. दुसरा कांहीं मार्ग स्वीकारल्यास 'कोंकणांत

मीठ आणि देशावर मिरच्या नेल्यासारखें' भलतेंच कांहीं तरी होईल.

मनुष्य गरीब स्थितींत असला तरी त्यानें त्याबद्दल दुःख मानण्याचें कारण नाहीं. पुष्कळ सर्वमान्य लोक दरिद्रावस्थेंत असूनहि फार सुखी व सौजन्ययुक्त होते. प्रख्यात इंग्लिश कवि वर्डस्वर्थ ह्याचें कांहीं वर्षेंपर्यंत फारच थोडें उत्पन्न होतें. पण तो काल त्याच्या आयुष्यांत फारच सुखाचा होता. श्रीमंती सर्वांच्याच नशिबीं नसते. परंतु प्रियजनांचा सहवास व प्रेम ह्यांच्या योगानें एकादी लहानशी झोंपडी देखील नंदनवनाप्रमाणें होईल. दरिद्रावस्थेंत असलेल्या महात्म्यांची संख्या केवढी मोठी आहे ह्याचा विचार केला तर खरोखर आश्चर्य वाटण्यासारखें आहे.

पैशाच्या योगानें आपलें जें कार्य होतें तें पुष्कळ लोकांस वाटतें त्यापेक्षां फार कमी असतें. पैसा असला म्हणजे खाण्यापिण्याचें सौख्य मिळतें असें कोणी म्हणेल, पण श्रीमंत मनुष्याला निरोगी रहावयाचें असेल तर त्यानें गरीब मनुष्याप्रमाणेंच खाण्यापिण्याचा बेत ठेविला पाहिजे. एकादा गरीब मनुष्य शेतांत काम करून आल्यावर जोंधळ्याची भाकरी आणि चटणी खातो. श्रीमंत मनुष्य पंचपक्वान्नें भक्षण करितो. ह्या दोघांपैकीं कोण आपलें अन्न अधिक रुचीनें खातो बरें? आणि कोणाचें शरीर जास्त पुष्ट आणि बळकट असतें?

१. सर रिचर्ड टेंपल

चांगली क्षुधा लागली म्हणजे साधें जेवण देखील राज-वाड्यांतील मिष्टान्नाप्रमाणें स्वादिष्ट लागतें.

कोणी म्हणेल कीं, पैशाच्या योगानें नानाप्रकारचे ग्रंथ विकत घेतां येतात, आणि विद्येचें सुख मिळतें. पण विद्येची आवड असून ज्यांना दारिद्र्यामुळें पुस्तकें वाचावयास मिळालीं नाहींत असे लोक फारच थोडे असतील. भगवद्गीता, व तुकाराम, रामदास, श्रीधर, वामन, मुक्तेश्वर, कालिदास, शेक्सपिअर, मिल्टन् इत्यादिकांचे ग्रंथ फारच थोड्या किंमतीस मिळतात. खरोखर वाचनाची हौस असेल तर स्नेह्यांकडून देखील हे ग्रंथ वाचावयास मिळतील. दरमहा चार सहा आणे वर्गणी दिल्यास एकाद्या वाचनालयांत प्रवेश होऊन अनेक ग्रंथ आणि वृत्तपत्रें व मासिक पुस्तकें वाचावयास मिळतील. जॉन्सन् सारख्या विद्वानांनीं वाचनाचा व लेखनाचा जो प्रचंड उद्योग केला तो दरिद्रावस्थेंतच नव्हे काय ?

पैशाच्या योगानें आरोग्य, बुद्धिमत्ता, मित्रलाभ, सौंदर्य, अथवा गृहसौख्य ह्यांपैकीं कांहींतरी मिळतें म्हणावें तर तसेंहि नाहीं. ज्यांच्यावर कोणाचें प्रेम नाहीं असे श्रीमंत लोक थोडे आहेत काय ? तसेंच ज्यांना एक वेळचें अन्न मिळण्याची भ्रांत, असे कांहीं लोक, सर्व जगास प्रिय झाले नाहींत काय ?

(श्लोक)

आहे सौख्यद वित्त काय मनुजा पाहे विचारूनियां ।
राहे दुःख किती समर्थसदनीं भोगांस वेष्टूनियां ॥
नाहीं इच्छित वित्त वैभव हि मी श्रीमद्गृहीं जें वसे ।

जेणें केवळ यातना लपविती सौख्या सदा दूरसे ॥ १

—गो

वेकन म्हणतो कीं, "श्रीमंत लोक आपल्या स्वतः-चीच ओळख विसरतात; आणि संपत्तीची व्यवस्था करण्यांत इतके गुंग होतात, कीं स्वतःच्या शरीराची काळजी घेण्यास किंवा आपलें मन सुसंस्कृत करण्यास देखील त्यांना वेळ फावत नाहीं."

कोणत्याहि प्रकारचें बंधन झालें तरी तें अनिष्टच होय. *सोन्याची बेडी झाली म्हणून ती दुःख दिल्यावांचून राहणार नाहीं. द्रव्यापासून फार अस्वस्थता उत्पन्न होते. गरीब लोकांस एक प्रकारच्या काळज्या असतात तर श्रीमंत लोकांस दुसऱ्या अनेक प्रकारच्या असतात. आणि पुष्कळ श्रीमान् लोक आपल्या संपत्तीचे धनी नसून केवळ तिचे गुलाम असतात. कित्येक लोकांस द्रव्यापासून सुख होण्याचें एकीकडे राहून त्यापासून काळजी आणि यातना मात्र होतात.

(श्लोक)

धनं तावदसुलभं । लब्धं कृच्छ्रेण रक्ष्यते ॥
लब्धनाशो यथा मृत्युस्तस्मादेतन्न चिन्तयेत् ॥ १
जनयन्त्यर्जने दुःखं । तापयन्ति विपत्तिषु ॥
मोहयन्ति च सम्पत्तौ । कथमर्थाः सुखावहाः ॥ २
यथा ह्यामिषमाकाशे । पक्षिभिः श्वापदैर्भुवि ॥
भक्ष्यते सलिलैर्नक्रैः । तथा सर्वत्र वित्तवान् ॥ ३

(अभंगचरण)

* चंदनाचा शूळ सोनियाची बेडी । सुख नेदी फोडी प्राण नाशी ॥

—तुकाराम

भावार्थः—धन हें प्रथम दुर्लभ आहे. तथापि तें प्राप्त झालें असतां त्याचें रक्षण करण्यास फार प्रयास पडतात. धन मिळवीत असतां दुःख देतें, विपत्कालीं ताप देतें, उत्कर्षाच्या वेळीं मोह उत्पन्न करितें, तर मग द्रव्य सुखदायक आहे असें कोण म्हणेल? ज्याप्रमाणें मांसाचा तुकडा आकाशांत पक्षी, पृथ्वीवर पशु, व पाण्यांत मासे खातात, त्याप्रमाणें वित्तवान् मनुष्याची सर्वत्र स्थिति होते.

द्रव्य जवळ असल्यामुळें पुष्कळांचा नाश झाला आहे. आणि एकंदरींत पैशासंबंधानें श्रीमंत जितके हवालदील असतात तितके गरीब लोक नसतात. पैशापासून फक्त शहाण्या लोकांनाच सौख्य मिळवितां येईल. ज्या मनुष्यास श्रीमंत होण्याची फार हांव असते तो नेहमीं दरिद्री राहील. "जो[1] मनुष्य एकाद्या लहानशा घरांत राहतो त्याला राजवाड्याचें मोठें आश्चर्य वाटतें, व त्यांतील सुखाच्या व वस्तूंच्या संबंधानें भव्य व सुंदर कल्पना त्याच्या मनांत येतात. पण ज्याला राजवाड्यांत प्रत्यक्ष रहावयास मिळतें त्याला त्यांत कांहीं विशेष वाटत नसून त्याला नवल वाटण्यासारखी कांहींच वस्तू रहात नाहीं. ह्या दोहोंपैकीं पहिल्यासच जास्त सुख होतें."

द्रव्यापासून सौख्य मिळावें असा हेतु असेल तर द्रव्यावर आसक्ति ठेवून उपयोग नाहीं.

सादी नामक मुसलमान कवि म्हणतो, "आपल्यास पुरेसेंच द्रव्य असलें तर त्यापासून सौख्य होतें. पण त्यापेक्षां जास्त असलें तर त्याची काळजी घेण्यांतच मनुष्य बेजार होतो."

१. रस्किन्

(श्लोक)

नाहीं अश्व बसावया मज जरी मी मुक्त आहें तरी ।
ओझें वंधन यांजपासुनि न मी राजा कुणाचा जरी ॥
नेणें मी नृपशासना न वश मी शोकास चिंतेस वा ।
शांतात्मा, सुखदुःखनिस्पृह सदा, भीतों न मी या भवा ॥ १

—सादी

भर्तृहरीनेंहि अशाच प्रकारचा उद्गार काढलेला आहे:—

त्वं राजा वयमप्युपासितगुरुप्रज्ञाभिमानोन्नताः ।
ख्यातस्त्वं विभवैर्यशांसि कवयो दिक्षु प्रतन्वन्ति नः ॥
इत्थं मानद नातिदूरमुभयोरप्यावयोरन्तरं ।
यद्यस्मासु पराङ्मुखोसि वयमप्येकान्ततो निस्पृहाः ॥ १

भावार्थः—

तूं राजा जरि मी श्रुतिस्मृति महा विद्याभिमानी असें ।
भाग्यें विश्रुत तूं मदीय कविता सत्कीर्ति लोकीं वसे ॥
आहे अंतर फार तूज मज रे तूं सर्व जैं सेविशी ।
मीही निस्पृह भाग्यवंत गणना नाहीं मशी फारशी ॥ १

—वामन

तुकारामबोवा यांस शिवाजी महाराजांनीं पालखी, अब्दागीर वगैरे पाठवून आपल्या दरबारीं निमंत्रण केलें, तेव्हां त्या निस्पृह भगवद्भक्तानें जें उत्तर पाठविलें त्यांत असें म्हटलें आहे:—

नहों केविलवाणें नहों आह्मी दीन । सर्वदां शरण पांडुरंगीं ॥
पांडुरंग आह्मां पाळिता पोषिता । आणिकांची कथा काय तेथें ॥
तुझी भेट घेणें काय हो मागणें । आशेचें हें शून्य केलें तेणें ॥
निराशेचा गांव दिधला आह्मांसी । प्रवृत्तिभागासी सांडियेलें ॥ १

"ज्या मनुष्यास इच्छिण्यासारखें कांहींच उरलें नाहीं व पुष्कळ वस्तूंचा उपभोग घेऊन कंटाळा आला आहे त्याची स्थिति फारच शोचनीय होय."

—बेकन

(श्लोक)

तूं वांकसी खर जसा धनभारयोगें ।
नेशी सुवर्णभर त्यापरि तूंहि मार्गे ॥
ओझें तुझ्यावरिल मृत्यु हरील भारी ।
तूं द्रव्ययुक्त असुनीहि खरा दरिद्री ॥ १

—शेक्सपीअर

(अभंग)

साखरेच्या गोण्या बैलाचिया पाठीं । तयासी शेवटीं करबाडें ॥
मालाचे पैं पेटे वाहताती उंटें । तयांलागीं कांटे भक्षावया ॥ १

—तुकाराम

असें जर आहे तर,

(श्लोक)

किमर्थ धनचिंतनीं दवडितों अशी काल हा ।
रुजा तनुसि गांजितां धन न देइ मोदा अहा ॥
क्षणैक तरि वाढवील धन काय ह्या आयुला ।
प्रयाणसमयीं जिवास तरि काय दे शांतिला ॥ १

—गे

जसजसें द्रव्य मिळतें तसतसा लोभ जास्त वाढतो. "गरीब मनुष्यास पुष्कळ वस्तूंची इच्छा असते. पण लोभी मनुष्यास जगांतील एकंदर वस्तु मिळण्याची हांव असते."[1]

"संपत्तीचा फार हव्यास लागला म्हणजे त्याच

१. सेनेका २. बेकन

चिंतेंत अतिशय कालक्षेप होतो, व द्रव्यार्जनापेक्षां उदात्त गोष्टींकडे लक्षच जात नाहीं." संपत्तीच्या योगानें आपल्या आयुष्याचा सदुपयोग झाला तर त्या संपत्तीचा खरा उपयोग होतो. संपत्तीच्या पायीं आयुष्याचा दुरुपयोग झाला तर ती संपत्ति घेऊन काय करावयाची आहे? "दरिद्रता ही विद्वान् मनुष्याची सहधर्मचारिणी आहे" असें एके ठिकाणीं म्हटलें आहे. ज्या कवीला आपल्या प्रतिभाशक्तीच्या योगानें आकाशमार्गानें उड्डाण करितां येतें त्याला गाड्याघोड्यांची काय परवा आहे?

पैशासंबंधानें जे शब्द बोलण्यांत येतात त्यांचा भावार्थ विचार करण्यासारखा आहे. अमक्या मनुष्यानें पुष्कळ पैसा मिळविला, अमुक मनुष्य संपत्तींत अगदीं बुडून गेला आहे, असें वर्णन आपण पुष्कळ ऐकतों. पण अमुक मनुष्यानें संपत्तीचा चांगला उपभोग घेतला असें आपल्या क्वचित् ऐकण्यांत येतें. जे लोक पैसा मिळवितात ते स्वतः त्याचा उपभोग बहुतकरून घेत नाहींत. मनुष्य पैशाचा संग्रह अतिशय करतो आणि शेवटीं त्याचा उपभोग कोण घेईल हें त्याला देखील ठाऊक नसतें.

एका ग्रीक ग्रंथकारानें श्रीमंतीपेक्षां गरिबी चांगली असें प्रतिपादन केलें आहे. तो म्हणतो:—"भयापेक्षां निर्भयता चांगली; परवशतेपेक्षां स्वतंत्रता चांगली; आपल्या देशबांधवांच्या अविश्वासापेक्षां त्यांचा विश्वास चांगला, ह्या सर्व गोष्टी कोणीहि कबूल करील. मी

जेव्हां श्रीमंत होतों तेव्हां मला नेहमीं अशी भीति वाटे कीं चोर माझें घर फोडतील, माझा पैसा लुटतील, आणि मला मारतील. पण आतां मला स्वस्थ झोंप येते. आतां सरकारच्या मनांत माझ्याविषयीं कांहीं संशय येत नाहीं. आतां शहरांतून पाहिजे तेव्हां बाहेर जाण्यास व परत येण्यास मी मुखत्यार आहें. मी श्रीमंत होतों तेव्हां लोकांनीं हलकट मानिलेले साक्रेटिस् व इतर तत्त्ववेत्ते यांच्याशीं सहवास केला तर लोक मला दोष देत असत. आतां मला वाटेल त्याच्याशीं मैत्री करण्यास कोणाची आडकाठी नाहीं. कारण मी गरीब दशेंत आल्यापासून कोणी माझ्याकडे लक्षच देत नाहीं. जेव्हां माझ्यापाशीं पुष्कळ जिनगी होती तेव्हां मी नेहमीं दुःखी असें; कारण नेहमीं माझी कांहीं तरी वस्तु हरवत असे. आतां माझ्यापाशीं हरवण्यासारखें कांहीं राहिलेंच नाहीं. पण पुढें कांहीं तरी मिळवीन ह्या आशेनें मला नेहमीं समाधान वाटतें."

च्यारिमिडीसच्या वरील उद्गारांत बराच सत्याचा भाग आहे. पण त्यांत ह्या विषयाच्या दुसऱ्या बाजूचा विचार झालेला नाहीं. च्यारिमिडीस ह्यानें हें भाषण केलें, त्यापूर्वीं नुकतेंच त्यानें उत्तम भोजनाचें सुख घेतलें होतें व संगीताच्या श्रवणानें त्याचें मन उल्लसित झालें होतें, म्हणून त्याच्या तोंडांतून असे उद्गार निघाले हें साहजिकच आहे.

पैशाचा शहाणपणानें उपयोग केला असतां त्याच्यापासून पुष्कळ चांगल्या गोष्टी घडून येतात. द्रव्य ही

एक शक्ति आहे. 'पैसा हा राजांचा राजा आहे' असें एकानें म्हटलें आहे. आपणास कांहीं वस्तु पाहिजे असेल तर ती पैशानें साध्य होते. ताजी व स्वच्छ हवा, चांगलें घर, ग्रंथसंग्रह, इत्यादि उपभोग्य वस्तु पैशानें प्राप्त होतात. कोणाला विश्रांति व फुरसद पाहिजे असल्यास तीं द्रव्यानें मिळवितां येतात. पृथ्वीवरील निरनिराळीं स्थळें पाहण्याची हौस पैशानें पुरवितां येते. आपल्या मित्रांस साहाय्य करणें व विपत्तीनें गांजलेल्या लोकांचें दुःख निवारण करणें ह्यांत जर कांहीं सौख्य असेल तर तें पैशाच्या योगानें मिळवितां येतें. पण हें सर्व होण्यास पैशाचा लोभ उपयोगी नाहीं.

कृपण मनुष्याचें पैशावरच प्रेम असतें. म्हणून तो अयोग्य प्रकारची काटकसर करून पैसा सांठवीत असतो. ह्या आयुष्यामध्यें क्षुद्र व नीच अशा चिंता मनुष्यानें आपल्या मनास लावून घेऊं नयेत, हें जर खरें आहे तर द्रव्यसंचयाची चिंता व्यर्थ कशास पाहिजे ?

पैशाचा शहाणपणानें उपयोग करणें हीच गोष्ट महत्त्वाची आहे.

(श्लोक)

यद्ददासि विशिष्टेभ्यो । यच्चाश्नासि दिने दिने ॥
तत्ते वित्तमहं मन्ये । शेषं कस्यापि रक्षसि ॥ १

—सुभाषित

भावार्थः—

(आर्या)

पात्रीं दान करिसि जें, जें भोगिसि वित्त तूं प्रतिदिनीं वा ।
तेंचि तुझें धन वाटे, अवशिष्ट परार्थ रक्षिसी ठेवा ॥ १

ह्याच अर्थाची भर्तृहरीची एक उक्ति आहेः—

(आर्या)

दानं भोगो नाशस्तिस्रो गतयो भवंति वित्तस्य ॥
यो न ददाति न भुंक्ते तस्य तृतीया गतिर्भवति ॥ १

भावार्थः—

(आर्या)

दान भोग नाश अशा तीन गती ह्या धनास होतात ॥
भोगी न जो न देई, पावे तिसरी गतीच तद्वित्त ॥ १

औदार्य असावें, पण उधळेपणा करूं नये.

(श्लोक)

धना बहुत मेळवी नर परी दरिद्री खरा ।
दरिद्र करि आपणा परहितीं धनी तो खरा ॥
अनाथ जन पोशि जो करित तो प्रभूला ऋणी ।
सुधर्म करि, संपदा प्रभु तयास देई दुणी ॥ १

—इंग्रजी म्हणी

तथापि गरीब लोकांवर उपकार करतांना आपल्या मुलाबाळांचीहि आठवण ठेविली पाहिजे. आपण आपल्या श्रमानें जें मिळवितों त्याच्यावर आपली स्वतंत्र मालकी आहे. पण वडिलार्जित धनाचे आपण एकटे मालक नाहीं.

धनवान् लोकांपाशीं असलेलें द्रव्य ही एक ठेवच आहे. त्या ठेवीचा हिशोब त्यांना द्यावा लागेल. संपत्तीचा गर्व वाहण्याचें कांहीं कारण नाहीं.

(श्लोक)

आपद्गतं हससि किं द्रविणान्ध मूढ ।
लक्ष्मीःस्थिरा न भवतीति किमत्र चित्रम् ॥

एतान्न पश्यसि घटान् जलयन्त्रचक्रे ।
रिक्ता भवन्ति भरिताश्चरिक्ताः ॥ १

—सुभाषित

भावार्थः—

(श्लोक)

द्रव्यांध हाससि किमर्थ विपन्न लोकां ।
लक्ष्मी असे चल न हें तुज ठाउकें कां ॥
हे पाहसी न घट तूं जलयंत्रवर्ती ।
होती रिते भरित पूर्णहि रिक्त होती ॥ १

म्हणून संपत्तीवर विश्वास न ठेवितां त्या मंगल-दायक प्रभूच्या ठिकाणीं निष्ठा ठेवावी. पैशाचा सदुपयोग करावा. दानधर्म करावा. ऐहिक संपत्तीप्रमाणें जें विनाशी नाहीं, व ज्याला चोराची, किंवा कीटकांची भीति नाहीं, अशा पुण्यधनाचा संग्रह करून ठेवावा. तोच परलोकीं आमच्या उपयोगीं पडेल.

प्रकरण ४
मनोरंजन

(श्लोकचरण)

विश्रामं लभतामिदं हि शिथिलज्याबंधमस्मद्धनुः ।

—शाकुंतल

भावार्थः—ह्या आमच्या धनुष्याची दोरी सैल सोडून त्याला कांहीं वेळ विश्रांति देऊं.

प्रकरण ४

मनोरंजन

मागील पृष्ठावरील दुष्यंत राजाची उक्ति आपल्या शरीररूपी व मनोरूपी धनुष्यांसहि लागू करण्यासारखी आहे. ज्या मनुष्यास सारा दिवस काम करावें लागतें त्यानें कांहीं वेळ विश्रांति घेण्यांत व खेळ खेळण्यांत घालविला नाहीं तर त्याची तरतरी नाहींशी होऊन त्याच्या अंगीं जडपणा येतो. घरांत बसून करण्याचीं जीं कामें असतात त्यांच्या योगानें मनुष्य अशक्त आणि नाजूक होण्याचा संभव असतो. खेळ खेळण्यांत घालविलेला वेळ फुकट गेला असें समजूं नये. शारीरिक खेळानें शरीर चांगलें बनतें, व बहुतेक व्यवसायांनीं आकुंचित होत असलेली छाती व बाहू सुदृढ होतात.

खेळांच्या योगानें प्रकृति निरोगी रहाते एवढेंच नाहीं, तर मनुष्यास आपलें काम करण्यास उल्हास वाटतो. खेळ खेळत असतां दुसऱ्या लोकांशीं निकट संबंध येतो, त्यांच्याशीं मनमिळाऊपणानें वागण्याची संवय होते, व क्षुल्लक गोष्टींत आपलाच हेका धरून बसण्याचा स्वभाव नाहींसा होतो. इतर लोकांशीं न्यायानें व उदारपणानें वागण्याची संवय लागते.

खेळापासून शरीराची व मनाची देखील सुधारणा होते. धैर्य, सोशिकपणा, आत्मसंयमन, विनोदीपणा इत्यादि गुण पुस्तकें वाचून किंवा शिकून येत नाहींत.

पण खेळ खेळल्यानें हे गुण अंगीं येतात. ड्यूक ऑफ् वेलिंगटन् ह्यानें म्हटलें आहे कीं, ' वाटरलूची लढाई ज्या गुणांच्या योगानें जिंकली गेली, ते गुण इटन येथील विद्यालयाच्या क्रीडाभूमीवर खेळत असतांना प्राप्त झालेले होते.' शाळेंत मुलें शिकत असतात त्यावेळीं तीं क्रीडाभूमीवर जे धडे शिकतात, तेच सर्वांत उत्तम व उपयोगी होत. खेळापासून असा मोठा उपयोग होतो, तरी ते मनोरंजनाकरितां खेळावे. खेळणें हा एक आपला धंदाच करून बसतां कामा नये.

खेळांपासून प्रकृतीवर काय चांगले परिणाम होतात ह्याविषयीं दोघां प्रख्यात शारीरशास्त्रज्ञांचीं मतें दिलीं असतां अप्रासंगिक होणार नाहीं.

सर जेम्स पॅजेट म्हणतो:—" खेळांपासून मनोरंजनाचा हेतु चांगल्याच रीतीनें सिद्धीस जातो. परंतु व्यवहारांत व दररोजच्या आपल्या कामांत फार उपयोगीं पडणारे अमोलिक मानसिक गुण खेळांच्या योगानें प्राप्त होतात. कारण खेळांत पैसा मिळण्याची किंवा अशीच दुसरी हलक्या प्रकारची कांहीं लालूच नसून तरुण व प्रौढ लोक यांचा समागम होतो, व ते एकत्र काम करितात. न्यायानें व संभावितपणानें वागणाऱ्या कोणत्याहि मनुष्यास जोडीदार घेऊन एकादें चांगलें कृत्य कसें करावें हें त्यांस समजूं लागतें. दुसऱ्या मनुष्यांस बरोबर घेऊन काम करण्याची उत्तम हातोटी त्यांस साधते, व ती त्यांस हरएक स्थितींत यश येण्यास साधनभूत होते. एकादा मनुष्य जात्या न्यायी स्वभावाचा नसला

तरी त्याला न्यायानें वागण्याचें वळण लागतें. खेळ खेळणारांत कितीहि चढाओढ असली तरी अन्यायानें डाव जिंकणें हें सर्वानुमतें निंद्य मानीत असतात. ज्याला न्यायानें खेळ खेळण्याची संवय एकदां झाली त्याला व्यवहारांत देखील सचोटीनें वागावेंसें वाटतें. खेळ खेळत असतांना जर नीतीचीं उदात्त तत्त्वें अंगांत खिळलीं असलीं तर व्यवहारांत ज्या गोष्टींस कायद्यांचा प्रतिबंध नाहीं, परंतु नीतिदृष्ट्या ज्या निंद्य आहेत अशा गोष्टींचा तिटकारा आल्याविना राहणार नाहीं. कोणत्याहि चांगल्या खेळांत खालीं लिहिलेले तीन विशेष गुण दृष्टीस पडतात, व त्यांच गुणांमुळें ते खेळ फार उपयोगी झाले आहेत. पहिला गुण म्हटला म्हणजे हा कीं, खेळाचा काय परिणाम होईल हें निश्चयानें सांगतां येत नसतें. दुसरा गुण असा कीं, त्यांत नवल वाटण्यासारख्या गोष्टी होतात. तिसरा गुण हा कीं, आपल्या नेहमींच्या कामाहून भिन्न अशा कामांत आपलें कौशल्य दाखविण्याच्या पुष्कळ संधी खेळांत मिळतात. आतां ह्या तीन गुणांचा उपयोग फार मोठा आहे. पुष्कळ लोकांस नेहमीं एकच प्रकारचें कंटाळवाणें काम करावें लागतें. व त्यामुळें त्यांना आपलें जीवित त्रासदायक वाटण्याचा संभव असतो. परंतु खेळांच्या योगानें त्यांना नवीन व आनंददायक परिस्थिति अनुभवितां येते. व तेणेंकरून संसारयात्रा सुखकर वाटते. पुष्कळ लोकांच्या अंगीं असलेल्या सुस्वभावाचें व सद्गुणांचें चीज होण्यास त्यांच्या धंद्यांमुळें व्यवहारांत

अवसरच मिळत नाहीं. व त्यामुळें त्या गुणांचा ऱ्हास होतो. अशा गुणांचा व स्वभावाचा खेळांत उपयोग करितां येतो व त्यांचा विकास करितां येतो."

मिचेल फास्टर, शारीरशास्त्राचे गुरु व रायल सोसायटीचे चिटणीस ह्यांनीं एका व्याख्यानांत सांगितलें कीं,—"केवळ शारीरिक काम करीत असतां देखील मेंदूला बरीच क्षीणता उत्पन्न होते. मानसिक श्रमांच्या योगानें मेंदू क्षीण होतो हें सर्वांस ठाऊक आहेच. आज-पर्यंत जे शोध लागले आहेत त्यांवरून असें सिद्ध होतें कीं, शारीरिक श्रम करीत असतां स्नायूंमध्यें व डोक्याचें काम करीत असतां मेंदूमध्यें रासायनिक फेरफार होत असतात. स्नायु व मेंदू चांगल्या स्थितींत रहाण्याकरितां त्यांस ताज्या स्वच्छ रक्ताचा पुरवठा मिळाला पाहिजे. म्हणजे तेणेंकरून ज्या भागांचा क्षय झालेला असतो ते भरून येतात व रासायनिक फेरफारामुळें जीं नासकीं द्रव्यें उत्पन्न झालेलीं असतात तीं धुऊन जातात. स्वच्छ रक्ताचा पुरवठा होण्यास शरीरांतील हलक्या प्रतीच्या इंद्रियांची मदत झाली पाहिजे. हल्लीं जीवनार्थ कलह फारच झपाट्याचा असल्यामुळें मेंदूस फार काम करावें लागतें; त्याच्याबरोबर हलक्या प्रतीच्या इंद्रि-यांचा टिकाव लागत नाहीं. त्यामुळें त्यांच्याकडून मेंदूस पाहिजे तेवढें स्वच्छ रक्त पुरविण्याचें काम नीट होत नाहीं. मेंदूचें काम करीत असतां थकवा येऊं लागला म्हणजे समजावें कीं, मेंदूस रक्त पुरविणारी इंद्रियें शिथिल झालीं आहेत. मग मेंदूस रक्ताचा पुरवठा

न झाल्यामुळें त्याच्याकडून चांगल्या रीतीनें काम होत नाहीं. म्हणून मेंदूचें काम अधिक वेळ पर्यंत करितां यावें असा हेतु असेल तर तो साध्य करण्याचा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे हा आहे कीं, खेळ खेळून आपलीं हलक्या दर्जाचीं इंद्रियें कार्यक्षम ठेवावीं. म्हणजे तीं मेंदूस रक्ताचा योग्य पुरवठा करितील आणि त्यास लवकर थकवा येऊं देणार नाहींत."

श्वापदांची पारध करणें, बंदुकीनें पक्षी मारणें इत्यादि शिकारीचे प्रकार आहेत त्यांपासून मनोरंजन होतें व व्यायामहि होतो. जे लोक स्वतः शिकारी कुत्रीं बरोबर घेऊन पारधीस जात नाहींत किंवा स्वतः बंदूक मारीत नाहींत त्यांना देखील शिकारीची मोठी मौज वाटते. आपल्या देशांत राजे लोकांत वगैरे पूर्वींपासून शिकारीस जाण्याचा प्रघात होता. अभिज्ञान शाकुन्तल नाटकांत दुष्यंत राजाचा सेनापति भद्रसेन ह्यानें शिकारीपासून काय फायदे होतात ते वर्णन केले आहेत.

(श्लोक)

मेदच्छेद कृशोदरं लघुभवत्युत्थानयोग्यं वपुः ।
सत्त्वानामपि लक्ष्यते विकृतिमच्चित्तं भयक्रोधयोः ॥
उत्कर्षः सच धन्विनां यदिषवः सिद्ध्यंति लक्ष्ये चले ।
मिथ्या हि व्यसनं वदन्ति मृगयामीदृग्विनोदः कुतः ॥१

—कालिदास

भावार्थः—मेद झडून उदर कृश होतें. शरीर चपळ होतें. पशूंच्या मनावर भयापासून व क्रोधापासून होणारे परिणाम सहज लक्षांत येतात. धनुर्धराचे बाण जेव्हां धांवत्या किंवा

इतर्‍या प्राण्यांवर अचूक पडतात तेव्हां तर मोठी बहार होते. लोक शिकारीला दुर्व्यसन समजतात ही त्यांची चूक आहे. शिकारीसारखी मौज कशांत आहे?

तथापि आपल्या मौजेकरितां निरुपद्रवी प्राण्याची हिंसा करण्याची प्रवृत्ति दिवसेंदिवस कमी होत जाईल अशी आशा आहे. प्राणी जिवंत असतांना त्यांना पाहून जो आनंद होतो, तो त्यांचा वध केल्यापासून होत नाहीं, व व्यायाम, मनोरंजन आणि स्वच्छ हवा ह्यांचा लाभ घेण्याचे दुसरेहि निर्दोष मार्ग अनेक आहेत हें मनुष्यास समजलें पाहिजे.

मनुष्य निरोगी रहाण्यास स्वच्छ पाण्याची जरूर आहे. पण स्वच्छ हवेचें महत्त्व त्याहूनहि जास्त आहे. अहाहा! हवा हा काय अद्भुत पदार्थ आहे! हवा आपल्या सर्व शरीरांत संचार करिते. ती आपणांस स्नान घालून आपल्या शरीराची त्वचा स्वच्छ करिते, पण ती इतक्या नाजूक रीतीनें कीं आपणांस तें कळत देखील नाहीं. असें असून हवेच्या अंगीं केवढें सामर्थ्य आहे? ती पुष्पांचा व फलांचा मधुर वास आणून आमच्या खोलींत सोडते. आमचीं गलबतें समुद्रावर चालविते. समुद्रावरील व पर्वतावरील आरोग्य व शुद्धता शहरांच्या भर वस्तींत आणून पोंचविते. नादाचें वाहन हवाच आहे. आपल्या आवडत्या माणसांचे शब्द व सृष्टींतील सर्व मधुर गायन आपल्या कानांपर्यंत पोंचविणारी हवे-शिवाय कोण आहे? पृथ्वीवर मेघ ज्यांतून पाणी सोडतात तो हौद म्हणजे हवाच होय. हवेच्या योगानेंच

दिवसाची उष्णता व रात्रीची थंडी यांचा ताप कमी होतो. आपल्यावर जी भव्य नीलवर्ण कमान दिसते ती वातावरणाची म्हणजे हवेचीच आहे. सकाळीं व सायंकाळीं आकाशास अग्नीसारखा रंग देणारी हवाच आहे. हवा ही एक अत्यंत सुकुमार, रमणीय आणि प्रेमास्पद वनदेवताच आहे असें म्हटलें तरी चालेल. कारण तिच्या अंगीं मृदुता, शुद्धता, कोमलता व परोपयोगित्व हे गुण उत्तम रीतीनें वास करितात.

जेफ्रेज नामक ग्रंथकार म्हणतो:—"आकाश हें जणूंकाय एक मोठें पुष्प आपल्या वरतीं आहे. आणि त्या पुष्पाचा अत्यंत मधुर सुगंध हवेच्या रूपानें पृथ्वीच्या भव्य दिवाणखान्यांत पसरला आहे. वन्य पुष्पांनीं सुवासित झालेली हवा तर फारच मधुर असते. जंगलाच्या झाडीमध्यें नक्षत्रासारखीं चमकणारीं शुभ्र पुष्पें सामान्य वनस्पतींच्या गर्दीतून आपलीं डोकीं वर काढितात, तेव्हां अल्पबुद्धि लोकांच्या मधून आपलें डोकें वर काढणाऱ्या बुद्धिमान् पुरुषांची कल्पना मनांत येते. एकादा सामान्य रस्ताहि अनेक सुंदर कल्पना मनांत आल्यामुळें रमणीय भासतो. मी स्वित्सरलंदांत असतांना एका ओढ्याच्या शुभ्र फुलांनीं आच्छादिलेल्या कांठावर दररोज सकाळीं फिरावयास जात असें. त्याच ठिकाणीं मी नेहमीं उत्कंठेनें फिरावयास जातों व दुसरीकडे जाण्याची मला कां इच्छा होत नाहीं ह्याचें कारण त्यावेळीं माझ्या लक्षांत आलें नाहीं. पण नंतर फार वर्षांनीं आलें. तें कारण हेंच कीं, मला नवीन

नवीन वस्तूंची इच्छा नाहीं. जुन्याच परंतु मला प्रिय झालेल्या अशा वस्तूंचाच मला फार लोभ वाटतो. तींच वनांतील फुलें, तेंच झाड, तेंच हिरवेंगार मैदान, तेच पक्षी हीं सर्व मला पुनःपुनः पहावीशीं वाटतात." आपल्या ह्या देशांत नाना प्रकारचीं वन्य फुलें विशेषें-करून पावसाळ्यांत दृष्टीस पडतात. एकाद्या उंच टेंकडी-वर जाऊन खालच्या मैदानाकडे पाहिलें असतां सर्वत्र मोठमोठे उंच गालिचे पसरले आहेत असा भास होतो. कांहीं ठिकाणीं पांढऱ्या, पिंवळ्या, अस्मानी वगैरे फुलांचे ताटवे दृष्टीस पडतात; जणूं काय वनश्रीचीं हीं शुभ्र, पीत, नील, वर्णांचीं वस्त्रेंच वाळत टाकलीं आहेत असें वाटतें." अरण्याची शोभा तर अवर्णनीय असते.

(श्लोक)

सौमित्रे शोभते पम्पा । वैडूर्यविमलोदका ॥
फुल्लपद्मोत्पलवती । शोभिता विविधैर्द्रुमैः ॥ १
सौमित्रे पश्य पम्पायाः । काननं शुभदर्शनम् ॥
यत्र राजन्ति शैला वा । द्रुमाः सशिखरा इव ॥ २
शोकार्तस्यापि मे पम्पा । शोभते चित्रकानना ॥
व्यवकीर्णा बहुविधैः । पुष्पैः शीतोदका शिवा ॥ ३
अधिकं प्रविभात्येतन्नीलपीतं तु शाद्वलम् ॥
द्रुमाणां विविधैः पुष्पैः । परिस्तोमैरिवार्पितम् ॥ ४
पुष्पभारसमृद्धानि । शिखराणि समंततः ॥
लताभिः पुष्पिताग्राभिरुपगूढानि सर्वतः ॥ ५
पश्य रूपाणि सौमित्रे । वनानां पुष्पशालिनाम् ॥
सृजतां पुष्पवर्षाणि । वर्षंतोयमुचामिव ॥ ६
प्रस्तरेषु च रम्येषु । विविधाः काननद्रुमाः ॥
वायुवेगप्रचलिताः । पुष्पैरवकिरान्ति मां ॥ ७

पतितैः पतमानैश्च । पादपस्थैश्च मारुतः ॥
कुसुमैः पश्य सौमित्रे । क्रीडतीव समंततः ॥ ८
मत्तकोकिलसन्नादैर्नर्तयन्निव पादपान् ॥
शैलकन्दरनिष्क्रान्तः ॥ प्रगीत इव चानिलः ॥ ९
सुपुष्पितांस्तु पश्यैतान् ॥ कर्णिकारान् समंततः ॥
हाटकप्रतिसंछन्नान्नरान् पीताम्बरानिव ॥ १०

—वाल्मीकि रामायण

भावार्थः—रामचंद्र म्हणतात, "लक्ष्मणा ! नाना प्रकारच्या वृक्षांनीं अलंकृत, प्रफुल्लित, श्वेत कमलांनीं व नीलकमलांनीं युक्त, आणि वैडूर्य रत्नासारख्या निर्मल उदकानें भरलेलें हें पंपासरोवर फारच शोभायमान दिसत आहे. लक्ष्मणा ! त्या समोरच्या सुंदर वनाकडे क्षणभर पहा. त्या वनांत मोठमोठे वृक्ष शिखरयुक्त पर्वतांप्रमाणें दिसत आहेत. मी यद्यपि दुःखी आहें तथापि चित्रविचित्र वनांनीं वेष्टिलेलें, नाना प्रकारच्या पुष्पांनीं भरलेलें, शीत जलानें परिपूर्ण असें सरोवर पाहून माझ्या मनास आल्हाद होत आहे. नानाप्रकारच्या पुष्पांनीं नीलवर्ण आणि पीतवर्ण दिसणारी ही हिरवीगार वनभूमि अत्यंत मनोहर दिसते. झाडांच्या सर्व फांद्या फुलांनीं भरलेल्या आहेत. व त्यांवर पुष्पयुक्त सुंदर वेली चढल्यामुळें फारच शोभा दिसत आहे. वृक्ष जणूं काय फुलांचा पाऊस पाडीत आहेत. पहा, हा वायु, खालीं पडलेल्या, पडत असलेल्या व वृक्षांवर असलेल्या पुष्पांच्या योगानें क्रीडा करीत आहे. मत्त कोकिलांच्या मधुर ध्वनीनें तल्लीन होऊन वृक्ष जणूं काय नृत्य करीत आहेत. गुहेच्या तोंडाशीं तो वायु गायन करीत आहे. तसेंच हे पुष्पांनीं आच्छादिलेले कर्णिकार वृक्ष पीतांबर परिधान करून सुवर्णभूषणें घातलेल्या पुरुषाप्रमाणें शोभत आहेत.

अमुक दिवशीं हवा वाईट आहे, व अमुक दिवशीं चांगली आहे, असें लोक म्हणतांना आपण ऐकतों. पण

वास्तविक म्हटलें तर हवा कधींच वाईट नसते. सर्व प्रकारची हवा निरनिराळ्या प्रकारें रमणीय असते. कांहीं एक प्रकारची हवा शेतांस किंवा पिकांस अपायकारक असते. पण मनुष्यास सर्व प्रकारची हवा चांगली आहे. सूर्यप्रकाश आपणास आनंद देतो. पावसानें आपणास हुषारी येते. वाऱ्याच्या योगानें आंगांत तकवा येतो. जेथें बर्फ पडतें तेथें त्याच्या योगानें मनास आल्हाद होतो.

रस्किन् म्हणतो कीं, वास्तविक पाहतां वाईट हवा कधींच नसते. चांगल्या हवेचे निरनिराळे प्रकार मात्र असतात.

विश्रांति घेणें ही गोष्ट फार अवश्य आहे. विश्रांतींत घालविलेला वेळ आळसांत गेला असें समजूं नये. शरदृतूमध्यें एकाद्या झाडाच्या छायेखालीं हिरव्यागार मैदानांत कांहीं वेळ पडून जलप्रवाहाचा मधुर आवाज ऐकत बसणें, आकाशांत मेघ इकडून तिकडे जातांना पहाणें, वगैरे प्रकारच्या करमणुकींत गेलेला वेळ फुकट गेला असें मानूं नये. बहुतेक व्यायाम स्वच्छ हवेंत घेण्यासारखेच असतात. व अशाच प्रकारचे व्यायाम आपण करावे. म्हणजे तेणेंकरून व्यायाम व स्वच्छ हवा ह्या दोहोंचाहि लाभ एकदम होतो. घोड्यावर बसून सहल करणें फारच हितावह आहे, परंतु पायीं फिरणें देखील फायदेशीर आहे. प्रत्येक मनुष्यानें दररोज निदान दोन तास पर्यंत तरी उघड्या हवेंत घालविणें हें आपलें एक महत्वाचें व पवित्र काम आहे असें समजलें पाहिजे.

स्वच्छ हवा केवळ शरीरालाच सुखकर असते असें

नाहीं. तर मनास देखील ती हितावह आहे. स्वच्छ हवेंत फिरावयास गेल्यानें सृष्टीचे नाना चमत्कार आपल्या दृष्टीस पडून आपल्या मनास आल्हाद देतात. सृष्टि जणूं काय आपणास कांहीं तरी महत्त्वाची गोष्ट सांगण्यास तयार आहे असें वाटतें. आणि तें खरेंच आहे. सृष्टीपासून शिकण्यासारखें ज्ञान अनंत व अमोलिक आहे.

पृथ्वी, आकाश, अरण्यें, शेतें, तलाव, नद्या, पर्वत, समुद्र हे आपले सर्वोत्तम शालागुरु आहेत. पुस्तकांत जें ज्ञान नाहीं तें हे गुरु शिकवितात. खेड्यापाड्यांत जाऊन तेथें एकाद्या नदींत स्वतः वल्हवून नाव चालविणें, रानांतील फुलें गोळा करणें, एकाद्या खाणींतून प्राचीन कालच्या प्राण्यांचे व वनस्पतींचे अवशिष्ट भाग शोधून काढणें, समुद्रकिनाऱ्यावर जाऊन तेथें नाना प्रकारच्या चित्रविचित्र शिंपा व समुद्रांतील वनस्पती गोळा करणें, चेंडूफळी वगैरे खेळ खेळणें, इत्यादि अनेक प्रकारांनीं आपणांस व्यायाम आणि स्वच्छ हवा ह्या दोहोंचाहि लाभ होतो. त्याच्या योगानें आपली शरीरप्रकृति निरोगी होते एवढेंच नाहीं, तर आपल्या चिंता व मानसिक व्यथा ह्यांचें दुःख बऱ्याच अंशीं हलकें होतें. सृष्टिवैभवाच्या देखाव्यानें आपलें मन शांत, प्रसन्न व उल्हासित होतें.

मनोरंजनाचा वर सांगितल्याप्रमाणें मोठा उपयोग आहे. परंतु आपला सर्व काळ सुखांत व मनोरंजनांत घालविणें सर्वथा अयोग्य होय. कारण एक तर तसें केल्यानें निवळ आपलपोटेपणा होऊन परोपकाराच्या अ-

प्रतिम आनंदास आपण मुकतों. व दुसरें असें कीं, साराच वेळ जर ख्यालीखुशालींत घालविला तर त्यापासून सुख होण्याचें एकीकडे राहून उलटा वीट मात्र येतो. म्हणून खेळ खेळणें हा आपला एक धंदाच आहे असें समजून चालतां कामा नये. परंतु नेमस्तपणानें सुखोपभोगांत वेळ घालविल्यास तो आळसांत गेला असें समजूं नये.

आतां महत्त्वाचा प्रश्न असा आहे कीं, मनोरंजन ह्या सदराखालीं कोणत्या कोणत्या गोष्टींचा समावेश कारितां येईल ? उपभोग पुष्कळ प्रकारचे आहेत व कांहीं मिथ्या आहेत.

प्लेटोनें आपल्या एका ग्रंथांत ह्याच विषयावरील प्रोटार्कस व साक्रेटीस् ह्यांच्यामधील संवाद दिला आहे तो एणेप्रमाणें:—

प्रोटार्कस्—बरें, साक्रेटिस्, खरीं सुखें म्हणून तुम्ही म्हणतां तीं कोणतीं ?

साक्रेटिस्—सुंदर रंग, सुंदर आकृति, मधुर सुवास, सुस्वर आवाज इत्यादि वस्तू अशा आहेत कीं, त्या आपणापाशीं नसल्या तर दुःख होत नाहीं. पण असल्या तर त्यांपासून सुख होतें. अशा प्रकारच्या वस्तूंपासून होणारें जें सौख्य तें खरें सौख्य होय.

इंद्रियांपासून वर सांगितलेले खरे उपभोग जरी प्राप्त होतात, तरी ह्या जगांतील सर्वोत्कृष्ट सौख्य त्यांपासून होत नाहीं.

फिवियस् ह्याचें असें म्हणणें होतें कीं, "शारीरिक

उपभोग, सौख्य आणि आनंद हे प्रत्येक मनुष्यास हितकर आहेत. परंतु माझें असें म्हणणें आहे कीं, ह्या सुखांपेक्षां शहाणपणा, ज्ञान, चांगली स्मरणशक्ति, विचारशक्ति इत्यादि गोष्टी अधिक चांगल्या व श्रेयस्कर आहेत."

भगवद्गीतेमध्यें सुखाचे तीन प्रकार सांगितले आहेतः—

(श्लोक)

सुखं त्विदानीं त्रिविधं । शृणु मे भरतर्षभ ॥
अभ्यासाद्रमते यत्र । दुःखांतंच निगच्छति ॥ १
यत्तदग्रे विषमिव । परिणामेऽमृतोपमम् ॥
तत्सुखं सात्त्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ॥ २
विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ॥
परिणामे विषमिव । तत्सुखं राजसं स्मृतं ॥ ३
यदग्रे चानुबंधेच । सुखं मोहनमात्मनः ॥
निद्रालस्यप्रमादोत्थं । तत्तामससमुदाहृतं ॥ ४

भावार्थः—

(आर्या)

जा आधीं विषवत् जें परिणामीं अमृततुल्य जें टिकतें ॥
स्वस्थपणें मनबुद्धी उपजे, सुख बोलतात सात्त्विक तें ॥ १
विषयेंद्रियसंयोगें आरंभीं अमृततुल्य जें दिसतें ॥
परिणामीं विषवत् जें जाणावें सुख सदैव राजस तें ॥ २
आरंभीं परिणामीं मोह करी तें मनासि जें दुष्ट ॥
निद्रा प्रमाद अलसें, उपजे, सुख म्हणति तामसी स्पष्ट ॥ ३

ह्या जगांत खऱ्या सुखाचीं साधनें असंख्य प्रकारचीं आहेत असें म्हटलें तरी चालेल. आपल्या आप्तांचा व इष्टमित्रांचा सहवास, चांगलें संभाषण, पुस्तकें, संगीत,

काव्यें, कला, व्यायाम, विश्रांति, सृष्टींतील नाना प्रकारचे सुंदर देखावे, हिंवाळा, पावसाळा, उन्हाळा, सकाळ आणि संध्याकाळ, रात्र आणि दिवस, ऊन आणि पाऊस, अरण्यें आणि शेतें, नद्या, सरोवरें, समुद्र, प्राणी आणि वनस्पती, झाडें, फुलें, पानें आणि फळें, हीं त्यांपैकीं कांहीं आहेत. आणखी मनुष्यास ठाऊक नाहींत अशीं सुखाचीं साधनें अनेक असतील. व तीं मनुष्याची उन्नति जसजशी वाढेल तसतशीं क्रमाक्रमानें आपणांस कळूं लागतील. ज्याच्या योगानें एकाद्या मनुष्याचें भाषण किंवा गायन जसेंच्या तसें रक्षण करितां येतें व नंतर पाहिजे तेव्हां काढतां येतें असें जें फोनोग्राफ नामक यंत्र हल्लीं तयार झालें आहे तें एक नवीन सुखाचें साधन आहे. फोटोग्राफ अथवा सूर्यप्रकाशाच्या योगानें मनुष्याची हुबेहुब तसवीर काढण्याची कला ही त्या वर्गांतील होय.

ह्या आयुष्यापासून आपणास सुखोपभोग होत नसेल तर तो दोष खरोखर आपला आहे. रस्किन् म्हणतो, "सुखोपभोग घेणें हें सर्वांस सुसाध्य आहे. पण एकादें महत्कार्य करून जीवित सफल करणें हें मात्र फार कठिण आहे."

आरेबियन् नाइट्स ह्या ग्रंथामध्यें एका जादूच्या गालिचाची गोष्ट सांगितली आहे. त्या गालिचावर कोणी मनुष्य बसला तर त्याला तो गालिचा इच्छिलेल्या ठिकाणीं नेऊन पोंचवीत असे. आगगाडीच्या योगानें

हल्लीं आपणां सर्वांस वरील अजब चिजेप्रमाणें उपयोग होत आहे.

सुखोत्पादक साधनांमध्यें चांगल्या संभाषणाची योग्यता बरीच मोठी ठरेल. काम करून थकल्याभागलेल्या मनुष्याच्या मनास व शरीरास हुषारी आणणारें तें उत्तम औषधच आहे असें म्हटलें तरी चालेल. हेरिक् ह्यानें बेन् जॉनसनच्या संभाषणापासून आपणास किती आनंद होत असे त्याचें वर्णन केलें आहे:—

(आर्या)

भोजनसमयीं होती पात्रें जरि पूर्ण विविध मिष्टान्नीं ॥
धालों तसा न त्यांनीं, धालों जैसा तुझ्या अमृतवचनीं ॥१

जॉनसन् ह्याला एकादी सायंकाळची वेळ मौजेंत गेली असें सांगावयाचें असलें म्हणजे तो म्हणत असे कीं, आज चांगल्या चांगल्या संभाषणांचा लाभ झाला. आणि खरोखरच एकाद्या विद्वान्, चतुर, आणि विनोदी मनुष्याशीं केलेलें संभाषण स्वच्छ हवेसारखें उत्साहवर्धक असतें.

चांगलें संभाषण करणें सर्वांसच साधत नाहीं. कांहीं लोक फार बुद्धिमान् असतात, व त्यांच्यापाशीं पुष्कळ मनोरंजक माहिती असते; ते एकदां बोलूं लागले म्हणजे त्यांचें भाषण फार चित्तवेधक होतें. पण त्यांना बोलावयास लावणें म्हणजे महाप्रयत्नाचें काम असतें. चांगलें संभाषण करणारा मनुष्य सर्वत्र प्रिय असतो. संभाषण करण्याची कला इतर कलांप्रमाणेंच संपादन करितां

येण्याजोगी आहे. बोलण्याची संवय असल्याशिवाय चांगलें बोलतां येणें कठिण आहे.

सर विल्यम् टेंपल म्हणतो, "संभाषण चांगलें होण्यास चार गोष्टी अवश्य आहेतः—सत्य, सदर्थ, सौजन्य आणि विनोद." ह्यांपैकीं निदान पहिल्या तीन गोष्टी प्रत्येक मनुष्यास साध्य होण्यासारख्या आहेत.

पुष्कळ लोक असे आहेत कीं त्यांचें बहुतेक ज्ञान-भांडार संभाषणापासून प्राप्त झालेलें असतें. बेकन म्हणतो कीं, "जाणत्या मनुष्यास प्रश्न करून पुष्कळ ज्ञान मिळवितां येतें व तें आपल्या मनांत चांगलें ठसतें. ज्या विषयांत एकादा मनुष्य प्रवीण असेल त्याच विषया-संबंधानें त्याला प्रश्न करावे. म्हणजे त्या मनुष्यास उत्तर देण्यास आनंद वाटतो. आणि आपणासहि ज्ञानाचा यथेच्छ लाभ होतो."

ज्ञानेश्वर महाराजांनीं वक्ता आणि श्रोता हे दोन्ही एका ठिकाणीं जमले म्हणजे ज्ञाननिष्पत्ति कशी होते त्याचें वर्णन केलें आहे:—

(ओंवी)

अहो चंद्रकांत द्रवता कीर होये। परी ते हातोटी चंद्रीं कीं आहे॥
म्हणवूनि वक्ता तो वक्ता नोहे। श्रोतेंविण॥ १

चांगलें संभाषण करितां येणें हें प्रत्येक मनुष्यास अवश्य आहे. संभाषणाच्या योगानें दुसऱ्याच्या दुःखाचें सांत्वन करितां येतें; उदास मनुष्याची मुद्रा सुप्रसन्न करितां येते. दुर्वृत्त मनुष्यास युक्तीनें सुमार्गाचें वळण लावितां येतें. भोजनाच्या वेळीं, आगगाडींतून प्रवास

करितांना वगैरे प्रसंगीं चांगल्या संभाषणाच्या योगानें वेळ मौजेंत जाऊन सर्वांस सुख होतें. सहल करीत असतांना किंवा सृष्टीचें अवलोकन करीत असतांना एकादा रसिक मित्र आपणाबरोबर भाषण करण्यास असला तर आपल्या आनंदांत चांगलीच भर पडते. एकादा आनंदी आणि विनोदी मित्र मंडळीमध्यें आनंदी-आनंद करून सोडतो हें पुष्कळांनीं पाहिलेंच असेल. म्हणून प्रत्येक मनुष्यानें संभाषणाची कला साध्य करण्याचा प्रयत्न करावा. एकवेळ मुखस्तंभाप्रमाणें स्तब्ध रहाण्याची संवय झाली म्हणजे ती शेवटपर्यंत तशीच रहाते. संभाषण उपयुक्त आणि बोधप्रद होण्यास फावल्या वेळांत कांहीं निवडक ग्रंथ, वृत्तपत्रें व मासिक पुस्तकें ह्यांचें अवलोकन सुरू असलें पाहिजे. संभाषणाचे मुख्य हेतु मनोरंजन आणि सहजरीत्या ज्ञानाची अदलाबदल हे होत. संभाषणाची भाषा सोपी असावी. विद्वत्ता दाखविण्याचा प्रयत्न नसावा; विनयशीलता असावी. भांडखोरपणा नसावा. भाषण मार्मिक असावें पण छद्मी नसावें. एकाद्या कारणानिमित्त एकत्र जमलेल्या मंडळींत आपला प्रत्यक्ष शत्रु जरी असला अगर आपणांस नावडता मनुष्य असला तथापि लागट भाषण करून त्याचा पाणउतारा करणें शिष्टसंप्रदायाविरुद्ध आहे. म्हणून भाषणांत विनोद असावा पण तो मर्मच्छेदक नसावा. दुसऱ्यास लघुत्व आणून मंडळीस हांसविण्याचा मोह झाल्यास तो प्रयत्नानें दाबून टाकावा. नाहींतर संभाषण हें मनोरंजनाचें साधन न होतां वैर उत्पन्न करण्याचें

साधन होईल. सायंकाळच्या वेळीं कुटुंबांतील मंडळींनीं कांहीं उपयुक्त आणि मनोरंजक विषयावर संभाषण करण्याचा परिपाठ ठेवल्यास मुलांबाळांसहि चांगलें वळण लागतें.

पुष्कळ लोकांस सौंदर्य ह्या गुणाची परीक्षा नसते. परंतु सौंदर्यापासून होणाऱ्या आनंदासारखा शुद्ध, बिन-खर्ची, व सहज प्राप्त होणारा दुसरा कोणता आनंद आहे? सृष्टींतील देखावे, झाडें, पालवी, फळें, फुलें, नीलवर्ण आकाश, पिंजलेल्या शुभ्र कापसाप्रमाणें दिसणारे ढग, चमकणारा समुद्राचा पृष्ठभाग, जलप्रवाहाचा आ-वाज, नदीच्या पृष्ठावरील चकाकी, चंद्र, तारे, इत्यादि वस्तूंपासून कित्येकांस फारच आनंद होतो. पण कांहीं कांहीं लोकांस ह्या वस्तूंचें कांहींच कौतुक वाटत नाहीं. चंद्र आणि तारे ह्यांचा प्रकाश ह्या लोकांस असला आणि नसला तरी सारखाच. सुंदर पक्षी आणि कीटक, झाडें, फुलें, नद्या, समुद्र, चंद्र, सूर्य इत्यादि वस्तूंपासून त्यांना कांहींच आनंद वाटत नाहीं. एवढेंच नाहीं, तर सृष्टिसौंदर्याची त्यांच्याजवळ गोष्ट काढली असतां त्यांना मोठा अचंबा वाटतो. सृष्टिसौंदर्याची मौज न समजणें हा शिक्षणाचा दोषच समजला पाहिजे. लहानपणापा-सून मुलांस ह्या निःसीम आनंदाची गोडी लाविली पा-हिजे. नाहींतर सायंकाळीं फुरसद असली तरी घरींच तक्क्यास टेंकून गप्पा मारीत बसावें आणि ईश्वराच्या अगाध लीलेकडे ढुंकून देखील पाहूं नये अशीच मना-ची प्रवृत्ति होते.

मनुष्यानें केलेले कृत्रिम रंग मानवी वैभवास शोभण्यासारखे आहेत. पण एकाद्या क्षणभंगुर मेघमालेच्या रंगापुढें किंवा हंसाच्या पंखांतील एका लहानशा पिसाच्या रंगापुढें ते अगदीं फिक्के पडतात.

दिवस उगवतांना व मावळतांना जी प्रभा पडते तिचें लावण्य अप्रतिम असतें व तिच्या योगानें नेत्रांस विलक्षण आनंद होतो. त्या वेळचे क्षितिजाजवळचे ढग आपल्या कांतीनें रसरशीत सोन्यासहि लाजवितात. आकाशांतील निरनिराळ्या रंगांनीं पृथ्वीवर जिकडे तिकडे आनंद आणि प्रसन्नता यांचें तेज झळकूं लागतें.

(ओंवी)

तो पूर्वेस उदेला अंशुमाळी । तेणें नाशिली तिमिरावळी ॥
विहंगम कुजती वृक्षडहाळीं । धेनू बाहती वत्सांतें ॥ १

—श्रीधर

सूर्यास्ताचा देखावा तर फारच मनोहर असतो. त्याकडे पहात असतां जणूं काय आपण स्वर्गाच्या दरवाजांतून आंत नजर टाकीत आहों असें भासतें.

(श्लोक)

अस्तोदयाचल विलंबि रवींदुबिंब ।
व्याजात्क्षणं श्रवणयोर्निहितारविंदा ॥
ताराच्छलेन कुसुमानि समुक्षिपन्ती ।
सन्ध्येयमागतवती प्रमदेव काचित् ॥ १

—सुभाषित

भावार्थः—सूर्याचें आरक्त बिंब अस्ताचलाच्या खालीं गेलें आहे. चंद्रबिंब उदयगिरीवर आहे. नक्षत्रें नुकतींच चमकूं लागलीं आहेत, अशा वेळीं संध्या (सायंकाळ) ही, जिनें कर्णा-

च्या ठिकाणीं कमलें धारण केलीं आहेत, व जी हातानें फुलें उधळीत येत आहे, अशा सुंदर युवतीप्रमाणें दिसते.

यहुदी लोकांचा 'टालमड' या नांवाचा एक धर्मग्रंथ आहे, त्यांत 'म्याना' नांवाचा एक पदार्थ ईश्वरानें लोकांस दिला होता, असें सांगितलें आहे. त्याचें वर्णन असें केलें आहे कीं, ज्याला जी रुचि आवडत असे त्याला तीच रुचि त्या पदार्थापासून प्राप्त होत असे. त्याचप्रमाणें सृष्टींत ज्या मनुष्याला जी वस्तु अतिशय सुंदर वाटते ती त्याला सांपडण्यासारखी आहे.

ह्या जगांतील खऱ्या सुखांची संपूर्ण यादी करूं लागल्यास ती फारच मोठी होईल. ज्यांपासून कांहीं अपाय होणार नाहीं अशीं सुखें जर असंख्य आहेत तर मुद्दाम अपायकारक किंवा संशयात्मक सुखांच्या पाठीमागें आपण काय म्हणून लागावें? निदान एवढें तरी करावें कीं, जीं चांगलीं सुखें आहेत त्यांच्याकडे प्रथम वळावें, आणि तीं सर्व संपल्यानंतर मग खुशाल दुसऱ्या सुखांचा विचार करावा.

ज्या लोकांना आपणांस जगाचा फार अनुभव आहे व त्याची चांगली माहिती आहे असें वाटतें त्यांचा समज फार चुकीचा असतो. ज्यानें आपला गांव कधीं सोडला नाहीं, पण आपल्या डोळ्यांचा चांगला उपयोग केला आहे, अशा एकाद्या कुणब्याला ह्या जगांतील जितक्या वस्तूंची माहिती असेल तितकी देखील त्यांना नसते.

ज्याला चैनबाजी किंवा रंगेलपणा म्हणतात त्यांत खऱ्या सुखाचा लवलेश नसून, उलट त्याची विडंबना

मात्र असते. चैनबाज लोकांची परिणामीं हानीच होते. पण त्याबद्दल ते लोक स्वतःच कारण असून जगास उगीच दोष देत बसतात. " ऐषआरामांनीं मनुष्य हत-वीर्य झाला म्हणजे त्याला सर्व सुखें भोगून झालीं असें वाटतें. "

डीमसेट नामक एका चैनी फ्रेंच मनुष्यानें आपल्या स्थितीविषयीं पुढील उद्गार काढले आहेतः—"मी अजून तरुण आहें. संसारपथाच्या अर्ध्या भागापर्यंत देखील मी गेलों नाहीं, इतक्यांत मी थकलों. पुढें जाण्याची मला मुळींच उमेद नाहीं." काय निराशेचे व दुःखाचे उद्गार हे! जर तो मनुष्य शहाणपणानें वागता तर गत आयुष्याबद्दल त्याला अभिमान, कौतुक आणि समाधान वाटलें असतें, व पुढच्या आयुष्यासंबंधानें उत्साह वाटला असता.

मनुष्याच्या जीविताची योग्यता त्याच्या नैतिक उन्नतीवर अवलंबून आहे. " आत्मा आणि शरीर ह्यांची जोडी आहे. त्यांपैकीं आत्मा श्रेष्ठ आहे व शरीर कनिष्ठ आहे. जर आत्म्याचें वर्चस्व असलें, व आत्म्यानें शरीरावर शहाणपणानें, स्नेहानें व दक्षतेनें अंमल चाल-विला, तर मनुष्य उत्तम योग्यतेस पावतो. पण जर शरीर शिरजोर होऊन अंमल गाजवूं लागलें तर काम-क्रोधादिक षड्रिपु अनावर होऊन बुद्धीस भ्रंश होतो. सुविचारांचा व सदिच्छांचा लोप होतो. व तेणेंकरून मनुष्य नीच आणि विपद्ग्रस्त होतो.[१]"

१. जेरेमीटेलर

(श्लोक)

चंचलं हि मनः कृष्ण । प्रमाथि बलवद्दढं ॥
तस्याहं निग्रहं मन्ये । वायोरिव सुदुष्करं ॥ १
असंशयं महाबाहो । मनो दुर्निग्रहं चलं ॥
अभ्यासेन तु कौंतेय । वैराग्येणच गृह्यते ॥ २
त्रिविधं नरकस्येदं । द्वारं नाशनमात्मनः ॥
कामःक्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत् त्रयं त्यजेत् ॥ ३

—भगवद्गीता

भावार्थः—

(श्लोक)

कीं कृष्णा चंचल मन । इंद्रियें जें मथी बळी ॥
त्याचा निग्रह वाऱ्याची मोट जैशी न बांधवे ॥ १
खरेंच हें महाबाहो । मन चंचल दुर्जय ॥
अभ्यासें आणि वैराग्यें । तरी तें जिंकिजे तसें ॥ २

—वामन

(आर्या)

हें द्वार तीं प्रकारें नरकाचें आत्मघातक क्रूर ॥
काम क्रोधहि लोभहि यासाठीं टाकिजेचि हे दूर ॥ १

—मोरोपंत

प्रकरण ५

आरोग्य

(श्लोकचरण)

शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम ।

—कालिदास

भावार्थः—शरीर हें धर्मप्राप्तीचें मुख्य साधन आहे.

प्रकरण ५

आरोग्य

मनुष्याचा आत्मा हा त्याचा उत्तम भाग होय ह्यांत कांहीं संशय नाहीं. परंतु मनुष्याच्या हल्लींच्या स्थितीमध्यें तरी आत्म्याची क्रिया शरीराच्या द्वाराच चालते. ह्याचें एक मजेदार उदाहरण प्रसिद्ध शास्त्रज्ञ **फ्यारडे** ह्याच्यासंबंधानें घडलें. **फ्यारडे** हा लहानपणीं एका औषधविक्याच्या दुकानांत नोकर असतांना त्याला त्याच्या धन्यानें कांहीं कामाकरितां एका गृहस्थाच्या घरीं पाठविलें. त्यानें त्या ठिकाणीं जाऊन पुष्कळ हांका मारिल्या, परंतु कोणी ओ देत नाहीं असें पाहून आंत कोणी आहे कीं नाहीं हें पाहण्याकरितां तो आपलें डोकें गजांच्या आंत घालून डोकावूं लागला. इतक्यांत त्याच्या मनांत असा प्रश्न आला कीं, मी गजांच्या कोणत्या बाजूला आहे? त्यानें असें ठरविलें कीं, ज्या बाजूला डोकें असेल त्याच बाजूला मनुष्य असला पाहिजे. परंतु इतक्यांत दरवाजा एकाएकीं उघडला आणि त्याच्या पायाला एक तडाका बसला त्यासरशी त्याची खात्री झाली कीं आत्मा सर्व शरीर व्यापून आहे.

हल्लीं आपल्या व्यवसायांत मोठे फेरफार झाले आहेत व त्यामुळें आरोग्यसंरक्षणाच्या विषयास फार महत्त्व आलें आहे. आपले पूर्वज होते ते विशेषेंकरून खेड्यापाड्यांतच राहत असत. व त्यांचे व्यवसाय बहुधा उघड्या जाग्यांत होत असत. त्यामुळें त्यांना स्वच्छ

हवेचा नेहमीं लाभ होत असे. हल्लीं आपणांपैकीं पुष्कळ लोकांस दाट वस्तीच्या शहरांत रहावें लागतें. व घरांत, दुकानांत, किंवा कारखान्यांत काम करावें लागतें. आमचीं बहुतेक कामें बसून आणि मान वांकवून करावीं लागतात. व तीं कामें मेंदूस क्षीण करणारीं असतात. हल्लींच्या मोठमोठ्या शहरांतले लोक आपल्या पूर्वजांपेक्षां सत्त्वहीन आणि कमकुवत आहेत ह्यांत मुळींच संशय नाहीं. मुंबईसारख्या शहरांत कोणी रस्त्यानें फिरावयास गेला असतां त्याला पुष्कळ लोक असे दिसून येतील कीं, त्यांच्या अंगांत काडीइतकी देखील ताकद नसते; त्यांचे चेहरे फिकट व निस्तेज असतात, व छाती अगदीं अरुंद असते. हल्लीं आरोग्यसंरक्षणाकरितां केलेल्या योजना एकाअर्थी अपायकारक आहेत, कारण त्यांच्या-योगानें अशक्त आणि रोगग्रस्त लोकांच्या जीवाचें संरक्षण होऊन रोगी व अशक्त प्रजा वाढत जाते. पुष्कळ रोग असे आहेत कीं, ज्याला आरोग्याच्या नियमांचें थोडेंसें ज्ञान आहे त्याला थोड्याशा काळजीनें ते सहज टाळतां येतील. प्राचीनकाळीं देखील शहाणे मुत्सद्दी प्रजेच्या आरोग्याकडे बरेंच लक्ष देत असत असें दिसून येतें. मनुस्मृतीमध्यें शरीर निरोगी रहावें या हेतूनें दिलेले नियम बरेच आहेत. “ शरीरमाद्यं खलु धर्मसाधनम् ” ही कालिदासोक्ति लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आपल्या आरोग्याचें रक्षण हें एक पवित्र कर्तव्य समजावें. “ तुमचें शरीर हें पवित्र आत्म्याचें मंदिर आहे. त्याची हवी तशी नासधूस करण्याचा तुम्हांस अधिकार

नाहीं." इजिप्त देशांतील लोक शरीरास फार पूज्य मानीत. शरीरास तुच्छ मानणाऱ्या तत्त्ववेत्त्यांपेक्षां त्यांची कृति शहाणपणाची होती. शरीराची अगदीं हेळसांड करून चिंध्या पांघरणें व देह मलिन ठेवणें ह्यांत कांहीं साधुपणा किंवा सद्गुण आहे असें समजूं नये.

ग्रीक लोक शरीर व मन ह्या दोहोंच्याहि शिक्षणाकडे फार लक्ष देत असत. त्यांच्या स्त्रियाहि शरीरास हितकर अशा ललितक्रीडा व व्यायाम करीत असत. आरोग्यवर्धक व्यायामांनीं ग्रीक लोकांचीं शरीरें फारच बांधेसूद आणि सुरेख बनत असत. त्यांची कल्पना त्यांच्या वेळचे पुतळे जे हल्लीं शिल्लक आहेत त्यांवरून करितां येण्यासारखी आहे. हल्लींच्या काळीं कोणत्याहि देशांत अशा नमुन्याचें रेखींव आणि बांधेसूद शरीर दृष्टीस पडणार नाहीं. मुंबई एथील स्कूल ऑफ् आर्ट्स नामक चित्रशाळेंत कांहीं ग्रीक पुतळे ठेविले आहेत. ते ज्यांनीं पाहिले नसतील त्यांनीं अवश्य पहावे.

'निर्मलतेची योग्यता ईश्वरभक्तीच्या खालोखाल आहे' अशी इंग्रजी भाषेंत म्हण आहे. हल्लीं रोगांच्या उत्पत्तीविषयीं जे नवीन शोध लागले आहेत त्यांवरून वरील म्हणीची यथार्थता दिसून येते. हल्लीं असें कळून आलें आहे कीं, बहुतेक रोग जे आपणास होतात ते आपल्या शरीरांत कांहीं फेरफार झाल्यामुळें होत नाहींत, तर बाहेरील सूक्ष्म जीव किंवा वनस्पति ह्यांचा आपल्या शरीरावर हल्ला झाल्यामुळें होतात. हे जीव

१. सेंटपॉल

आणि वनस्पति इतके बारीक असतात कीं, त्यांचे थव्यांचे थवे एका सुईच्या अग्रावर राहूं शकतील. ते सूक्ष्मदर्शकयंत्राच्या साधनाशिवाय दिसत नाहींत. महामारी, प्लेग, वगैरे अनेक रोग आमच्या शरीरांत आपोआप उत्पन्न होत नाहींत. ह्या रोगांचे सूक्ष्म जंतु आहेत, त्यांना शरीरांत रहाण्यास जागा मिळाली म्हणजे हे रोग जडतात. हे जंतू, पाणी, हवा, कपडे, व इतर वस्तू ह्यांच्या द्वारें मनुष्यांच्या शरीरांत प्रवेश करितात. ह्यांकरितां आपलें रहातें घर, पिण्याचें पाणी, आपले कपडे, आपलें अन्न, व ज्या हवेंत आपण श्वासोच्छ्वास करितों ती हवा स्वच्छ ठेवण्याचें काम किती महत्त्वाचें आहे बरें!

मनुष्यदेह हा किती आश्चर्यकारक आहे ! मेंदूसारख्या लहानशा पदार्थामध्यें ज्ञानाचा केवढा मोठा संचय असतो, याचाच क्षणभर विचार केला तर केवढा चमत्कार वाटण्यासारखा आहे ! स्नायु मनाचे हुकूम किती त्वरेनें बजावितात. उत्कृष्ट सतार वाजविणारा मनुष्य एका सेकंदांत निदान १२ स्वर वाजवितो. प्रत्येक स्वर वाजवितेवेळीं ज्ञानतंतूंच्या द्वारें मेंदूपासून बोटापर्यंत व बोटापासून मेंदूपर्यंत तार जाते. प्रत्येक स्वराच्या वेळीं डाव्या हाताच्या बोटास तीन गती द्याव्या लागतात व उजव्या हाताच्या बोटास एक गती द्यावी लागते. मिळून एका स्वराकरितां चार गती दोन बोटांच्या मिळून होतात. डाव्या हाताचें बोट स्वराच्या पडद्यावर ठेवतांना एक गती, त्याच्यावरून बोट उच-

लण्याची दुसरी गती, त्या स्वराच्या पडद्यावरून दुसऱ्या स्वराच्या पडद्यावर बोट नेण्याची तिसरी गती. त्याचप्रमाणें उजव्या हाताच्या बोटानें नखीच्या आघाताची एक गती. ह्याप्रमाणें एका सेकंदांत ४८ गती होतात. त्या प्रत्येक गतीसाठीं अमुक ठिकाणीं अमुक वेळांत अमुक जोरानें बिनचुक बोट पडावें म्हणून मनास निरनिराळा व्यापार घडतो.

शरीराची त्वचा ही फार नाजूक आहे व तिची रचना फार बिकट आहे. तिला लक्षावधि छिद्रें आहेत. व तिच्यांत रक्तवाहिन्या, नाड्या, केशासारख्या शिरा, व ज्ञानतंतु इतके आहेत कीं, ते काढून एकापुढें एक जोडले असतां मैलांचे मैल लांब भरतील. ह्या त्वचेचा नेहमीं क्षय होत असतो व तो क्षय ती नेहमीं भरून काढीत असते. त्वचेचा व्यापार नीट चालण्याकरितां तिची बरीच काळजी घ्यावी लागते. व ती पाण्यानें वरचेवर धुवून स्वच्छ ठेविली पाहिजे. हें आश्चर्यकारक इंद्रिय निरोगी राहण्याकरितां त्याचे निरनिराळे भाग नेहमीं उपयोगांत ठेविले पाहिजेत.

पुष्कळ रोगी लोकांसंबंधानें असें म्हणतां येईल कीं सौख्य हाच त्यांचा मुख्य रोग असतो. कार्थेजचा प्रख्यात सरदार हॅनिबॉल हा आल्प्स पर्वतावरून व बर्फांतून हिंडत असतां त्याला कांहीं इजा झाली नाहीं. पण तोच हॅनिबॉल क्यांपेनिया एथें ऐषआरामांत राहूं लागल्यापासून त्याची शक्ति क्षीण झाली. लढाई क-

रीत असतां जो नेहमीं विजयी असे, तोच सुखांत पड-ल्यावर सहज जिंकला गेला.

इंद्रियें हीं रथाच्या घोड्यांसारखीं आहेत. हीं म-नोरूपी सारथ्याच्या कह्यांत आहेत, तोंपर्यंत त्यांच्या-पासून शुद्ध व खरें सौख्य होतें. पण जर कां हीं इंद्रि-यें भडकलीं व तीं आपल्या स्वाधीन न राहतां आप-णच त्यांच्या स्वाधीन झालों तर तीं आपणास कोणत्या खड्ड्यांत नेऊन आदळतील ह्याचा नेम नाहीं. खाण्यापि-ण्याच्या संबंधानें अव्यवस्थितपणा करून आपण पुष्कळ रोग आपणावर ओढून आणतों. मद्यपानाच्या घातकी संवयीचा प्रसार दिवसेंदिवस जास्त होत आहे ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. मद्यपानापासून संसाराची धुळधाण होते. शरीराचें मातेरें होतें व मनुष्याच्या हातून नाना-प्रकारचे गुन्हे होतात. यहुदी लोकांत अशी म्हण आहे कीं, " सैतानाच्यानें जेथें जातीनें जाववत नाहीं तेथें तो मद्यास आपला प्रतिनिधि म्हणून पाठवितो. "

प्लिनी म्हणतो, " दारूच्या योगानें हात कांपतो, डोळ्यांतून पाणी येतें, रात्री झोंप येत नाहीं, वाईट स्व-प्नें पडतात, तोंडास दुर्गंधि येते, आणि कोणत्याहि गो-ष्टीची आठवण रहात नाहीं. " सर वाल्टर रेले म्हणतो, " ज्यांना दारू प्रिय झाली त्यांच्यावर कोणी विश्वास ठेवीत नाहीं; कारण अशा माणसांच्या तोंडांत कांहीं गुप्त गोष्ट रहात नाहीं. दारूच्या योगानें मनुष्य पशु होतो इतकेंच नाहीं तर अगदीं वेडा होतो. मनुष्य दा-

रूबाज झाला म्हणजे त्याची बायको, मुलें व इष्टमित्र ह्यांना देखील त्याचा तिरस्कार वाटूं लागतो."

(आर्या)

बुद्धि ज्ञान हिरावुनि ने जो रिपु त्या मुखीं वसविती हा ! ॥
व्यसनकुसुखरजिं लोलुनि, जगिं केवळ जोडिती पशुपणा हा ॥ १

—शेक्सपीअर

"दारूबाज मनुष्य प्रथम चांगला विचारी असून दारूमुळें मूर्ख होतो. व शेवटीं शेवटीं केवळ पशु बनतो." पण अशा मनुष्यास पशूची उपमा देणें म्हणजे बिचाऱ्या पशूंना विनाकारण कमीपणा आणल्यासारखें होतें. अपत्यप्रेम, सोशिकपणा, अपार श्रम, परोपयोगित्व इत्यादि गुणांत दारूबाज मनुष्य पशूंची देखील बरोबरी करील काय?

मनुष्य निर्व्यसनी आणि मिताहारी असला तर त्याची स्थिति याहून किती भिन्न असते.

(श्लोक)

दिसे जरठ मी परी सबळ वीर्यवान् देह हा ।
न सेविलि सुरा कदा म्हणुनि पावलों लाभ हा ॥
जरी वय बहू असे धवल केशही जाहले ।
गमे मज करीन युद्ध तरुणासवें चांगलें ॥ १

—शेक्सपीअर

आमचा हिंदुस्थान देश दारूच्या व्यसनापासून अलिप्त असे. व सर्व जगाच्या दृष्टीनें आह्मांस हें मोठें भूषण होतें. पण आमच्या दुर्दैवानें हें आमचें भूषण जाऊं पहात आहे. आमचे शेतकरी लोक निर्व्यसनी,

सुशील, उद्योगी आणि सशक्त असल्याबद्दल त्यांची ख्याति होती व अजून आहे. व त्यांच्याच चांगुलपणावर आमच्या देशाचें कल्याण अवलंबून आहे. असें असून ह्या लोकांत हल्लीं दारूच्या व्यसनाचा फैलाव फार जोरानें होत आहे. कधीं कधीं ह्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी दारूच्या अमलांत रस्त्यांतून अव्यवस्थित वर्तन करितांना दृष्टीस पडतात. देशाच्या भावी उत्कर्षास केवढें मोठें संकट हें! रयत निर्व्यसनी असावी हें सरकारच्या दृष्टीनेंहि इष्ट आणि अवश्य आहेच. व लोकांच्या पुढाऱ्यांचा हेतु तोच आहे. असें असून मद्यपानास आळा घालण्याच्या खटपटीसंबंधानें कोठें कोठें मतभेद व गैरसमजूत झाल्याचें दिसून येतें, ह्याचें कारण समजत नाहीं. गैरसमजतीचें कारण दूर करून उभयपक्षांनीं सलोख्यानें व एकजुटीनें वागून ह्या घातकी व्यसनाचा वेळींच बींमोड करावा हें उचित आहे.

चहाच्या व्यसनाचा आपल्या देशांत फार फैलाव होऊं लागला आहे ही गोष्ट राष्ट्राच्या आरोग्यास फार घातक आहे. हल्लीं मोठमोठ्या शहरांत गल्लोगल्लींत चहाचीं दुकानें झालीं आहेत. व मजूर वगैरे गरीब लोकांस ह्या दुकानांत चहाची चट लागत चालली आहे. व खेडेगांवांतहि चहाचा प्रसार होत आहे. चहा हें अन्न नव्हे. तो एक उत्तेजक पदार्थ आहे. परंतु अन्नाच्या ऐवजीं कांहीं मजूर लोक त्याचा उपयोग करूं लागले आहेत. उत्तेजक पदार्थ ह्या नात्यानेंहि चहाचा फार दुरुपयोग होत आहे. गरीबलोकांस फार स्वस्त

म्हणजे अर्थातच फार वाईट प्रकारचा चहा मिळतो. व तो तयार करण्याच्या कामींहि फार चुका होतात. त्यामुळें त्यापासून हळूहळू अग्निमांद्य, पोटदुखी वगैरे विकार जडतात. उत्तम प्रकारचा चहा असला तरी तो देखील अपायकारक आहे. सायंकाळीं चहा घेतल्यामुळें रात्रीं झोंप येत नाहीं. ह्याचें कारण हेंच कीं त्यापासून मज्जातंतूंस क्षीणता येते.

अधाशीपणानें खाणें हेंहि प्रकृतीस फार अपायकारक आहे. पुष्कळ लोक वाजवीपेक्षां जास्त खाणें खातात. एकादे दिवशीं मेजवानी असेल त्या वेळची गोष्ट निराळी, परंतु दररोज घेताबाहेर अन्न खाण्याची संवय फार अपायकारक व उत्साहनाशक आहे. खाणें घेताबाहेर सहज जातें म्हणून त्यासंबंधानेंच फार जपलें पाहिजे. कोणीहि झाला तरी जरूर आहे त्यापेक्षां चुकीनें कमी खाईल अशी शंका बाळगण्याचें कारण नाहीं.

(श्लोक)

अनारोग्यमनायुष्यमस्वर्ग्यं चातिभोजनम् ।
अपुण्यं लोकविद्विष्टं तस्मात्तत्परिवर्जयेत् ॥ १

—मनु

भावार्थः—अतिभोजन हें आरोग्य व आयुष्य यांची हानि करितें, व तें इतर प्रकारांनीं मनुष्याच्या उत्कर्षास विघातक आहे. म्हणून तें वर्ज्य करावें.

आपल्या सर्व वर्तनांत नेहमीं मर्यादा असावी. एका मर्यादित वर्तनानें मनुष्याच्या ज्ञानाची व बलाची किंमत दसपट वाढते. त्याच्या योगानें बलास सौम्यता ये-

ते व उत्साहाचा फाजील अतिरेक होत नाहीं. सारांश कोणत्याहि कामांत उत्तम यश येण्यास मर्यादितपणाची फार जरूर आहे. मर्यादितपणा हा गुण निर्बलतेचा सूचक नसून शक्तीचाच सूचक आहे. मर्यादितपणा आत्मनिग्रह असल्यावांचून संभवत नाहीं. व आत्म्याचा निग्रह करण्यास लोकोत्तर शक्ति लागते.

जेवणांत फार वेळ घालवूं नये व घाईहि करूं नये. जेवणावरून थोडी भूक राखून उठावें. अत्याहारानें पोट जड झालें असतां मेंदूचा व्यापार नीट चालत नाहीं. जेवणानंतर एकदम काम करूं नये. कांहीं वेळ विश्रांति घ्यावी. पण एका जेवणापासून दुसऱ्या जेवणापर्यंत विश्रांतीच घ्यावी लागेल इतकें अन्न खाणाऱ्या मनुष्याचें जिणें व्यर्थ नव्हे काय? अन्न हें जीव जगण्याचें साधन आहे म्हणून तें खावें लागतें. पण अन्न खाणें हा जगण्याचा हेतु नव्हे. जगण्याचे हेतु निराळेच आहेत. अतिशय खाण्यानें आयुष्याची हानि मात्र होते.

माफक आहार ठेविल्यानें मानसिक श्रम करण्याची शक्ति वाढते. माफक आहारानें चित्त प्रसन्न रहातें. अतिशय खाण्यानें मन उदास होतें. त्याचमुळें अग्निमांद्य हा रोग पुष्कळ लोकांस होतो, व त्यापासून दुसरे भयंकर विकार उत्पन्न होतात.

बेकन म्हणतो, " आपल्या आहारांत एकाएकीं कांहीं नवीन फेरफार करूं नये, पण कांहीं अनिवार्य कारणामुळें असा फेरफार करणें भाग पडलें तर त्याला अनुरूप अशी इतर व्यवस्थाहि ठेवावी. जेवतांना, झोंप

घेतांना, व व्यायाम करितांना निश्चित मन व सुप्रसन्न अंतःकरण ठेवावें; हा आयुष्य वाढविण्याचा एक उत्तम उपाय आहे."

दुसरा एक ग्रंथकार म्हणतोः—"जर तुमची प्रकृति निरोगी रहावी अशी तुमची इच्छा असेल तर रोज तीन आणे स्वकष्टानें मिळवून त्याजवर निर्वाह करा." ह्या चतुर उक्तीमध्यें आहार आणि व्यायाम ह्यांसंबंधाचे सर्व नियम आले. खरोखर म्हटलें तर एका मनुष्यास एक दिवस पुरण्यासारखें सुग्रास अन्न तीन आण्यांत मिळण्यास हरकत नाहीं. तेवढ्या अन्नानें शरीराचें चांगलें पोषण होऊन अत्याहार होत नाहीं. व तेवढे पैसे मिळविण्यास पुरेल इतका व्यायाम मनुष्यानें दररोज करणें अगदीं अवश्य आहे, हेंहि उघड आहे. शहरच्या लोकांस मोकळ्या हवेंत जेवढा वेळ घालवितां येईल तेवढा त्यांस हितकारकच होईल. त्या वेळाचा सदुपयोग झाला नाहीं असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं, एवढेंच नाहीं तर त्याच्या योगानें मनुष्य निरोगी होऊन त्याची आयुर्मर्यादा वाढते.

स्वच्छ हवेप्रमाणें स्वच्छ पाण्याचेंहि फार महत्त्व आहे. मनुष्यानें दररोज चांगलें भरपूर पाणी घेऊन स्वच्छ स्नान केलें पाहिजे. पिण्याचें व स्नानाचें पाणी सोसेल तर थंड असावें हें चांगलें. दांत स्वच्छ ठेवणें ही गोष्ट लहानशी वाटेल, पण दांत स्वच्छ न ठेविल्यामुळें त्यांना कीड लागून ज्या भयंकर वेदना होता-

१. आबरनेथी

त त्यांमुळें मनुष्यापाशीं कितीहि सुखाचीं साधनें असलीं तरी तीं व्यर्थ होतात.

केवळ औषधें घेऊन आरोग्य मिळत नाहीं. ज्याला तें पाहिजे असेल त्यानें आपणास चांगल्या संवयी लावून घेतल्या पाहिजेत; व खाण्यापिण्याचा वेतवात चांगला ठेविला पाहिजे. रोग होऊं नये म्हणून अगोदरच औषध घेण्याची चाल चांगली नाहीं. आपण विचारानें वागलों असतां बहुधा औषधासाठीं पैसा खर्च करण्याचे प्रसंग थोडेच येतील. नेपोलियन ह्यानें म्हटलें आहे कीं, " मनुष्याच्या प्रकृतीमध्यें रोगांस हटविण्याची स्वाभाविक शक्ति आहे. तिला आपलें काम करण्यास अवकाश दिला पाहिजे. औषधांपेक्षां तीच चांगलें काम करिते. म्हणून तिच्या क्रियेस औषधें घेऊन अडथळा आणूं नये. "

स्वच्छ हवा व स्वच्छ पाणी ह्यांचा जर आपण यथेच्छ उपयोग केला व आपला आहारविहार नियमित ठेविला तर आपणांपैकीं बहुतेकांस बल आणि आरोग्य ह्यांजपासून होणाऱ्या उत्कृष्ट आनंदाचा लाभ होईल, व आपल्या ज्वानीचा भर उतारवयापर्यंत देखील टिकेल.

पण केवळ शरीराची काळजी घेऊन आरोग्य प्राप्त होईल असें नाहीं. आरोग्यास मनाची सुस्थिति देखील फार अवश्य आहे. " क्रोध, द्वेष, चिंता, दुःख, भय, इत्यादि मनोविकार जीवनकलेचे विध्वंसक आहेत. "

आणि उलटपक्षीं प्रसन्नता, सुस्वभाव, शांति इत्यादि गुण आरोग्यवर्धक आहेत.

लायकर्गस म्हणून स्पार्टा देशांत कायदे करणारा होऊन गेला. त्यानें स्पार्टा एथील प्रत्येक भोजनगृहांत हास्यदेवतेची एक मूर्ति असावी म्हणून कायदा केला होता. त्याचा हेतु हाच कीं, मनुष्यानें भोजनसमयीं सुप्रसन्न असावें, म्हणजे खाल्लेलें अन्न शरीरास चांगलें मानवतें. बफन म्हणतो कीं, " पुष्कळ लोक वृथा अभिमानानें व चिडखोरपणामुळें आपल्या आयुष्याचा क्षय करून घेतात. "

कधीं कधीं मनुष्याचें मन अगदीं अस्वस्थ होऊन जातें. त्याच्या ज्ञानतंतूला धक्का बसतो. अगदीं क्षुल्लक त्रास त्याला एकाद्या भयंकर संकटाप्रमाणें भासूं लागतो. असें झालें म्हणजे त्या मनुष्याला विश्रांति व स्वच्छ हवा ह्यांची फार जरूर आहे म्हणून समजावें.

आपण पुष्कळ वेळां लोकांना असें म्हणतांना ऐकतों कीं, अमुक अमुक मनुष्य अतिश्रमानें अकालीं मरण पावला. अतिश्रमानें मनुष्यें मरतात खरीं, पण अशीं उदाहरणें फार विरळा. काम करणें हें आपलें कर्तव्य आहे असें समजून प्रसन्न मनानें व सद्बुद्धीनें केलेल्या श्रमानें प्रकृतीस कधीं अपाय होणार नाहीं. परंतु श्रम करितांना फाजील महत्त्वाची इच्छा, दुसऱ्याच्या उत्कर्षाचा हेवा, संताप, काळजी, इत्यादि मनोविकार प्रबल झाल्यास त्यांच्या योगानें मात्र शरीराचा नाश होईल यांत शंका नाहीं. वास्तविक म्हटलें

तर श्रमापेक्षां निरुद्योग, व्यसन, सुखासक्ति इत्यादि दुर्गुणांमुळेंच पुष्कळांस मरण येतें. मानसिक श्रम देखील प्रकृतीस हितकर होतात. ज्याप्रमाणें स्नायु बळकट आणि निरोगी रहाण्याकरितां त्यांना व्यायामाची जरूर आहे त्याप्रमाणेंच मेंदू तरतरीत आणि निरोगी राहण्याकरितां त्यालाहि व्यायामाची जरूर आहेच. सदाचार, नियमितपणा, आहारविहारांत नियमितपणा इत्यादि चांगल्या गुणांचें वळण लावून घेतलें असतां दीर्घ परिश्रम देखील आपल्या आवांक्याच्या बाहेर नसतील तर अपायकारक न होतां हितकरच होतात.

कधीं कधीं आपणांस झोंप येईनाशी होते. असें झालें म्हणजे आपण फार अस्वस्थ होतों. व मनास चैन पडत नाहीं. ज्या लहान लहान अडचणी सोसण्यांत एकप्रकारची हौस वाटली पाहिजे त्याच अडचणी पर्वतप्राय भासूं लागतात. आनंददायक वस्तूंपासून आनंद होत नाहीं. आणि ज्या गोष्टी मनाप्रमाणें झाल्या नसतील किंवा होणार नाहींत असें वाटतें त्यांचाच सदासर्वकाळ ध्यास लागून रहातो. अशी स्थिति झाली तर निराश होण्याचें किंवा भिण्याचें कांहीं कारण नाहीं. पण झोंप येण्याकरितां कांहीं औषध म्हणून घेऊं नये. कारण अशा प्रकारच्या औषधांचा परिणाम भयंकर होतो. झोंप येण्यास खरा उपाय म्हटला म्हणजे हा आहे कीं, घरांत फार वेळ बसून न राहतां मोकळ्या हवेंत जेवढें जाववेल तेवढें जावें, कोणत्याहि गोष्टीकरितां मनास आंच लावून घेऊं नये, व समाधानवृत्ति

ठेवावी. म्हणजे निद्रेचें सौख्य पुनः प्राप्त झाल्यावांचून
रहाणार नाहीं.

पुष्कळ शारीरिक व्याधींचा मनाशीं निकट संबंध
असतो. म्हणून वैद्यांनीं रोगाचें निदान करितांना फक्त
शारीरिक चिन्हें पाहून थांबतां कामा नये. त्यांनीं रो-
ग्याच्या मनाची स्थितिहि पाहिली पाहिजे. व मान-
सिक व्याधीहि बऱ्या करण्याची खटपट केली पाहिजे.

आरोग्य नसल्यानें मनुष्य असुखी होतो एवढेंच ना-
हीं, तर त्याच्या हातून फारसें कामहि पूर्ण होत नाहीं.
अशा मनुष्याचें हातून स्वतःचाच निर्वाह कष्टानें हो-
णार, मग तो दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्याची गोष्ट क-
शाला पाहिजे ! म्हणून जगांत येऊन कांहीं चांगलें कृ-
त्य करावयाचें असेल, लोकांच्या उपयोगीं पडावयाचें
असेल, व जीवित सफल करून घ्यावयाचें असेल, तर
आरोग्याचें रक्षण करणें फार अवश्य आहे.

आपल्या प्रकृतीस सोसतील त्यापेक्षां जास्त श्रम क-
रणें बरोबर नाहीं. कारण तसें केल्यानें एकंदरींत जि-
तकें काम आपल्याकडून होण्यासारखें आहे, तितकें दे-
खील होत नाहीं. बेताबाहेर श्रम केल्यास कांहीं दिवस-
पर्यंत पुष्कळ काम होईल खरें, पण लवकरच थकवा ये-
ऊन किंवा प्रकृती बिघडून बरेच दिवसपर्यंत काम बंद
करावें लागेल. तसेंच, अशा रीतीनें केलेलें काम चांगलें
होणार नाहीं. त्या कामांत काम करणाराची अस्वस्थ
वृत्ति व निर्बलता ह्यांचे परिणाम व्यक्त होतील, विचार-
शक्ति चांगली राहणार नाहीं; जेथें दुसऱ्याशीं मिळून

काम करावयाचें असेल तेथें बहुशः चुरस व गैरसमज उत्पन्न होतील. एकादी लहानशी चिठ्ठी लिहितांना देखील हात कांपूं लागतो. असें होण्यास स्नायूंची व ज्ञानतंतूंची क्षीणता हींच कारण होय. श्रम केल्यापासून जीवास सुख झालें पाहिजे. श्रम नियमानें व धिमेपणानें केले पाहिजेत, एकसारखे करून उपयोग नाहीं. खाणें, पिणें, विश्रांति, व्यायाम यांच्याकडे दुर्लक्ष करितां कामा नये. अशा रीतीनें केलेल्या श्रमांपासून त्रास न होतां सुख होतें.

रुग्णावस्थेपासून होणारी निर्बलता व निरुपयोगीपणा हे दोष, जे लोक आपणच आपल्या हातांनीं आपली प्रकृति बिघडून घेतात त्यांच्या ठिकाणीं विशेष दृष्टीस पडतात. पण कांहीं लोक स्वतःचा कांहीं दोष नसतां जन्मतःच रोगी, अंध, पंगू किंवा अशक्त असतात अशा लोकांच्या शारीरिक व्यंगापासून होणारें नुकसान भरून काढण्याकरितां जणूं काय देव त्यांना तरतरीत बुद्धि व आनंदी स्वभाव देत असतो. अशा प्रकारचे लोक मोठ्या योग्यतेस देखील चढतात, व त्यांची आनंदवृत्ति, सौजन्य, व विनोदी स्वभाव पाहून आरोग्यसंपन्न लोक देखील तोंडांत बोट घालतात. अशा लोकांचें मन त्यांच्या कष्टमय जीवितयात्रेनेंच उन्नत होतें, व ते सर्वांस पूज्य होतात.

प्रकरण ६

राष्ट्रीय शिक्षण

(ओंवी)

जें जें कांहीं आपणास ठावें । तें तें हळूहळू शिकवावें ॥
शहाणे करून सोडावे । सकळ जन ॥ १

—रामदास

प्रकरण ६

राष्ट्रीय शिक्षण

शिक्षणाचें महत्त्व फार आहे ही गोष्ट ज्ञाते लोक फार प्राचीन काळापासून सांगत आले आहेत.

(श्लोक)

सर्वद्रव्येषु विद्यैव । द्रव्यमाहुरनुत्तमम् ॥
अहार्यत्वादनर्घ्यत्वादक्षयत्वाच्च सर्वदा ॥ १

—हितोपदेश

हितोपदेशांत सांगितलें आहे कीं, सर्व धनांमध्यें विद्याधन श्रेष्ठ होय. कारण तें चोरीस जात नाहीं. दुसऱ्यास दिलें असतां आपलें कमी होत नाहीं. व त्याचा कधीं क्षय होत नाहीं. प्लेटो म्हणतो, " जगांतील सर्वांत श्रेष्ठ मनुष्यांनीं संग्रहीं ठेवण्यासारखी अत्यंत सुंदर वस्तू म्हटली म्हणजे विद्याच होय. "

मॉंटेन म्हणतो, " सर्व वाईट गोष्टींचें बीज अज्ञान हें आहे. " फुलर म्हणतो, " विद्यादानासारखें दुसरें दान नाहीं. " एक फ्रेंच ग्रंथकार म्हणतो, " बल हें ज्ञानावांचून अत्यंत भयंकर होय. " अज्ञान मनुष्याचें जीवित अगदीं नीरस असलें पाहिजे, ह्यांत शंका नाहीं. विद्या ही केवळ निर्वाहाकरितां शिकावयाची अशी कांहीं लोकांची समजूत असते. पण ज्यांना निर्वाहाची काळजी नाहीं अशा लोकांना देखील आपलें जीवित उन्नत करण्याकरितां विद्येची ज़रूर आहेच.

पेट्रार्क म्हणत असे कीं, विद्यार्जनासारखी मला दुसऱ्या कशाचीहि हौस वाटत नाहीं. शेक्सपिअर ह्यानें नाटकांतील एका पात्राच्या तोंडांत जे शब्द घातले आहेत ते बहुधा त्याच्या स्वतःच्याच मताचे दर्शक असावे:—

(ओंवी)

ईश्वरी अवकृपेची खूण । जाणा अज्ञान हें दारुण ॥
स्वर्गारोहणा विमान । ज्ञान हेंचि तत्त्वता ॥ १

सालोमन ह्यानें म्हटलें आहे:—

(ओंव्या)

चातुर्य आणि ज्ञान । जयासी लाधती हीं दोन ॥
जगमाजी धन्य धन्य । तोचि नर सर्वथा ॥ १
ह्या दोहींचा व्यापार । इतर व्यापारांहुनी थोर ॥
लाभ होतसे अपार । सुवर्ण तेथें कायसें ॥ २
रत्नें माणकें आणि हिरे । जें जें मिळतां कामना पुरे ॥
हीं सर्वही दिसतीं पामरें । ज्ञानधनाशीं तुलितां ॥ ३
संपत्ति आणि बहुमान । तैसें आयुष्य वर्धमान ॥
शांति आणि समाधान । प्राप्त होती तद्योगें ॥ ४
चातुर्याचें महिमान । आगळें असे ज्ञानाहून ॥
म्हणोनि चातुर्य आणि ज्ञान । सर्वोचि मेळवीं प्रयत्नें ॥ ५

मोठमोठ्या ज्ञात्यांचीं मतें ह्या प्रकारचीं असूनहि लोकमत बरेच दिवसपर्यंत शिक्षणाच्या विरुद्ध होतें. आणि स्त्रियांच्या शिक्षणासंबंधानें तर पुसूंच नये. युरोप खंडांत देखील ही स्थिति होती, मग हिंदुस्थानांत असली तर काय नवल आहे ? जर्मन् लोकांमध्यें तर अशी म्हण होती कीं, स्त्रियांचीं वस्त्राभरणाचीं कपाटें हींच त्यांचीं पुस्तकालयें होत. आणि फ्रेंच लोकांत अ-

शी म्हण होती कीं, बायकांना एक तर अशिक्षित ठेवावें, नाहीं तर कोंडून तरी ठेवावें. हल्लींपर्यंत अशी समजूत होती कीं, सुखवस्तु लोकांना व गरीब लोकांना शिक्षणाची मुळींच जरूर नाहीं. फक्त आचार्य, शास्त्री वगैरे लोकांना मात्र विद्येची जरूर आहे.

डॉक्टर जान्सन्‌सारख्या विद्वान् मनुष्याचें असें मत होतें कीं, जर प्रत्येक मनुष्य लिहिणें-वाचणें शिकूं लागला तर सुताराचें, लोहाराचें, शेतकऱ्याचें, वगैरे कामें करण्यास कोणी तयार होणार नाहीं. पण शारीरिक श्रम करण्यांत कांहीं कमीपणा नसल्यामुळें डॉक्टर जान्सनचें मत चुकीचें आहे असें अनुभवानें ठरलें आहे.

ही पहिल्या काळची स्थिति झाली. नंतर दुसरा काळ आला. त्यावेळीं लोक म्हणूं लागले कीं, शिक्षण प्रत्येकास पाहिजे, पण तें प्रत्येकाच्या धंद्यापुरतेंच पाहिजे. त्यापेक्षां जास्त शिक्षण दिल्यास मुलांना आपली स्थिति व धंदा तुच्छ वाटूं लागतील. म्हणून गरीब लोकांच्या मुलांस फक्त लिहिणें, वाचणें व हिशोब एवढ्या तीन गोष्टी मात्र शिकवाव्या. कारण त्या त्यांच्या धंद्यांस उपयोगीं पडण्यासारख्या आहेत.

हें मत सर्व प्रकारच्या धंद्यांस लागू होतें. लार्ड एल्डन ह्यानें आपल्या पेढीवर कारकून नेमिले होते ते सर्वांत अडाणी असे पाहून ठेविले होते. व ह्याहीपेक्षां मूर्ख मिळाल्यास जुन्यांस काढून त्यांच्या जागीं त्यांना ठेवीन असें तो म्हणत असे. हॅझ्लिट् ह्याचें असें म्हणणें होतें कीं, ज्या मुलांस कोणत्याहि धंद्यांत घालाव-

याचें असेल त्यांना त्या धंद्याशिवाय दुसरें कांहीं शिकवूं नये. ज्याला पैसा मिळवावयाचा आहे त्याच्या डोक्यांत दुसरी कोणतीहि कल्पना असतां कामा नये.

ही दुसऱ्या काळची स्थिति झाली. पण इंग्लंड देशांत आतां शिक्षणासंबंधानें लोकमत अगदीं बदललें आहे. आतां तेथें असें समजतात कीं, मनुष्यास आपला धंदा चांगल्या रीतीनें करितां यावा एवढाच शिक्षणाचा हेतु नाहीं. तर प्रत्येक धंदेवाल्याचें मन विकसित होऊन त्याच्या जीवितक्रमास चांगलें वळण लागावें हा उद्देश देखील जेणेंकरून सिद्धीस जाईल अशा प्रकारचें शिक्षण पाहिजे. व्हिक्टर ह्यूगो म्हणत असे कीं, जो मनुष्य शाळा स्थापन करितो तो देशांतील एक तुरुंग ओस पाडतो असें म्हणण्यास हरकत नाहीं.

स्वित्झर्लंड देशांतील एका मुत्सद्यानें त्या देशांतील शिक्षणपद्धतीचें वर्णन करितांना असें सांगितलें:—"आमच्या देशांतील बहुतेक मुलें दरिद्रावस्थेंत जन्मतात. पण त्यांनीं अज्ञानदशेंत राहूं नये अशी आह्मीं व्यवस्था ठेवितों." इंग्लंड देशांत हल्लीं शिक्षणाकडे बरेंच लक्ष दिलें जात आहे. ग्रे नामक इंग्रजी कवीनें आपल्या वेळच्या शेतकऱ्यांचें वर्णन केलें आहे तें प्रस्तुत काळच्या तेथील शेतकऱ्यांस लागू पडणार नाहीं, पण हिंदुस्थानच्या लोकांस लागू पडेल. तें एणेप्रमाणें आहे:—

(श्लोक)

ज्ञात्यांनीं बहुकाल मंथुनि महाज्ञानोदधीं काढिलीं ।
रत्नें उज्वल तीं कृषीवलगणीं नाहीं मुळीं देखिलीं ॥

त्यांचें उन्नतियोग्यही मन असे आपद्भरें पीडिलें ।
आत्मानंदजलौघ जाइ थिजुनी दारिद्र्यशीतामुळें ॥ १

—मे

सन १८७० सालीं इंग्लंड देशांत शिक्षणासंबंधाचा एक कायदा मंजूर झाला. त्या कायद्यामुळें तेथील आई-बापांनीं आपल्या प्रत्येक मुलास शाळेंत पाठविलें पाहिजे अशी सक्ति आहे. हा कायदा झाल्यापासून लोकांच्या स्थितींत फार सुधारणा झाली आहे. तो कायदा मंजूर होण्यापूर्वीं प्राथमिक शिक्षणाच्या शाळांतील मुलांची संख्या १४,००,००० होती. आतां ती ५०,००,००० पेक्षां जास्त आहे. ह्याचा काय परिणाम झाला आहे ? प्रथम फौजदारी गुन्ह्यांच्या संबंधानें विचार करूं. सन १८७७ सालापर्यंत कैदी लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढतच होती. त्या वर्षीं कैदी लोकांची संख्या सरासरी २०,८०० होती. त्यानंतर ही संख्या कमी कमी होत जाऊन आतां फक्त १३,००० आहे; म्हणजे पूर्वींपेक्षां $\frac{१}{२}$ प्रमाणानें कमी झाली आहे. लोकसंख्या दरवर्षीं वाढत्या प्रमाणावर आहे हें आपण विसरतां कामा नये. सन १८७० पासून इंग्लंडची लोकसंख्या $\frac{१}{२}$ जास्त वाढली आहे. गुन्हेगारांची संख्या त्याच मानानें वाढती तर आज ती १३,००० न होतां २८,००० झाली असती. म्हणजे हल्लीं आहे त्याच्या दुप्पटीपेक्षां जास्त झाली असती. व त्या मानानें पोलीसचा व तुरुंगाचा खर्च वाढला असता. लहान मुलांच्या गुन्ह्यांची संख्या तर फारच कमी झाली आहे. सन १८६६ सालीं गु-

न्हेगार मुलांची संख्या १०,००० होती. सन १८७६ सालीं ७,००० होती. सन १८८१ सालीं ६,००० झाली. भिकारी लोकांची संख्या पाहिली तर ती देखील कमी होत आहे. सन १८७० सालीं दर हजार माणसांत ४७ भिकारी होते, आतां फक्त २२ आहेत.

अत्यंत भयंकर गुन्ह्यांची संख्या देखील कमी झाली आहे. सन १८६४ सालीं २८०० लोकांस सक्तमजुरीची शिक्षा झाली होती. त्यानंतर लोकसंख्या इतकी वाढली असूनहि सन १८९५ सालीं सक्तमजुरीच्या कैद्यांची संख्या फक्त ७२९ होती. आठ तुरुंग रिकामे पडले आणि ते आतां दुसऱ्या कामांस लाविले आहेत.

वर्षे	सक्तमजुरीची शिक्षा झालेले लोकांची वार्षिक संख्या	इंग्लंड आणि वेल्स यांतील लोकसंख्या
सन १८५५ पासून १८५९. पर्यंत	२५८९	१९२५७०००
,, १८५९ ,, १८६४ ,,	२८००	२०३७००००
,, १८६४ ,, १८६९ ,,	१९७८	२१६८१०००
,, १८६९ ,, १८७४ ,,	१६२२	२३०८८०००
,, १८७४ ,, १८७९ ,,	१६३३	२४७०००००
,, १८७९ ,, १८८४ ,,	१४२७	२६३१३२५१
,, १८८४ ,, १८८९ ,,	९४५	२७८३०१७९
,, १८८९ ,, १८९२ ,,	७९१	२९०५५५५०

गुन्हे आणि शिक्षणाचा अभाव ह्यांचा अगदीं निकट संबंध आहे. हें वर दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होईल. तुरुंगांत पडलेल्या १,५७,००० लोकांपैकीं फक्त

५००० लोकांस चांगलें लिहितां-वाचतां येत होतें. आणि फक्त २५० लोकांस शिक्षणाचा लाभ मिळाला होता.

मोठ्या गुन्ह्यांचें प्रमाण किती कमी होत चाललें आहे, व लोकसंख्या किती वाढली आहे हें मागें दिलेल्या कोष्टकावरून चांगलें ध्यानांत येईल.

गुन्ह्यांची संख्या कमी झाल्यामुळें द्रव्याचा नफा बराच झाला आहे. वास्तविक म्हटलें असतां ह्या विषयाकडे द्रव्याच्या दृष्टीनें पहावयाचें नाहीं. तथापि, शिक्षणाला फार खर्च लागतो अशी ज्यांची कुरकूर आहे त्यांना उत्तर देतांना शिक्षणापासून द्रव्याचाहि किती फायदा होतो हें दाखवून देणें जरूर आहे.

आतां गुन्ह्याचें मान कमी होण्यास शिक्षणाबरोबर दुसरींहि कारणें असतील. तथापि शिक्षणाचा परिणाम विशेष आहे ह्यांत शंका नाहीं. एकंदर जे गुन्हे घडतात त्यांपैकीं बुद्धिपुरःसर दुष्टपणामुळें किंवा अनिवार्य मोहांमुळें झालेले गुन्हे फार थोडे असतात. गुन्ह्यांचीं मुख्य कारणें म्हटलीं म्हणजे व्यसन आणि अज्ञान हीं होत. लोकांच्या वर्तनांत वर सांगितल्याप्रमाणें जी सुधारणा झालेली दृष्टीस पडत आहे ती सर्वांशीं शाळेंतील शिक्षणामुळें व शाळेंत लागणाऱ्या नियमितपणाच्या, टापटिपीच्या व स्वच्छतेच्या वगैरे संवयींमुळें झाली आहे असें नाहीं; तर शाळेंत गेल्यामुळें रस्त्यांतील हलकट लोकांची संगति मुलांस लागत नाहीं, आणि दुराचरणी लोकांचा कित्ता त्यांच्या नजरेपुढें येत नाहीं ह्या गोष्टी देखील त्या सुधारणेस बऱ्याच अंशीं कारणीभूत आहेत.

वर सांगितलेली स्थिति इंग्लंड देशांतील आहे. त्या देशांत सर्व मुलांस शाळेंत घालण्याविषयीं कायद्यानें सक्ति आहे, तशी एथें नसल्यामुळें एथें शाळेंत जाणाऱ्या मुलांची संख्या फारच थोडी आहे; व हिंदुस्थानच्या निरनिराळ्या भागांत शिक्षणाचा फैलाव सारख्या प्रमाणानें झालेला नाहीं. ह्यामुळें शिक्षणापासून होणारे

सन १८९१ च्या खानेसुमारीप्रमाणें हिंदुस्थानची लोकसंख्या	लिहितां वाचतां येतें अशा लोकांचीसंख्या	सन	हिंदुस्थानसरकारचें वार्षिक उत्पन्न	सदरहू उत्पन्नापैकीं विद्यादानाच्या कामीं होणारा खर्च
२८,७२,२३,४३१	२.१५,५४,०३५ पुरुष ५,४३,४९३ स्त्रिया १,२०,९७,५२८ बेरीज	१८८८–८९	८१६९६६७८०	७४६५७४१
		१८८९–९०	८५०८५२०३०	७६७२८९१
		१८९०–९१	८५७४१६४९०	८२११८२६
		१८९१–९२	८९१४३२८३०	८८९१७३८
		१८९२–९३	९०१७२४३८०	८९२९३०३
		१८९३–९४	९०५६५२१४०	९०५६१०९
		१८९४–९५	९५१८७४२९०	९१०९७२३
		१८९५–९६	९८३७०१६७०	९४७८३०५
		१८९६–९७	९४१२९७४१०	९६०२१६३
		१८९७–९८	९६४४२००४०	९४०११४४

लाभ इंग्लंडच्या लोकस्थितीवरून जसे स्पष्ट दाखवितां येतील तितक्या स्पष्टतेनें हिंदुस्थानच्या लोकस्थितीवरून दाखविण्यास तूर्त कांहीं साधन नाहीं.

हिंदुस्थान देशांतील लोकसंख्या, लिहितां—वाचतां येणाऱ्या लोकांची संख्या, वार्षिक जमाबंदी व विद्याखात्याचा खर्च, हीं मागील कोष्टकावरून लक्षांत येतील.

हिंदुस्थानांतील २८ कोटी प्रजेपैकीं १७ कोटी लोक शेतकरी आहेत. ह्या लोकांना विद्या नसल्यामुळें ह्यांची स्थिति किती शोचनीय आहे ! अज्ञानामुळें शेतकरीलोक मारवाडी व सावकार ह्यांच्या तावडींत सांपडतात. अज्ञानामुळें त्यांना आपल्या शेतकीच्या धंद्यांत कांहीं सुधारणा करितां येत नाहीं. अज्ञानामुळें स्वच्छ हवा, स्वच्छ पाणी, निर्मलता वगैरे गोष्टींचें त्यांना महत्त्व समजत नाहीं. सारांश आपलें हित अगर अहित कशांत आहे हें शिक्षणाच्या अभावामुळें त्यांस कळत नाहीं. ह्यामुळें देशाच्या उन्नतीस केवढा अडथळा होत आहे बरें ! सक्तीच्या शिक्षणापासून इंग्लंड देशांत अनेक फायदे झाले आहेत, ह्या अनुभवाचा फायदा घेऊन हिंदुस्थानांतहि सक्तीचें व मोफत शिक्षण देण्याचा कायदा व्हावा असें वाटणें साहजिक आहे. नामदार गोखले ह्यानीं गेल्यावर्षीं अशा कायद्याचें बिल तयार करून वरिष्ठ कौन्सिलांत सादर केलें. व तें पास होण्यासाठीं जिवापाड मेहनत केली. पण अखेरीस दुर्दैवानें तें पास झालें नाहीं. अज्ञानामुळें शेतकरी लोकांची स्थिति किती निकृष्ट झाली आहे हें सरकारास ठाऊक

आहे. व ह्याच कारणामुळें शेतकऱ्यांस ऋणमुक्त करण्याचा कायदा सरकारानें केला आहे. तथापि लोकांची स्थिति सुधारण्याचा खरा उपाय लोकशिक्षण हाच आहे अशी सरकारची लवकरच खातरी होऊन त्याप्रमाणें तजवीज होत जाईल अशी आशा आहे. हल्लीं सरकारानें प्राथमिक शिक्षणासाठीं दरसाल अधिक रक्कम मंजूर करण्याचा क्रम सुरू केला आहे ही आनंदाची गोष्ट आहे. दुय्यम शिक्षणासंबंधानेंहि सरकाराकडून उदार मनानें सवलती मिळणें इष्ट आहे ह्यांत शंका नाहीं; हल्लीं वाढविलेले फीचे दर सरकार दयाळूपणानें पुनः कमी करील अशी उमेद आहे.

शिक्षणाची पद्धति जी हल्लीं चालू आहे तींत पुष्कळ सुधारणा झाली पाहिजे. ह्या आयुष्यामध्यें आपणांस पुनःपुनः ज्यांचीं उत्तरें द्यावीं लागतात असे तीन प्रश्न आहेत. अमुक गोष्ट रास्त आहे किंवा गैरशिस्त आहे ? अमुक गोष्ट सत्य आहे किंवा असत्य आहे ? अमुक वस्तु सुंदर आहे किंवा कुरूप आहे ? ह्या तिन्ही प्रश्नांचें उत्तर ज्याच्या योगानें आपणांस देतां येईल असें आपलें शिक्षण असलें पाहिजे.

" तुम्हीं आपलीं पुस्तकें विकून भट्ट्या विकत घ्या, वाग्देवीला सोडून घिसाड्याचा कारखाना सुरू करा " असें म्हणणारे लोक बेकनच्या वेळीं म्हणजे सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं देखील होते. व आजकाल हिंदुस्थानांत देखील अशीच ओरड करणारे लोक बरेच आहेत. ह्या लोकांच्या म्हणण्यांत कांहीं तथ्य आहे ह्यांत शंका

नाहीं. त्यांच्या उपदेशाप्रमाणें वागवीला आपण सो-
डून कधींच चालावयाचें नाहीं. पण सृष्टीच्या महाग्रं-
थांतून जेवढें शिक्षण घेतलें पाहिजे तेवढें आपण घेत
नाहीं ही मोठी चूक आहे.

ताट, वाटी आणि चमचा ह्या तीन वस्तूंना जसें भो-
जन हें नांव देतां येत नाहीं, तसेंच लिहिणें, वाचणें आणि
हिशोब ह्या तीन गोष्टींना शिक्षण म्हणतां येणार नाहीं.
शिवाजी महाराज ह्यांस सहीपुरतें देखील लिहितां येत
नव्हतें. पण त्यांना शिक्षण नव्हतें असें कोण म्हणेल ?

हल्लींच्या शिक्षणक्रमांत भाषाविषयाकडे विशेष ल-
क्ष दिलें जात आहे. आणि शास्त्रीय विषयांकडे बहुतेक
दुर्लक्ष होत आहे. जे काय शास्त्रीय विषय शिकविण्यांत
येतात ते बहुतेक पुस्तकावरूनच शिकवितात. प्रयोग कर-
ण्यास लागणारी यंत्रसामग्री विद्यालयांतून भरपूर नस-
ल्यामुळें म्हणा किंवा दुसऱ्या कोणत्याहि कारणानें म्हणा,
शास्त्रीय विषयांचें सप्रयोग शिक्षण आमच्या विद्यालयां-
तून फार थोडे मिळतें. अशा प्रकारच्या घोंकीव शिक्ष-
णापासून कांहीं फायदा नाहीं. व त्यामुळें शास्त्रीय-
विषयांकडे विद्यार्थ्यांचा कल होत नाहीं ह्याबद्दल त्यां-
ना दोष देण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

हल्लींचें शिक्षण कांहीं अंशीं एकदेशीय आहे. मनु-
ष्याच्या सर्व गुणांचा विकास होईल अशा प्रकारचें
शिक्षण खरें म्हटलें असतां पाहिजे. आंग्लकविकुलगुरु
शेक्सपिअर ह्याला ल्याटिन् आणि ग्रीक फारसें येत न-
व्हतें. ज्या मुलानें फक्त पुस्तकांचेंच पाठांतर केलें आहे,

ज्याला सृष्टीची कांहीं माहिती नाहीं, ज्याला ह्या जगाचें कांहीं ज्ञान नाहीं, त्याच्या बुद्धीचा पूर्ण विकास होणार नाहीं; त्याचें ज्ञान नेहमीं अर्धवट रहाणार.

एका ग्रंथकारानें म्हटलें आहे:—" एकाद्या पुष्पवाटिकेंतील झाडें वाढविण्याच्या हेतूनें त्यांच्यापुढें वनस्पतिशास्त्राचा ग्रंथ वाचावा, त्याप्रमाणें हल्लींच्या शिक्षणाची स्थिति आहे." हें म्हणणें खरें आहे.

शिक्षणाच्या योगानें आपण पुष्कळ गोष्टी शिकल्या पाहिजेत. तशाच पुष्कळ गोष्टी विसरल्या पाहिजेत.

शालागुरूंचें काम सोपें आहे असें पुष्कळ लोक समजतात. पण त्यांच्या धंद्यासारखा श्रमाचा, व जबाबदारीचा दुसरा धंदा नसेल. मुलांबरोबर खेळण्याचें काम फार मौजेचें आहे. पण त्यांना शिकविण्याचें काम मात्र तसें नाहीं.

गणित, व्याकरण वगैरे विषय शिकविण्याचें काम कदाचित् सोपें असेल. पण " लहान मुलांना उत्तेजन देऊन त्यांना हुरूप आणणें, त्यांच्या बुद्धीचा विकास करणें, त्यांच्या शक्तीचें उत्तम चीज करून देणें, पराजय झाला असतांहि "कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें" ह्या न्यायानें धैर्य, कल्पनाशक्ति आणि निश्चय हे गुण वाढविणें, इत्यादि गोष्टी सोप्या नाहींत. त्यांसाठीं प्रासादिक पुरुषांची जरूर आहे."[१]

शिक्षणाचा हेतु वकील, शिक्षक, पुरोहित, शिपाई कारागीर इत्यादि बनविणें हा नव्हे; तर मनुष्यांचें मन

१. इमरसन

सुसंस्कृत करणें हा होय. मिल्टन् म्हणतोः—“ ज्या शि-
क्षणाच्या योगानें मनुष्यास आपलें गृहसंबंधी व सार्व-
जनिक कर्तव्य नेकीनें, अकलेनें, आणि उदार बुद्धीनें क-
रितां येईल, त्यालाच पूर्ण आणि उदार शिक्षण म्हणावें. ”

प्राचीन तत्त्वज्ञानी लोकांस असें वाटत असे कीं,
वस्तुस्थितीसंबंधाच्या प्रश्नांचा निर्णय देखील केवळ श-
ब्दपांडित्यानें करितां येईल. कोंबडी प्रथम झाली, कीं
अंडें प्रथम झालें ? ह्या प्रश्नाचा विचार प्लूटार्क ह्यानें के-
लेला आहे तो वाचून हांसें आल्यावांचून राहणार नाहीं.
त्यानें कोंबडी प्रथम झाली असें ठरविलें आहे. व ह्या-
बद्दल त्यानें जीं कारणें दिलीं आहेत त्यांपैकीं एक अ-
सें आहे कीं, सर्व लोक ‘ कोंबडीचें अंडें ’ असें म्हण-
तात, ‘ अंड्याची कोंबडी ’ असें कोणी म्हणत नाहीं.

“ वृक्ष, पाषाण, नद्या, सरोवरें, डोंगर इत्यादि-
कांचे ठिकाणीं ईश्वरी करणीचें अनुपम सौंदर्य आप-
ल्या मुलांस ओळखतां येईल असें शिक्षण त्यांना दि-
लेंच पाहिजे[1]. ”

जेफ्रेझ् म्हणतो, “ पुष्कळ पुस्तकें वाचून आपली क-
ल्पनाशक्ति वाढेल असें जर कोणाला वाटत असेल,
तर ती त्याची चूक आहे. कल्पनाशक्तीचीं आवडतीं
ठिकाणें म्हटलीं म्हणजे समुद्र, डोंगर, अरण्यें, ओढे,
सूर्यप्रकाश, आणि मोकळी हवा हीं होत. ” पण श-
हरच्या लोकांना हीं ठिकाणें जितकीं सुलभ असावीं ते-
वढीं नाहींत ही दुर्दैवाची गोष्ट आहे. पुस्तकांत देखील

१. व्हिटियर

कल्पनाशक्तीची वसति आहेच. पण पुस्तकांचा उपयोग करण्यांत तारतम्य पाहिजे. विचार व्यक्त करण्याचें साधन जी भाषा ती फार अपूर्ण आहे. ह्यामुळें पुस्तकांचा योग्य अर्थ समजून त्यांचा उपयोग करणें हें काम अवघड आहे.

∴ पुष्कळ लोक शाळा सोडल्यानंतर कांहीं व्यवस्थित आत्मशिक्षणाचा क्रम सुरू ठेवीत नाहींत ह्याचें कारण शिक्षणपद्धतींतील वर सांगितलेले दोषच असावे असें वाटतें. आपण जिवंत आहों तोंपर्यंत नेहमीं कांहीं तरी शिकत असतोंच ह्यांत शंका नाहीं. सहजगत्या एकादा चमत्कार आपल्या दृष्टीस पडला, एकादी कादंवरी किंवा वर्तमानपत्र आपल्या हातीं पडलें, तर किंवा दुसऱ्या अशाच कारणांनीं आपणांस कांहीं तरी ज्ञान प्राप्त होईल; पण त्याला आत्मशिक्षण म्हणतां येणार नाहीं.

साधारण शिक्षणांत कोणत्या गोष्टींचा समावेश असावा ह्यासंबंधानें प्रो० हक्स्ले ह्याचें मत एणेप्रमाणें आहेः—

" पंधरा—सोळा वर्षांच्या मध्यम स्थितीच्या प्रत्येक मुलाला सामान्य शिक्षण द्यावयाचें म्हणजे त्याला पुढें सांगितलेले विषय तरी शिकविले पाहिजेतः—त्याला आपली जन्मभाषा चांगली लिहितां वाचतां यावी. त्याला भाषास्वारस्य जेणेंकरून समजेल तेवढा ग्रंथांशीं परिचय असावा. आपल्या देशाच्या इतिहासाची साधारण माहिती, समाजासंबंधाचे ठळक नियम, पदार्थविज्ञान व मानसशास्त्र ह्यांचीं मूलतत्त्वें ह्यांचें ज्ञान त्याला असलें पाहिजे. अंकगणित आणि भूमिति, ह्यांचें

साधारणपणें बरेंच ज्ञान पाहिजे. तर्कशास्त्र त्याला शिकवावयाचें तें नियमांपेक्षां उदाहरणांनींच शिकवावें. संगीत आणि चित्रकला ह्यांचीहि थोडीशी माहिती असावी. पण हे दोन विषय करमणूक ह्या नात्यानें शिकवावे. ”

अशा प्रकारचें ज्ञान उपयोगी असून फार मनोरंजकहि असतें. प्रसिद्ध शारीरशास्त्रज्ञ जॉन हंटर ह्याला बाळपणीं जसें वाटत होतें तसें आपणांपैकीं पुष्कळांस वाटलें असेल. व त्याच्याप्रमाणें आपणांसहि म्हणतां येईल कीं, “ मी लहान मुलगा होतों तेव्हां मेघ, वनस्पती वगैरे वस्तूंसंबंधानें ज्ञान मिळविण्याची मला उत्कट इच्छा होत असे. झाडांच्या पानांचे रंग शरदतूंत कां पालटतात तें समजण्याची मला उत्कंठा असे. मुंग्या, माशा, पक्षी, किडे इत्यादि प्राण्यांचा मला मोठा चमत्कार वाटून मी त्यांचें अवलोकन करीत असें. मी जवळच्या माणसांस पुष्कळ गोष्टींबद्दल प्रश्न विचारून कंटाळा आणीत असें. त्या गोष्टी कोणास महत्त्वाच्या वाटत नसत, व त्यांबद्दल कोणास माहितीहि नसे. ”

प्रसिद्ध तत्त्ववेत्ता लॉक हा आपल्या शिक्षणावरील ग्रंथांत म्हणतो:—“मला पुस्तकांसंबंधानें कांहीं सांगावयाचें आहे. पुस्तकें वाचणें हा शिक्षणाचा मुख्य भाग आहे अशी लोकांची समजूत कशी झाली असेल ती असो. पण ती चुकीची आहे. पुस्तकवाचनानें आपली सुधारणा होण्यास आणखी दोन गोष्टींची अवश्यकता आहे. त्या गोष्टी म्हणजे चिंतन आणि संवाद ह्या होत. वाचन हें इमारतीसाठीं कच्चें सामान गोळा करण्यासा-

रखें आहे. त्या सामानांतून पुढें बरें-वाईट निवडून काढावयाचें असतें. चिंतन हें कच्च्या सामानाची निवड करणें, दगड व लांकडें तासून व रेखून जागच्या जागीं वसविणें, आणि इमला उभारणें, ह्यासारखें आहे. मित्रांबरोबर संवाद हा इमल्याचीं तपासणी करणें, निरनिराळ्या खोल्यांत फिरून घराचे निरनिराळे भाग सारख्या प्रमाणानें बसले आहेत कीं नाहींत हें पाहणें, इमल्याची बळकटी कशी आहे, त्यांत दोप काय आहेत वगैरे पहाणें, ह्यासारखें आहे. आपल्या कल्पनामंदिरांतील न्यून काढून टाकण्याचें उत्तम साधन म्हणजे संवादच होय. संवादाच्या योगानें खरीं तत्त्वें बाहेर निघतात, आणि आपल्या ध्यानांत चांगलीं ठसतात. ”

वादे वादे जायते तत्त्वबोधः ।

प्रकरण ७

आत्मशिक्षण

(श्लोक)

विद्या हें पुरुपास रूप बरवें, कीं झांकलें द्रव्यही ।
विद्या भोग सुकीर्तिदायक पहा ते मान्य मान्यासही ॥
विद्या बंधु असे विदेशगमनीं, विद्या महादेवता ।
विद्या पूज्य नृपास, हा नरपशू तावेगळा तत्त्वतां ॥ १

—वामन

प्रकरण ७

आत्मशिक्षण

आपल्या सर्व शक्तींची सारख्या प्रमाणानें वाढ करणें ह्याचें नांव शिक्षण होय. शिक्षणाचा आरंभ पाळण्यांत होतो. शाळेंत शिक्षण चालू असतेंच. पण तेथें त्याची समाप्ति होत नाहीं. आपल्या मनांत असो वा नसो, आपलें शिक्षण आपल्या सर्व जन्मभर चालू असतेंच. प्रश्न एवढाच आहे कीं, जें कांहीं आपण शिकतों त्याची शहाणपणानें आपण निवड करितों किंवा दैववशात् जें कांहीं प्राप्त होईल तें शिकतों ? गिबन् म्हणतो, "प्रत्येक मनुष्यास दोन प्रकारचें शिक्षण मिळतें; एक दुसऱ्यांपासून, व दुसरें स्वतःकडून." आपण दुसऱ्यांकडून जें शिकतों त्यापेक्षां आपण स्वतः मिळविलेलें ज्ञान अधिक उपयोगी असतें. लॉक म्हणतो, "केवळ गुरूच्या शिक्षणानें आणि धाकानें कोणी मनुष्यानें फार ज्ञान मिळविलें, किंवा एकाद्या शास्त्रांत नैपुण्य संपादिलें, असें एकहि उदाहरण नाहीं.

आपलें हृदयमंदिर एकदांच स्वच्छ झाडून अलंकृत करून ठेवूं म्हटलें तर कधीं होणार नाहीं. पण तें चांगल्या किंवा वाईट गोष्टी ग्रहण करण्यास तयार करणें हें आपल्या स्वाधीन आहे.

ज्यांना शाळेंत असतांना नांवलौकिक मिळवितां आला नाहीं त्यांनीं निराश होण्याचें कारण नाहीं. वि-

शाल बुद्धीची परिपक्वता बाल्यदशेंतच होते असें नाहीं. शाळेंत असतांना ज्यांनीं मुळीं परिश्रमच केले नाहींत त्यांना निराशा वाटण्याचें जरी कारण नाहीं, तरी लाज वाटली पाहिजे. पण ज्यांना योग्य श्रम करूनहि यश आलें नसेल त्यांनीं दृढनिश्चयानें उद्योग मात्र चालविला पाहिजे, म्हणजें त्यांना यशःप्राप्ति झाल्यावांचून रहणार नाहीं. ज्यांना शाळेंत नांवलौकिक मिळवितां आला नाहीं अशांपैकीं पुष्कळ लोक जगांत मोठ्या योग्यतेस चढले आहेत. वेलिंग्टन् आणि नेपोलियन हे दोघेहि शाळेंत असतांना जडबुद्धि होते, अशी प्रसिद्धि आहे. न्यूटन्, स्विफ्ट्, क्लाइव्ह, स्कॉट, शेरिडन् आणि दुसरे पुष्कळ थोर लोक ह्यांची हीच स्थिति होती.

ह्यावरून उघड दिसतें कीं, शाळेंत ज्यांना वाहवा मिळाली नाहीं त्यांना ती पुढें मिळणार नाहीं असा कांहीं नियम नाहीं.

बुद्धि म्हणजे "उद्योग करण्याची विलक्षण शक्ति" अशी एकानें व्याख्या केली आहे, ती पुष्कळ अंशीं खरी आहे. लिली म्हणतो, "प्रकृतीनें आपलें कार्य केलें नाहीं तर श्रमांचा कांहीं उपयोग नाहीं. पण श्रम केले नाहींत तर प्रकृतीचा कांहीं उपयोग नाहीं."

लहानपणीं ज्यांनीं मोठी हुषारी दाखविली असे पुष्कळ लोक मोठे झाल्यावर उद्योग, आरोग्य किंवा सद्वर्तन ह्यांच्या अभावामुळें कुचकामी झाले आहेत. गेटी म्हणतो, " ज्यांना पुष्कळ फुलें येतात पण फळ मुळींच नाहीं अशा झाडांप्रमाणें ह्या लोकांची स्थिति असते.

त्यांना मोठेपणीं कांहीं हलकें सलकें काम करून कष्टानें पोट भरावें लागतें. पण जे मुलगे कांहींसे मंदबुद्धि असूनहि उद्योगी, निश्चयी आणि सच्छील असतात त्यांचा हळूहळू उत्कर्ष होतो; त्यांना मोठमोठे हुद्दे मिळतात; ते आपल्या देशाचे हितकर्ते होतात व त्यांची मोठी कीर्ति होते."

"अज्ञान मनुष्य निष्कपटी असतो, व त्याच्या हातून पापाचरण होणार नाहीं, अशी कांहीं लोकांची विलक्षण समजूत असते. त्यामुळें शिक्षणाची योग्यता कित्येकांस कळत नाहीं. पण मनुष्याचें ज्ञान हिरावून घेतलें असतें त्याला बालकांची मुग्धावस्था प्राप्त होणार आहे काय ? मुळींच नाहीं. इतकेंच नव्हे तर तो पशूंच्या कोटींतील एक अत्यंत दुष्ट आणि घातकी प्राणी होऊन राहील."

ह्या संसारांत सन्मार्ग दाखविणारी ज्ञानरूप ज्योति मालवली असतां मनुष्यें विकारवश होऊन त्यांच्या अंगीं दोन्ही वयांतले दोष मात्र चिकटतील. म्हणजे बालपणचें अज्ञान व प्रौढ वयांतले दुर्गुण हे मात्र त्यांच्यामध्यें एकवटून राहतील.

ज्या मनुष्यावर शाळेंत असतांना चांगला संस्कार झाला आहे तो आपलें शिक्षण सतत चालू ठेविल्यावांचून रहाणार नाहीं. शिक्षण म्हणजे केवळ पोट भरण्याचें साधन आहे ही समजूत फार कोतेपणाची होय.

सुशिक्षणाचा हेतु सालोमन ह्यानें सांगितला आहे.

१. डॉक्टर आर्नोल्ड

तो असाः—“ सुशिक्षणाच्या योगानें मनुष्यास शहाणपणा आणि ज्ञान ह्यांची ओळख व्हावी. बुद्धिमान् लोकांच्या म्हणण्याचा अर्थ समजावा. चातुर्य, न्यायबुद्धि, विचारशक्ति इत्यादि गुण प्राप्त व्हावे. मूढ मनुष्यास तीव्रता यावी. तरुण मनुष्यास ज्ञान आणि विवेक हीं प्राप्त व्हावीं. ”

“ एकादें रुप्याचें नाणें पडलेलें पाहून तें उचलून घेण्याकरितां मनुष्य आपला रस्ता सोडून बराच लांब जाईल. पण प्राचीन काळच्या अत्यंत शहाण्या लोकांचे शब्द म्हंणजे केवळ बावनकशी सोनेंच होय. त्या शब्दांची किंमत किती मोठी आहे हें प्रत्येक पिढीचे विद्वान् आपणांस सांगत आले आहेत. ” असें असून त्यांचा लाभ जर आपण घेतला नाहीं तर हा आपला मूर्खपणा नव्हे काय ?

फ्रेंच भाषेंत एक अशी म्हण आहे कीं, “ तरुण ज्ञानी असते, आणि वृद्ध बलवान् असते, तर केवढी मौज होती ? ” सुशिक्षणाच्या योगानें आपणास दोन्ही गोष्टी प्राप्त होतात. म्हणजे तरुणपणीं ज्ञान प्राप्त होतें, आणि वृद्धपणीं सामर्थ्य प्राप्त होतें. “ अनुभवाच्या शाळेंत टक्केटोणपे खाऊन मिळणारें शिक्षण मनस्वी खर्चाचें असतें. पण मूर्ख मनुष्य दुसऱ्या कोणत्याच शाळेंत शिकावयाचा नाहीं. ”

संसारांत प्रथम चांगल्या प्रकारचा आरंभ झाला म्हणजे निम्मे यशःप्राप्ति झाली म्हणून समजावें. मुलांस

१. थोरो २. फ्रांकलिन्

लहानपणींच चांगला मार्ग लावून दिला म्हणजे मोठे-पणीं तीं तो सोडणार नाहींत. आरंभ करितांना चांगला करावा. म्हणजे पुढें पुढें आपलें काम सोपें वाटूं लागतें. पण आरंभ करण्यांत जर कां चूक झाली तर पुढें जें नुकसान होईल तें कांहीं केल्यानें भरून येणार नाहीं. कोणतीहि गोष्ट शिकणें हें प्रयासाचें आहेच, पण एकादी वाईट लकब लागल्यावर ती घालविणें फारच कठिण आहे.

पुस्तकें, मनुष्यें, निरनिराळ्या संस्था व कल्पना ह्या-पासून ज्या उत्त गोष्टी शिकण्यासारख्या असतील त्या आपल्या ध्यानांत ठसविण्याचा यत्न करावा. आपल्या-पेक्षां दुसरे लोक अधिक विद्वान् आहेत म्हणून लाज वाटण्याचें मुळींच कारण नाहीं. पण आपणांस शिकतां येईल तेवढें आपण शिकलों नाहीं तर मात्र मोठ्या शर-मेची गोष्ट होय.

पुष्कळ भाषा शिकणें, नानाविध वस्तूंचें ज्ञान मिळ-विणें इत्यादि गोष्टींनाच केवळ शिक्षण म्हणतां येणार नाहीं. शिक्षण हें ज्ञानार्जनाहून भिन्न आहे. व त्यापेक्षां श्रेष्ठ आहे. ज्ञानार्जन हें धान्याच्या कोठारांत धान्य भ-रण्यासारखें आहे. शिक्षण हें पेरणीसारखें आहे. त्या-च्यायोगानें जें बीं पेरण्यांत येतें त्यापासून तीसपट, चा-ळीसपट, व कधीं कधीं शंभरपट पीक होतें.

(श्लोक)

अपि शास्त्रेषु कुशला। लोकाचारविवर्जिताः॥
सर्वे ते हास्यतां यान्ति। यथा ते मूर्खपण्डिताः ॥ १

—पंचतंत्र

भावार्थः —शास्त्रांचें ज्ञान असूनहि ज्यांच्या अंगीं व्यवहार-चातुर्य नाहीं, ते उपहासास पात्र होतात.

चातुर्यापेक्षां ज्ञानाची योग्यता कमी आहे ह्यांत शंका नाहीं. पण ज्ञानाची खरी योग्यता पुष्कळांच्या लक्षांत येत नाहीं.

कूपर कवीनें म्हटलें आहे:—

(आर्या)

ज्ञानी मानी गर्वी मजसम सर्वज्ञ मीच या लोकीं ॥
चतुर नर म्हणे विनयें शिकलों अद्यापि फार थोडें कीं ॥ १

पण खरोखर अशी गोष्ट नाहीं. जे अतिशय ज्ञानी आहेत त्यांनाच न्यूटनप्रमाणें आपल्या ज्ञानाचें अल्पत्व चांगलें समजतें.

बिशप् बट्लर ह्यानें एके ठिकाणीं असें म्हटलें आहे:—"मोठमोठे शोध करण्यांत निमग्न झालेल्या लोकांस इशारत देणें भाग आहे कीं, बाबानों, तुम्हीं काय करतां तें नीट समजून घ्या. तुमच्या शोधांनीं सद्गुणांस आणि सद्धर्मास बळकटी येऊन त्यांचा लोकांत प्रसार होत असेल, किंवा संसारांतील दुःख कमी होऊन सुखाची वृद्धि होत असेल तर तुमच्या श्रमाचें मोठें चीज होणार आहे. अज्ञात गोष्टींचा शोध लावण्यापासून वरील परिणाम घडत नसतील तर त्यांचा कांहीं उपयोग नाहीं. फार झालें तर करमणूक मात्र होईल." कूपर कवीनेंहि ह्याच प्रकारचे उद्गार ज्ञानाविषयीं काढले आहेत. तो म्हणतो:—"ज्ञान म्हणजे माती, दगड, लांकडें वगैरे सामानाच्या ढिगासारखें आहे. तें सामान घेऊन

त्याची सुरेख इमारत बांधण्याचें काम चातुर्य करितें. ”

ज्ञान हें केवळ सामानासारखें आहे असें मानिलें तरी जो कारागीर चांगलें सामान निवडण्याची हयगय करील तो कुचकामाचा असला पाहिजे. अज्ञात गोष्टींचा शोध लावल्यापासून काय काय फायदे होतील हें कोणाच्यानें सांगवणार नाहीं. पुष्कळ शोध प्रथमदर्शनीं फार निरुपयोगी वाटत होते; असें असून त्यांपासून पुढें अपरिमित कल्याण झालें आहे.

“[1]ज्ञान ही एक प्रचंड शक्ति आहे. तारायंत्राच्या ज्ञानापासून वेळ वांचतो. लेखनकलेच्या ज्ञानामुळें मनुष्याचे बोलण्याचे व जाण्यायेण्याचे श्रम वांचतात. गृहव्यवस्थेच्या ज्ञानानें पैसा वांचतो. आरोग्यशास्त्राच्या ज्ञानानें आरोग्याचें आणि जीविताचें संरक्षण होतें. बुद्धीच्या नियमांच्या ज्ञानापासून मेंदूचा अपव्यय टाळतां येतो. अध्यात्मज्ञानापासून होणारे लाभ तर काय सांगावे? ”

हर्बर्ट स्पेन्सर म्हणतोः—“प्रत्यक्ष आत्मसंरक्षणाकरितां म्हणजे आपल्या जीविताच्या व आरोग्याच्या संरक्षणाकरितां ज्याची अत्यंत जरूरी आहे असें ज्ञान म्हणजे शास्त्रीय ज्ञानच होय. अप्रत्यक्ष आत्मसंरक्षण अथवा ज्याला उदरनिर्वाह म्हणतात त्याच्यासाठीं देखील शास्त्रीय ज्ञानच पाहिजे. आईबापांस आपलें कर्तव्य चांगल्या रीतीनें बजावितां येण्यास शास्त्रीय ज्ञानावांचून गत्यंतर नाहीं. नागरिक लोकांस आपल्या वर्तनाचें योग्य नियमन करितां येण्यास राष्ट्रांच्या प्राचीन व

१. किंग्स्ले

अर्वाचीन इतिहासाचें इंगित नीट समजलें पाहिजे. व तें समजण्यास शास्त्रीय ज्ञानाचीच गुरुकिल्ली पाहिजे. कला-कौशल्याचे उत्तम पदार्थ तयार करितां येण्यासाठीं व त्यांचा पूर्ण उपभोग घेतां येण्यासाठीं शास्त्रीय ज्ञानाचाच संस्कार पाहिजे. सरते शेवटीं मनासिक, नैतिक व धार्मिक शिक्षणाचें उत्तम साधन म्हणजे शास्त्रीय ज्ञानच होय."

डॉक्टर फिच् म्हणतो:—" मीं आपल्या गत आ-युष्याकडे फिरून पाहिलें, आणि विद्यालयांत घालवि-लेल्या दिवसांचा विचार करूं लागलों म्हणजे मला असें दिसून येतें कीं, शाळेंत असतांना जे गणिताचे व शास्त्राचे सिद्धांत, जे व्याकरणाचे नियम व ज्या सुंदर कविता मी शिकलों त्यांचें मला वारंवार स्मरण होतें. त्यांच्यापासून मला जेवढा उपयोग व्यवहारांत होईल असें वाटलें होतें त्याहून फारच जास्त होत आहे. त्यांच्या योगानें मी जीं पुस्तकें वाचतों त्यांचा अर्थ मला चांगला कळतो; माझ्या आसपास ज्या गोष्टी घडतात त्यांचें यथार्थ स्वरूप माझ्या लक्षांत येतें. व ए-कंदरींत हें जीवित उन्नत आणि मनोहर वाटूं लागतें."

सरते शेवटीं डीन स्टान्ले ह्याचें मत देतों म्हणजे झालें. तें असें:—" सत्याविषयीं निरपेक्ष प्रेम किती दुर्मिळ आहे ! तसेंच तें किती कल्याणकारक आहे ! त्यापा-सून होणारे फायदे आपल्या लक्षांत एकदम येत नाहींत. केवळ सत्यशोधनाच्या निःसीम भक्तीमुळें विद्वान् लोकांनीं जे शास्त्रीय शोध लावले आहेत त्यांपासून मा-नवी सुखाची केवढी वृद्धि होत असते, हें कदाचित्

पहिल्या-दुसऱ्या पिढीच्या दृष्टोत्पत्तीस येणार नाहीं. "

एका संस्कृत कवीनें म्हटलें आहे:—

किं किं न साधयति कल्पलतेव विद्या ।

कोणतीहि माहिती घ्या, तिचा कांहींच उपयोग नाहीं असें कधीं होणार नाहीं. तसेंच कोणतीहि वस्तु असो, ती एकवेळ देखील पहाण्यालायक नाहीं असें होणार नाहीं. खरोखर म्हटलें तर जगांत क्षुद्र वस्तु मुळींच नाहींत. क्षुद्र मनें मात्र पुष्कळ आहेत.

आजपर्यंत मोठमोठे शोध ज्यांनीं लाविले आहेत, त्यांपैकीं कित्येकांचीं नांवें सुद्धां आपणांस ठाऊक नाहींत ही मोठी दुर्दैवाची गोष्ट होय. दुर्दैवाची त्यांच्या दृष्टीनें नव्हे, तर आपल्या दृष्टीनें. कारण त्यांच्या महदुपकाराबद्दल त्यांचें स्मरण ठेवावें, अशी आपणांस इच्छा होते, पण ती पूर्ण करण्याचें साधन आपणांजवळ नाहीं. तथापि मोठे शोध ज्यांनीं ज्यांनीं लाविले त्यांनीं ते स्वार्थबुद्धीनें किंवा कीर्तीच्या हेतूनें मुळींच लाविले नाहींत.

(श्लोक)

सत्यान्वेषण, भोगुनी निशिदिनीं सायास केलें जिहीं ।
निंदा वा स्तुति वा न मानुनि, परेशा चिंतुनी प्रत्यहीं ॥
तन्नामें कविनीं जरी सुकविता-माला नसे गुंफिली ।
त्यांतें काय उणें दिवीं वसतसे सत्कीर्ति त्यांची भली ॥ १

—इच्यूअर्ट

ह्या आयुष्याचा खरा उपयोग व्हावा अशी इच्छा असेल तर मनुष्यानें रिकामें न राहतां कांहीं तरी चांगला व्यासंग पतकरून तो लक्षपूर्वक चालविला पाहिजे.

कोणतेंहि काम पूर्ण लक्ष न देतां केलें तर शेवटीं दुप्पट मेहनत पडते.

"विद्यानंदाचा अनुभव घेणारे लोक अजून किती थोडे आहेत ह्याचा विचार केला तर मनाला खेद वाटतो. आपणांस सुख व्हावें व आपली कर्तव्यबुद्धि जागृत रहावी हे दोन्ही हेतू साध्य होण्याकरितां आपण सर्वदा शहाण्या लोकांचे विचार वाचून किंवा ऐकून ध्यानांत ठेविले पाहिजेत."

"मनुष्यानें आपली बुद्धि सुविचारांनीं अलंकृत करून ती आत्म्याचें राजमंदिर होण्यास पात्र केली पाहिजे."

"आपलें जीवित हें एक शेत आहे, व त्याची बरीवाईट लागवड करणें हें आमच्या हातीं आहे. जर आपण त्या शेतांत नांगरणी, पेरणी वगैरे काळजीनें केली तर सारा देण्याचा दिवस येईल तेव्हां आपल्या हातीं चांगला संग्रह राहील."

यूरोपांत पाझिटिव्हिस्ट अथवा अस्तिक्यवादी म्हणून एक पंथ आहे. त्यांतील इतर मतें कशींहि असोत, पण एक तत्त्व घेण्यासारखें आहे तें असें:—"मनुष्याच्या वर्तनास व्यवस्थितपणा हा आधार, भूतदया ही मार्गदर्शक, व प्रगति हा साध्य हेतु असली पाहिजे."

इमर्सन म्हणतो, "पुष्कळ लोक आजपर्यंत आपल्या पूर्वजांच्या रीतीप्रमाणें देवाची भक्ति करीत आले आहेत. पण देवानें दिलेल्या सर्व गुणांचा सदुपयोग कर-

१. जॉन मॉर्ले २ड्यूअर्ट ३. डीन

णें आपलें कर्तव्य आहे, असें त्यांस अद्यापि वाटूं लागलें नाहीं."

मनुष्यप्राणी पाहिला तर किती क्षुद्र आहे ! पण तो मनांत आणील तर केवढ्या योग्यतेस चढण्यासारखा आहे ! मनुष्याच्या अंगीं आहे म्हटलें तर सर्व कांहीं आहे, नाहीं तर कांहीं नाहीं. म्हटलें आहे कीं,

"नर करे करनी तो नरका नारायन होय."

मनुष्य कसपटाप्रमाणें आहे खरा, पण त्याला विचारशक्ति आहे हा एक मोठा विशेष आहे. मनुष्याचा नाश करावयाचा असेल तर त्याला विश्वाच्या सर्व शस्त्रास्त्रांची जरूर नाहीं. वाफेची लहानशी झुळूक, किंवा पाण्याचा एक थेंबसुद्धां तेवढें काम करील. पण ह्या अवाढव्य विश्वानें मनुष्यास जरी चिरडून टाकिलें तरी विश्वापेक्षां मनुष्याचीच योग्यता मोठी ठरेल. कारण मी मरतों हें ज्ञान मनुष्यास होतें. पण मी मारतों हें ज्ञान विश्वाला होत नाहीं. मनुष्यामध्यें चिदंश आहे. विश्वामध्यें तो नाहीं.

(आर्या)

गिरयो गुरवस्तेभ्योप्युर्वी गुर्वी ततोपि जगदंडम् ॥
तस्मादप्यतिगुरवः प्रलयेऽप्यचला महात्मानः ॥ १

—जगन्नाथराय

भावार्थः—पर्वत मोठे आहेत, त्यांहीपेक्षां पृथ्वी मोठी आहे, तिच्यापेक्षांहि ब्रह्मांड मोठें आहे, पण प्रलयकालीं देखील ज्यांचें धैर्य ढळत नाहीं असे जे महात्मे ते ह्यां सर्वांपेक्षां मोठे आहेत.

मनुष्याला पूर्णत्व येण्यास पुढें सांगितलेले गुण

अवश्य आहेतः—शांत चित्त, उदार अंतःकरण, विवेकबुद्धि आणि निरोगी शरीर. शांत चित्त नसेल तर आपलें वर्तन उतावीळपणाचें होईल. उदार अंतः-करण नसेल तर आपण केवळ स्वार्थनिष्ठ होऊं. निरोगी शरीरावांचून आपल्या हातून फारसें काम होणार नाहीं. आणि विवेकबुद्धि नसेल तर आपल्या उत्तम हेतूंपासू-नहि उपकारापेक्षां अपकारच फार होईल.

एकाद्या मनुष्याची तारीफ करावयाची असली म्हणजे आपण म्हणतों कीं, तो मोठा सद्गृहस्थ आहे. खरे सद्-गृहस्थ जगांत फार थोडे असतात. राजा मोठमोठे किताब देईल, सरदारी देईल, पण सद्गृहस्थपणा देण्याचें सामर्थ्य त्याला नाहीं. तथापि आपण मनांत आणलें तर आपणा सर्वांस सद्गृहस्थ होतां येईल.

" ह्या नरजन्मामध्यें जेवढी उन्नति साध्य आहे ते-वढी साधून घ्यावयाची असेल तर मनुष्यानें आत्मसंयम आणि ब्रह्मचर्य ह्यांच्या योगानें आपलें आरोग्य, बल आणि उत्साह ह्यांचें रक्षण केलें पाहिजे; अनुभव आणि सर्वो-त्कृष्ट सुभाषितें ह्यांच्या योगानें आपलें मन सुसंस्कृत करून घेतलें पाहिजे; त्याचें कल्पनामंदिर जगांतील सर्व शुद्ध व सुंदर वस्तूंच्या चित्रांचें संग्रहालयच बनून राहिलें पाहिजे. त्याचें आचरण त्याच्या स्वतःच्या मनास, पर-मेश्वरास, आणि सर्व जगास संतोष देईल असें असलें पाहिजे. व त्याचें हृदय परमात्म्याचें मंदिर होण्यास योग्य असलें पाहिजे. "[१]

१. आर्च डीकन् फ्यारर

" आत्मशिक्षणाचा खरा मार्ग म्हटला म्हणजे असा आहे कीं, सर्व गोष्टींसंबंधानें पृच्छा करावी; कोणतीहि शंका आली तरी तिचें निराकरण करून घेतल्याशिवाय सोडूं नये; साधक--बाधक प्रमाणांचा पूर्ण विचार केल्याशिवाय कोणत्याहि मताचा स्वीकार करूं नये. विचारसरणींचा कोणत्याहि प्रकारचा दोष, किंवा असंबद्धपणा अगर घोंटाळा आपल्या नजरेंतून चुकून जाऊं देऊं नये. कोणत्याहि शब्दाचा उपयोग करण्यापूर्वीं त्याचा अर्थ स्पष्टपणें समजून घ्यावा; कोणत्याहि सिद्धांतास अनुमोदन देण्यापूर्वीं त्याचा नीट अर्थ समजून घ्यावा. आत्मशिक्षणासाठीं हेच धडे आपण शिकले पाहिजेत." व ते आपणा सर्वांस शिकतां येण्याजोगे आहेत.

शिक्षणाच्या निदान प्राथमिक क्रमासंबधानें तरी सर्व लोकांस सारख्या सोयी आहेत असें म्हणण्यास हरकत नाहीं. मोठी पदवी किंवा संपत्ति ह्यांच्यामुळें कांहीं म्हणण्यासारखी तफावत पडत नाहीं. सर विल्यम् जोन्स म्हणतो, " मी रंकाच्या स्थितीमध्यें असून राजपुत्राचें शिक्षण मिळविलें."—शिक्षण प्राप्त करून घेणें हें महाप्रयासाचें काम आहे खरें. पण त्यापासून केवढे मोठे लाभ आहेत! शिक्षणाच्या योगानें जगाच्या इतिहासावर प्रकाश पडून आपल्या उन्नतीचा मार्ग आपणांस उज्ज्वल दिसूं लागतो; जगांतील वाङ्मयाचें स्वारस्य कळूं लागतें; सृष्टिरूप महाग्रंथ वाचण्याचें सामर्थ्य येतें व जेथें जेथें आपण जाऊं तेथें तेथें आनंदाचीं साधनें आपणांस प्राप्त होतात.

१. जॉन स्टुअर्ट मिल्

(श्लोक)

व्यतिकरितदिगंताः श्वेतमानैर्यशोभिः ।
सुकृतविलसितानां स्थानमूर्जस्वलानाम् ॥
अकलितमहिमानः केतनं मंगलानां ।
कथमपि भुवनेऽस्मिन् तादृशाः संभवन्ति ॥१

—भवभूति

भावार्थः—

(श्लोक)

विमल यश जयांचें कीं प्रकाशे दिगंतीं ।
सुरुचिर सुकृतांचें स्थान जे पूर्ण होती ॥
अतुलबल महात्मे मंगलांचीं निधानें ।
जगिं अशिं बहुभाग्यें लाभती वीररत्नें ॥ १

वरील प्रकारचें धन्यवाद लोकांच्या तोंडांतून आपल्याविषयीं निघण्याची जरी आपणांस आशा नसली तथापि

(ओंवी)

साधु पवित्र पुण्यशील । अंतःशुद्ध धर्मात्मा केवल ॥
कर्मनिष्ठ स्वधर्मे निर्मल । निर्लोभ अनुतापी ॥ १

—रामदास

अशा प्रकारचे उद्गार निघण्याजोगें वर्तन ठेवणें आपल्या स्वाधीन आहे. कारण थोडेबहुत तरी उन्नत विचार ज्याच्या मनांत येत नाहींत असा मनुष्य विरळा. पण ते विचार कायम ठेवून त्यांप्रमाणें वर्तन करणें हें आपलें काम आहे.

शिक्षणाचे परिणाम कित्येक ठिकाणीं जसे व्हावे तसे दिसत नाहींत. ह्याचें कारण असें आहे कीं, पुष्कळ लोक

शिक्षणाचा मुख्य हेतु काय आहे हें अगदीं विसरतात. "कांहीं लोक आपली स्वाभाविक जिज्ञासा तृप्त करण्याच्याच हेतूनें विद्येची आणि ज्ञानाची इच्छा करितात. कित्येकांचा केवळ मनोरंजनाचा उद्देश असतो. कित्येकांस भूषण आणि कीर्ति मिळवावयाची असतात. परंतु आपल्या बुद्धीचा मनुष्यजातीस उपयोग व्हावा अशी मनापासून इच्छा करणारे लोक फार थोडे असतात. पुष्कळांना असें वाटतें कीं, ज्ञान म्हणजे जिज्ञासेनें तळमळणाऱ्या जीवास पहुडण्याकरितां केलेला एक छपरपलंगच आहे; अथवा चंचल मनाला मौजेनें फिरण्यासाठीं व सुंदर देखावे पाहण्यासाठीं केलेली गच्चीच आहे; अगर हा गर्वित मनाचा दिमाखानें बसण्याचा उंच मनोरा आहे; किंवा विक्री करून नफा मिळविण्यासाठीं हें एक दुकानच आहे. परंतु ज्ञानाच्या योगानें परमेश्वराचा अगाध महिमा कळूं लागतो व मनुष्यजातीची उन्नति होते, हे जे त्याचे खरे उपयोग ते कोणी लक्षांत घेत नाहीं."

१. बेकन

प्रकरण ८

पुस्तकालयें

(ओंवी)

कीं हे शब्दरत्नांचे सागर। कीं हे मुक्तांचें मुक्त सरोवर॥
नानाबुद्धीचें वैरागर। निर्माण झाले॥ १

—रामदास

८

पुस्तकालयें

एका इंग्लिश विद्वानानें सुमारें पांचशें वर्षांपूर्वीं पुस्तकांची प्रशंसा केली आहे ती अशी:—" पुस्तकें हे आपले गुरु आहेत. पण इतर गुरुजींप्रमाणें आपल्या विद्यार्थ्यांस शिकवितांना ते काठीचा उपयोग करीत नाहींत, किंवा कठोर वाग्बाण मारीत नाहींत. त्यांना पगार द्यावा लागत नाहीं. ते कधीं निजत नाहींत. तुम्हीं जाल तेव्हां शिकविण्यास तत्पर असतात. तुम्हीं त्यांना कांहीं शंका विचारिली असतां ते मोकळेपणानें उत्तर देतात, कांहीं लपवून ठेवीत नाहींत. त्यांच्याविषयीं तुमचा गैरसमज झाला तरी ते कुरकूर करीत नाहींत; तुमचें अज्ञान पाहून हांसत नाहींत. ह्याकरितां जें सर्व ज्ञानाचें भांडार आहे अशा पुस्तकालयाची योग्यता द्रव्याहून श्रेष्ठ आहे. ज्या मनुष्याला सत्याची आवड आहे, ज्याला खऱ्या सुखाची प्राप्ति करून घ्यावयाची आहे, ज्याला चातुर्य आणि विविधशास्त्रांत नैपुण्य मिळवावयाचें आहे, ज्याला धर्माचें रहस्य समजून घ्यावयाचें आहे त्यानें ग्रंथांशीं परिचय ठेविलाच पाहिजे."

हल्लींच्या काळीं तर ह्या म्हणण्याची यथार्थता विशेष दिसून येते. हल्लीं पुस्तकें किती सुलभ झालीं आहेत! छापण्याची कला निघाल्यापासून पुस्तकें सुवाच्य, सुंदर, आणि आटोपशीर झालीं असून किती थोड्या किंमतीस विकत मिळतात बरें! पानतंबाकूसाठीं एका दिवसांत जितका खर्च होतो तितक्या खर्चांत एक आठवडाभर

वाचण्यास पुरेल असें पुस्तक विकत घेतां येईल. माधवाचार्य, शंकराचार्य, ज्ञानेश्वर, वामन पंडित, मोरोपंत, ह्यांच्यावेळीं पुस्तकांना फार किंमत पडत असे व ती देऊनहि पुस्तक मिळविणें फार जड जात असे. प्राचीन काळचीं पुस्तकें ताडाच्या पानाचीं केलेलीं असून तीं फार अवजड आणि ओबडधोबड असत व तीं वाचतांना फार आयास होत असत. हल्लीं मोठमोठ्या गहन विषयांवरील ग्रंथ देखील सुलभ रीतीनें वाचतां येतात. आपणांस आतां पूर्वींचे सर्व ग्रंथ मिळत असून आणखी किती तरी नवीन नवीन ग्रंथांचा लाभ होत आहे ! पूर्वी फक्त ह्याच देशांतले ग्रंथ वाचावयास मिळत. आतां सर्व जगांतील विद्वानांचे ग्रंथ आपणांस मिळतात. रसायन शास्त्र, भूगर्भशास्त्र, मानस शास्त्र इत्यादि अनेक नवीन शास्त्रें निर्माण झालीं आहेत. आलीकडे जे नवे नवे शोध लागले आहेत त्यांच्या योगानें इतिहास, भूगोल, ज्योतिष इत्यादि विषय पूर्वीपेक्षां फार मनोरम झाले आहेत.

पदार्थविज्ञान वगैरे शास्त्रांच्या योगानें इंग्लंडसारखीं राष्ट्रें किती धनाढ्य झालीं आहेत बरें ! त्या शास्त्रांच्या योगानें संपत्तीची वाढ होते एवढेंच नाहीं, तर पुष्कळ बाबतींत आपला खर्च कमी होतो. म्हणून शाळा, पुस्तकालयें, पदार्थसंग्रहालयें इत्यादि स्थापन करण्यांत घातलेला पैसा फुकट न जातां त्यापासून देशाची संपत्ति वाढते. तथापि शाळा आणि सार्वजनिक पुस्तकालयें स्थापन करण्याचा मुख्य हेतु द्रव्यवृद्धि हा नाहीं; तीं स्थापण्याचा मुख्य उद्देश असा आहे कीं, त्यांच्या

योगानें सामान्य लोकांचा आयुष्यक्रम सुखावह होतो. विशेषेंकरून शहरांतल्या मजूरलोकांस पुस्तकालयांची फार जरूर आहे. त्यांचें नेहमींचें काम फार कंटाळवाणें असतें. त्यांच्यापेक्षां एकाद्या रानटी मनुष्याचें आयुष्य देखील अधिक मौजेचें असतें. त्याला ज्या पशूंची पारध करावयाची असते त्यांच्या पाळतीवर रहावें लागतें. त्याला मासे मारण्याचें काम शिकावें लागतें. दर महिन्याला त्याच्या कामांत व खाण्यापिण्यांत कांहीं तरी फेरफार होतो. त्याला आपलीं आउतें तयार करावीं लागतात. घर बांधावें लागतें. विस्तव पाडण्याचें काम आपणास फार सोपें झालें आहे, पण त्याला त्यांत कांहीं कसब लढवावें लागतें. त्याचप्रमाणें शेतकऱ्याच्या कामांतहि बराच फेरबदल असतो. त्याला नांगरावयाचें असतें, पेरणी करावयाची असते, कापणी करावयाची असते. त्याला एका ऋतूंत लावणीचें काम असतें तर दुसऱ्या ऋतूंत काढणी, मळणी, तोडणी करावयाची असते. नांगर धरणें, कुंपण करणें, धान्याची पेंढी बांधणें इत्यादि गोष्टी आपणांस वाटतात तेवढ्या सुलभ नाहींत. त्यांत थोडेंबहुत कौशल्य लागतें. वर्डस्वर्थ कवीची अशी गोष्ट सांगतात कीं, एका मनुष्यास त्याची अभ्यासाची खोली पहाण्याची इच्छा होऊन त्यानें त्या कवीच्या चाकरास ती कोठें आहे म्हणून विचारिलें. तेव्हां त्यानें उत्तर दिलें कीं, " ही धनीसाहेबांची खोली आहे. पण त्यांचा बहुतेक अभ्यास शेतांत व रानांत होत असतो. " शेतकऱ्यांना शेतांत बरेंच ज्ञान प्राप्त होतें. त्यांना किती माहिती असते ह्याची आप-

णांस कल्पना नसते. त्यांचें ज्ञान पुस्तकांतून नाहीं, तर शेतांतून प्राप्त झालेलें असतें, म्हणून त्यांची योग्यता कांहीं कमी नसते.

पण ज्या लोकांस दुकानांत किंवा कारखान्यांत बसून काम करावें लागतें, त्यांचें आयुष्य फार कंटाळवाणें असतें. त्यांना वर्षानुवर्षे एकच प्रकारचें काम करावें लागतें. जसजसा देशाचा व्यापार वाढतो तसतसा श्रमविभाग वाढून मजूर लोकांचें काम अधिकच कंटाळवाणें होतें. उदाहरणार्थ, खुर्च्यांचा मोठा कारखाना असला म्हणजे त्यांत कांहीं मजुरांस नुसते खुर्चीचे पायच सारा दिवस करीत बसावें लागतें. दुसऱ्यांना नुसते हातच करावे लागतात. दुसऱ्या कित्येकांस खुर्च्यांना पालिश करण्याचेंच काम असतें. अशा प्रकारच्या व्यवस्थेनें प्रत्येक मजुरास आपआपलें काम करण्यांत विलक्षण चलाखी येऊन काम लौकर होतें खरें, पण त्या मजुराचें मन अगदीं संकुचित होऊन तो एक बोलतेंचालतें यंत्रच बनून रहातो. मुंबईसारख्या शहरांतील मजूरलोकांची अशी स्थिति आहे. व आपल्या देशांत यंत्रकलेचा जसजसा प्रसार होईल तसतशी ही स्थिति सर्व शहरांतून दिसूं लागेल. मजूरलोकांच्या मनाचा कोतेपणा जाऊन त्यांची करमणूक व्हावी हा हेतु पूर्ण करण्यास पुस्तकालयासारखें दुसरें साधन नाहीं. मजूरलोकांना फुरसद फार थोडी मिळते खरी; पण जेव्हां मिळते तेव्हां ती आळसांत किंवा व्यसनांत घालविणें बरोबर नाहीं. फुरसदीची वेळ ही अमोलिक देणगी समजली पाहिजे. तिचा योग्य उपयोग केला असतां

सौख्य मिळतें. तीं आळसांत घालविली असतां दुःख होतें. एकाद्या मनुष्यास जेव्हां रोजगार नसतो तेव्हां त्यानें आपल्या वेळाचा कसा उपयोग करावा ? त्याचा पुस्तकालयांत प्रवेश होईल तर त्याला आपल्या वेळेचा सदुपयोग करितां येईल.

ज्या कारणासाठीं आपण आपल्या मुलांस शिक्षण देतों त्याच कारणासाठीं प्रौढ वर्गांतल्या मनुष्यांसहि शिक्षण पाहिजे. हल्लीं जिकडे तिकडे प्राथमिक शाळा झाल्या आहेत. त्यांत लहान मुलांस शिक्षण मिळतें. त्या ठिकाणीं मुलें वाचावयास शिकतात आणि वाचनाची त्यांना गोडी लागते. लहान मुलांस हें शिक्षण आपण कशासाठीं देतों बरें ? कारण शिक्षणापासून मनुष्याची सुधारणा होते, व त्याला आपलें काम चांगलें करितां येतें, अशी आपली खातरी आहे म्हणून. पण हें शिक्षण बालपणीं मिळालें म्हणजे तेवढ्यानें भागत नाहीं. प्रौढपणींहि तें चालू ठेविलें पाहिजे. आतां प्रौढ माणसांच्या शाळा म्हणजे पुस्तकालयेंच होत. मुलांस लहानपणीं वाचावयास शिकविल्यानंतर त्याला वाचण्यासाठीं पुस्तकें मिळण्याची तजवीज अवश्य झाली पाहिजे. सुदैवानें पुस्तकांचा दुर्भिक्ष होण्याचा कधीं संभव नाहीं ही मोठी चांगली गोष्ट आहे. एका गरीब बाईनें जेव्हां प्रथमच समुद्र पाहिला तेव्हां ती म्हणाली, "अहाहा ! सर्व मनुष्यांस यथेच्छ मिळण्यासारखी एकतरी वस्तु ह्या जगांत आहे हें पाहून मला मोठें समाधान वाटतें." पुस्तकांचीहि तशीच गोष्ट आहे. सर्व मनुष्यांस पुरण्याजोगा पुस्तकसंग्रह करणें फारसें कठिण

नाहीं. व जीं पुस्तकें सर्वांत उत्तम तीं तर फारच स्वस्त मिळतात. वाचनाचा आनंद श्रीमंत आणि गरीब ह्या दोघांसहि सारखाच सुलभ आहे. असा सारखेपणा फारच थोड्या गोष्टींसंबंधानें दिसून येतो. हल्लीं आपली अशी स्थिति झाली आहे कीं, आपणापाशीं जेवढ्या वस्तू असतील त्यांपेक्षां जास्त हव्याशा वाटतात. पण दैवयोगानें पुस्तकें मात्र आपल्याकडून वाचवतील त्याहून जास्त आपणांस मिळण्यासारखीं आहेत.

शिक्षण जन्मभर चालू असलें पाहिजे. ही गोष्ट आपणांस अलीकडे कळूं लागली आहे. तसेंच मुलांस शिक्षण द्यावयाचें तें केवळ शब्द आणि व्याकरण शिकविल्यानें पुरें होत नाहीं; तर त्यांना हस्तकौशल्य आणि अवलोकनशक्ति हीं जेणेंकरून येतील अशा प्रकारचेंहि शिक्षण पाहिजे. त्याचप्रमाणें प्रौढ स्त्रीपुरुषांनीं फक्त शारीरिक श्रम करून केवळ पैशाच्या पाठीं लागावें, आणि दुसरे कांहीं विचार त्यांच्या मनांत येऊं नयेत हा प्रकार ठीक नाहीं. त्यांचा थोडाबहुत वेळ ज्ञान मिळविण्यांत आणि आपली मानसिक सुधारणा करण्यांत जावा हें फार इष्ट आहे. दुसरें असें कीं, प्रत्येक मनुष्यानें मनुष्यजातीच्या ज्ञानांत यथाशक्ति भर घालण्याचा प्रयत्न कां करूं नये ? कितीहि हलक्या दर्जाचा मनुष्य असला तरी त्याला असा प्रयत्न करितां येईल. शारीरिक श्रमाची योग्यता आपणांस अद्यापि नीटशी कळूं लागली नाहीं. पुष्कळांना असें वाटतें कीं, शास्त्रीय शोध लावण्याचें काम सामान्य लोकांच्या आवांक्याबाहेर आहे; आणि ज्यांना मोठ्या कि-

मतीचीं यंत्रें घेण्याचें सामर्थ्य असेल व ज्यांची बुद्धि विशाल असेल, अशाच लोकांना तें साध्य आहे. पण हा समज चुकीचा आहे. इंग्लंड देशाची जी भरभराट झालेली आपण पहातों ती कोणामुळें? कांहीं अंशीं शहाणे राजे आणि मुत्सद्दी ह्यांच्यामुळें, कांहीं अंशीं तेथील शूर लष्कर आणि आरमार ह्यांच्यामुळें, कांहीं अंशीं दूरचे देश शोधून तेथें अम्मल बसाविणाऱ्या लोकांमुळें, व कांहीं अंशीं त्या देशांतील विद्वान् आणि तत्त्वज्ञानी ह्यांच्यामुळें. ह्या सर्वांचे उपकार त्या देशावर आहेत ह्यांत शंका नाहीं. तथापि त्या देशांतील मजूर लोकांचेहि उपकार लहानसहान नाहींत. त्यांनीं केवळ अंगमेहेनतीचींच कामें केलीं आहेत असें नाहीं, तर आपल्या बुद्धिबलानें त्यांनीं देशाचें फार कल्याण केलें आहे.

वाफेच्या यंत्राचा शोध लावणारा वॉट् हा सुताराचा मुलगा होता. हेन्री कार्ट हा एका गवंड्याचा मुलगा असून त्यानें अशा कांहीं यांत्रिक सुधारणा केल्या कीं, त्याच्या योगानें इंग्लंडच्या संपत्तींत बरीच भर पडली आहे. हंट्समन् हा एका घड्याळजीचा मुलगा होता. त्यानें पोलाद ओतण्याची युक्ति शोधून काढली. क्रांपटन् हा कोष्टी होता. वेजवुड हा कुंभार होता. ब्रिंड्ले, टेल्फर, मशट् आणि नीलसन् हे केवळ मजूर होते.

वाफेची गाडी तयार करणारा स्टिफन्सन् हा प्रथम केवळ गुराखी होता, व अठरा वर्षांच्या वयाचा होईपर्यंत त्याला लिहितां—वाचतां देखील येत नव्हतें. डाल्टन् हा कोष्ट्याचा मुलगा होता. फ्यारडे हा लोहाराचा मुलगा

होता. न्यूकम हाहि लोहाराचा मुलगा होता. आर्कराईट ह्याचा पहिला धंदा न्हाव्याचा होता. सर हंफ्रे डेव्ही हा औषधांच्या दुकानांत उमेदवार होता. ह्या व अशा दुसऱ्या पुष्कळ लोकांनीं जगावर फारच मोठे उपकार केले आहेत. व ज्या देशांत हे लोक निपजले त्या देशास त्यांच्याबद्दल अभिमान वाटणें सहाजिक आहे.

अमुक राष्ट्रें उन्नत स्थितीला पावलीं असें आपल्या ऐकण्यांत वारंवार येतें. व कांहीं राष्ट्रें इतर राष्ट्रांपेक्षां सुधारलेलीं आहेत हें खरें आहे. तथापि उन्नत हें विशेषण ज्याला पूर्णपणें लागू पडेल असें एकहि राष्ट्र नाहीं. आपल्या राष्ट्राची खरी उन्नति करण्याविषयीं आपण झटलें पाहिजे. व पुस्तकालयांची स्थापना करणें हा राष्ट्रोन्नतीचाच एक मार्ग होय.

पुष्कळ लोक असे आहेत कीं, त्यांचा जन्म म्हणजे एक सक्तमजुरीची शिक्षाच असते. अशा लोकांस सुख आणि मनोरंजन ह्यांचा लाभ होण्यास चांगल्या पुस्तकांसारखें दुसरें साधन नाहीं.

प्रख्यात शास्त्रज्ञ सर जान हर्शल ह्यानें म्हटलें आहे:— " सर्व प्रकारच्या स्थितींमध्यें मला उपयोगी पडणारी, संसारांत कसेहि बिकट प्रसंग आले आणि सर्व जगाची कितीहि वक्रदृष्टि माझ्यावर झाली तरी सदासर्वकाळ सुख आणि आनंद देणारी, अशी एकादी वस्तु देवापाशीं मला मागावयाची असली तर मी वाचनाची अभिरुचि मागून घेईन. ज्या मनुष्यास ही अभिरुचि आहे व ती तृप्त करण्याचीं साधनें आहेत त्याला सुखाची वाण कधीं पड-

णार नाहीं. त्याला सर्वकाळच्या अत्यंत शहाण्या, विनोदी, दयाळू, शूर, सद्गुणी आणि मनुष्यजातीस भूषणभूत अशा महात्म्यांचा समागम घडतो. त्याला सर्व देशांत आणि सर्वकालीं राहिल्याचें श्रेय मिळतें. सर्व जग त्याच्याकरितां निर्माण केलें आहे कीं काय असा भास होऊं लागतो."

पुस्तकें हे जणूं काय सजीव प्राणीच आहेत. मिल्टन् म्हणतो, "ग्रंथकर्त्याच्या चैतन्यासारखेंच कार्यक्षम चैतन्य ग्रंथामध्यें वास करीत असतें." मोठे ग्रंथकार सदा अमरच असतात.

(श्लोक)

ज्याचें विशाल मन उद्धरि सन्मनातें।
तो जाहला मृत असें न गमेच मातें॥
वास्तव्य जें हृदयमंदिरिं पूढिलांच्या।
त्यालाच मृत्यु वदणें अयथार्थ वाचा॥ १

पुस्तकें हा प्राचीन काळापासून सांठविलेला खजिना आहे.

नाना प्रकारच्या व्यसनांत किती पैसा खर्च होतो ह्याचा विचार केला तर पुस्तकांसंबंधानें केलेला खर्च दिवाळखोरी आहे असें कोण म्हणेल? खरोखर एकाद्या व्यसनास जितका पैसा लागतो त्याचा अल्प अंश देखील पुस्तकांप्रीत्यर्थ खर्च होत नाहीं. हल्लीं ज्या ठिकाणीं दारूचे पिठे, जुगाराचे अड्डे, व गांजाचीं दुकानें दिसतात, त्या ठिकाणीं पुस्तकालयें ज्या दिवशीं दिसूं लागतील तो सुदिन होय.

प्रकरण ९

वाचन

(श्लोक)

काव्यशास्त्रविनोदेन । कालो गच्छति धीमतां ॥
व्यसनेन तु मूर्खाणां । निद्रया कलहेन वा ॥ १

—सुभाषित

भावार्थः—जे शहाणे लोक असतात त्यांचा काल काव्यशास्त्रादिकांच्या वाचनापासून होणाऱ्या आनंदांत जातो. पण मूर्खांचा वेळ व्यसनांत, झोंपेंत, आणि भांडणांत जातो.

(श्लोक)

पुराणकाव्यें पढतां अहर्निशीं ।
उदारता येइ मदीय बुद्धिशीं ॥
कवींद्र माझे असती सखे सदा ।
असे तयांची सरसोक्ति तोषदा ॥ १

—कुसुमांजलि

प्रकरण ९

वाचन

स्मरणशक्तीचा जो उपयोग मनुष्यास होतो तोच पुस्तकांच्या योगानें मनुष्यजातीस होतो. मनुष्यजातीचा इतिहास, मनुष्यानें केलेले सर्व शोध, हजारों वर्षांचा त्याचा अनुभव आणि ज्ञान, ह्या सर्वांचें संरक्षण पुस्तकें करितात. तीं सृष्टींतील सर्व सुंदर आणि अद्भुत वस्तूंचीं हुबेहुब चित्रें आपल्या डोळ्यांसमोर काढितात. पुस्तकें आपणांस अडचणीच्या प्रसंगीं मदत करितात; आपण दुःखांत किंवा विपत्तींत असतांना तीं आमचें समाधान करितात; तीं आमच्या मनांत कल्पनांचा व सुविचारांचा भरणा करितात; आणि एकंदरींत आह्मांस उन्नतावस्थेप्रत नेतात.

अशी एक आख्यायिका आहे कीं, एका शहरांत दोन मनुष्य होते. त्यांपैकीं एक राजा होता व दुसरा भिकारी होता. जो राजा होता त्याला प्रतिरात्रीं असें स्वप्न पडे कीं, मी भिकारी आहें. भिकारी होता त्याला प्रत्येक रात्रीं स्वप्नांत असा भास होई कीं, मी राजा आहें. मला वाटतें कीं, त्या राजाची स्थिति भिकाऱ्याच्या स्थितीहून फारशी चांगली होती असें नाहीं. कधीं कधीं कल्पनेचा प्रभाव साक्षात् वस्तूंपेक्षांहि जास्त असतो. वाचनाच्या योगानें आपणांस वाटेल तर राजपद आणि प्रासादसुख ह्यांचा अनुभव घेतां येतो, व एका क्षणांत श्रमावांचून, सुखानें आणि विनखर्चानें भूतलावरील अत्यंत रमणीय स्थळीं गमन करितां येतें.

(श्लोक)

सोडा हो मजला सुखें विहरण्या जाईन मी सत्वरी ।
जेथे ग्रंथ सखे मदीय वसती तें स्थान माझी खरी ॥
आहे राजसभा तिथें कविमुनीतत्त्वज्ञवर्यांसवें ।
केव्हां भूपतिंच्या सवें करितसें संभाषणा उत्सवें ॥ १
तेथें मी नृपनीतिची करितसें पृच्छा समादृष्टिनें ।
न्याय्यान्याय्य कृती विलोकुनि करीं भूपांसही शासनें ॥
हे आनंद चिर त्यजूनि विभवा मोघा वरूं काय मी ।
द्रव्यार्थी धनराशि मेळवु सुखें ज्ञानार्जनीं सक्त मी ॥ २

—फ्लेचर

पुस्तकांना मित्रांची उपमा देण्याची वहिवाट आहे. पण आपल्या मानवी मित्रांपैकीं उत्तम उत्तम मित्रांस निर्दय काळ ओढून नेतो. पुस्तकरूपी मित्रांपैकीं उत्तम जे आहेत त्यांना कधीं मरण नाहीं. त्यांपैकीं वाईट जेआहेत ते मात्र काळाच्या तावडींत सांपडून लवकर नाश पावतात.

(श्लोक)

ग्रंथांत आत्मा वसतो पवित्र । बाहेर राहे जड देह मात्र ॥
आत्मे सुधींचें हित पुस्तकांनीं । नेती सुमार्गी नच आडरानीं ॥
सत्पुस्तकांस मृत्यु कदा न येई । कालांतरें शुद्धिच मात्र होई ॥
कुपुस्तकें पावति शीघ्र नाश । राहूं न दे त्यांस जगांत ईश । १

—लिटन्

ज्यांना ह्या जगांत कांहीं कमी नव्हतें अशा बऱ्याच लोकांनीं आपला असा अनुभव सांगितला आहे कीं, आमच्या खऱ्या आनंदाचा बराच भाग आह्मांस पुस्तकांपासून प्राप्त झाला. लेडी जेन ग्रे ह्या नांवाची एक प्रख्यात राजकन्या इंग्लंडच्या राजघराण्यांत होऊन गेली. तिच्या

वाचनाच्या अभिरुचीविषयीं एक गोष्ट सांगतात ती फार चित्तवेधक आहे. ही विदुषी आपल्या खोलीच्या खिडकीपाशीं बसली होती, व साक्रेतिसानें न्यायाधीशासमोर आपल्या निरपराधीपणाच्या शाबितीकरितां भाषण केलें त्या प्रसंगाची हृदयंगम हकीकत प्लेटोच्या पुस्तकांतून ती वाचीत होती. त्याच वेळीं तिचे आईबाप शेजारच्या अरण्यांत शिकार करीत होते. शिकारी कुत्रीं मोठ्यानें भुंकत होतीं त्यांचा आवाज तिच्या खोलींत स्पष्ट ऐकूं येत होता. तेव्हां तिला कोणीं म्हटलें कीं, बाईसाहेब शिकारीची मौज सोडून आपण एथेंच बसलां ह्याचें मला मोठें आश्चर्य वाटतें. तेव्हां ती म्हणाली कीं, प्लेटोचें पुस्तक वाचण्यांत जो आनंद मला वाटतो त्याच्या शतांशाहि शिकारींत नाहीं असें मला वाटतें.

मेकॉले ह्यास द्रव्य, कीर्ति, पदवी, आणि अधिकार ह्यांची कांहीं कमतरता नव्हती. पण त्यानें असें म्हटलें आहे कीं, मला पुस्तकांपासून जें सुख प्राप्त झालें आहे त्यापुढें इतर सुखें तुच्छ आहेत. त्यानें एका लहान मुलीस पत्र लिहिलें आहे त्यांत तो म्हणतोः—" प्रिय मुली, तुझें सुंदर पत्र वाचून मला फार आनंद झाला. तुला सुखी करण्यांत मला नेहमीं आनंद वाटतो. तुला पुस्तकें आवडतात हें पाहून तर मला फार संतोष वाटतो. तूं माझ्याएवढी मोठी झालीस म्हणजे तुला कळून येईल कीं, खाऊ आणि खेळणीं आणि जगांतील सर्व सुंदर देखावे ह्यांपेक्षां पुस्तकांची योग्यता अधिक आहे. मला जर कोणीं सार्वभौम राजाचें पद दिलें, मोठमोठे वाडे, गाड्या, घोडे, हजारों नोकर, वगैरे वैभव

दिलें, आणि त्यावरोवर अशी अट ठेविली कीं मीं पुस्तकें म्हणून वाचतां कामा नये, तर मी तें राजपद आणि राजवैभव मला नको म्हणून सांगेन. वाचनाचें सौख्य ज्याला नाहीं अशा प्रकारचा राजा होण्यापेक्षां, नानाप्रकारच्या ग्रंथांनीं परिपूर्ण अशा झोंपडीमध्यें गरीबींत रहाणें हेंच मला अधिक पसंत वाटेल."

"एकाद्या पुस्तकापासून आपणांस आनंद होत नसेल तर तो त्या पुस्तकाचा दोष आहे असेंच खातरीनें समजूं नये. वाचनांत देखील एकप्रकारचें कौशल्य लागतें. विचार केल्याशिवाय वाचीत सुटण्यांत कांहीं फायदा नाहीं. आपण जें वाचतों तें नीट समजण्याचा प्रयत्न केला पाहिजे. प्रत्येकास असें वाटत असतें कीं, लिहिण्या-वाचण्याची कला आपणास पूर्णपणें अवगत आहे. पण खरोखर फारच थोड्या लोकांस चांगलें लिहितां आणि वाचतां येत असेल. लक्ष दिल्याशिवाय ओळीच्या मागून ओळी वाचीत गेलें आणि पुष्कळ पानें फिरविलीं म्हणजे वाचन होत नाहीं. ज्या देखाव्यांचें वर्णन केलें असेल, व ज्या मनुष्यांचा उल्लेख केला असेल ते देखावे व तीं मनुष्यें डोळ्यांसमोर स्पष्ट दिसलीं पाहिजेत. अनुभवाच्या योगानें ज्या गोष्टी शिकण्यास वीस वर्षें लागतील त्या विद्येच्या योगानें एका वर्षांत शिकतां येतात. विद्येच्या योगानें शिकतांना कांहीं इजा किंवा नुकसान होत नाहीं. अनुभवाच्या साधनानें शिकणाऱ्या मनुष्यास शहाणपण येतें, पण त्याच्या शतपट दुःख भोगावें लागतें. प्रत्यक्ष अनुभवावांचून जो शहाणा होत नाहीं त्याची बरीच

हानि होत असते. जो नाखवा आपल्या हातून बरींच गल-बतें फुटेपर्यंत आपल्या कामांत हुषार होत नाहीं, किंवा जो व्यापारी बऱ्याच वेळां दिवाळें निघाल्यावांचून श्रीमंत होत नाहीं, तो दुर्दैवी नव्हे काय? अनुभवानें मिळविलेलें शहाणपण फार खर्चाचें होय. आपणास एकाद्या ठि-काणीं सर्वांत जवळच्या रस्त्यानें जावयाचें असून तो रस्ता शोधून काढण्याकरितांच जर आपणास फार भट-कावें लागलें तर किती वाईट वाटतें बरें! मला विद्येची जरूर नाहीं, मी स्वतःच्या अनुभवानें शहाणा होईन, असें जो मनुष्य म्हणत असेल त्याच्या अंगीं कितीहि हुषारी असली तरी जसा एकादा अतिशय चपल मनुष्य देखील अंधारांत चालत असतां आपला मार्ग सोडून दूर जातो, व मी कोठें जात आहें हें त्यास समजत नाहीं, तद्वत् त्याची अवस्था होते. विद्येचें सहाय्य न घेतां केवळ अनुभवाच्या जोरावर शहाणे होणाऱ्या लोकांची संख्या फारच थोडी असेल. आणि त्या थोड्यांच्या दे-खील मागील आयुष्यक्रमाकडे आपण थोडेसें लक्ष दिलें तर असें दिसून येईल कीं, त्यांच्या हातून मोठ्या चुका झाल्या आहेत, व त्यांच्यावर भयंकर संकटें येऊन गेलीं आहेत. असा विचार केल्यावर आपल्या मुलानें अशाच अनुभवाच्या साधनानें शहाणपणा आणि सौख्य हीं मि-ळवावीं असें कोणास तरी वाटेल काय?"

ज्याप्रमाणें मित्रांची त्याचप्रमाणें पुस्तकांची निवड क-रणें हें फार विचाराचें काम आहे. ज्याप्रमाणें आपल्या

१. आस्क्याम्

कृत्यांबद्दल त्याचप्रमाणें आपल्या बऱ्या-वाईट वाचनाब-द्दल आपणावर मोठी जबाबदारी असते. मिल्टन् ह्यानें ग्रंथांविषयीं एक सुंदर रूपक केलें आहे. तो म्ह-णतो, " महात्म्यांचा एक जन्म संपल्यावर ह्याच जगांत त्यांचा दुसरा जन्म सुरू होतो व त्या जन्मांत त्यांचा जीवनव्यापार चालू राहण्याकरितां त्यांचें मागील जन्मींचें रक्त सद्ग्रंथरूपानें अविनाशी होऊन उपयोगीं पडतें. "

मुलींच्या शिक्षणासंबंधानें रस्किन् ह्यानें म्हटलें आहे:— " मुलींच्या हातीं कोणतीं पुस्तकें पडतात ह्याच्यावर चां-गली नजर ठेविली पाहिजे. मौर्ख्य-जलाच्या कारंजांतील तुषारांनीं थबथबलेलीं नवीन नवीन पुस्तकें निघत अस-तात तीं, त्यांच्या हातीं न जातील अशी खबरदारी ठे-विली पाहिजे. "

पुस्तकांपासून जेवढें म्हणून हित आणि सौख्य मि-ळण्याजोगें आहे तेवढें सर्व मिळविण्याची ज्याची इच्छा असेल त्यानें मनोरंजनापेक्षां आत्मोन्नतीचाच हेतु मनांत धरला पाहिजे. कादंबऱ्या-नाटकें वगैरे मनोरंजक पुस्तकें ह्यांचा पुष्कळ उपयोग आहे खरा, पण तो साखरेप्रमाणें आहे. साखरेवर जसा आपला निर्वाह होणें शक्य नाहीं, त्याचप्रमाणें सारा वेळ कादंबऱ्याच वाचीत बसल्यास आ-पली सुधारणा होणार नाहीं.

कांहीं पुस्तकें अशीं असतात कीं, त्यांना पुस्तक हें नांवच शोभत नाहीं. व तीं वाचणें म्हणजे व्यर्थ काल-क्षेप करणें होय कांहीं पुस्तकें इतकीं वाईट असतात कीं तीं वाचकांवर अपवित्र संस्कार करितात. तींच पुस्तकें

जर माणसें असतीं तर आपण त्यांस लाथ मारून हांकून दिलीं असतीं. ह्या जगांत अनेक प्रकारचे मोहपाश आहेत, त्यांबद्दल आपणांस इशारत मिळावी हेंहि कधीं-कधीं जरूर असतें. तथापि जीं पुस्तकें वाचकांस दुराचाराचा अतिपरिचय करून देतात तीं वाईटच समजलीं पाहिजेत.

कांहीं पुस्तकें अशीं आहेत कीं, तीं वाचल्यापासून मनुष्याची कांहींतरी सुधारणा झाल्यावांचून रहात नाहीं. सुदैवानें अशा प्रकारचीं पुस्तकें पुष्कळ आहेत. जीं पुस्तकें आपणास आपल्या धंद्यासंबंधानें उपयोगी पडतात तेवढींच पुस्तकें उपयुक्त आहेत असें समजूं नये. त्या पुस्तकांच्या योगानें आपला निर्वाह चालतो हा उपयोग आहे खरा, पण निर्वाहसाधन हा पुस्तकांचा अत्यंत श्रेष्ठ उपयोग नव्हे. जीं पुस्तकें आपणांस निर्ममत्वाच्या आणि निरहंकाराच्या उच्च प्रदेशांत नेऊन सोडितात, आणि ह्या जगांतील दुःखांचा व संकटांचा विसर पाडितात तींच पुस्तकें सर्वांत श्रेष्ठ होत.

अशा प्रकारचें पुस्तक वाचीत असतां जर कोणी त्रास दिला तर त्यानें आपली मोठी हानि केली असें आपणांस वाटतें. समजा कीं, ज्याचे रीतिरिवाज आपणाहून अगदीं भिन्न आहेत व जो अन्य युगांत निर्माण झाला अशा एकाद्या ग्रंथकाराचें पुस्तक वाचण्यांत आपण गर्क झालों आहों; उदाहरणार्थ प्लेटोच्या ग्रंथांतून साक्रेतिसावर चाललेल्या खटल्याच्या इनसाफाची हकीकत आपण वाचीत आहों; त्या वेळेचा सर्व देखावा आपल्या

डोळ्यांपुढें हुबेहुब दिसत आहे; पांचशें लोकांची ती न्यायसभा, ग्रीक काळची ती भव्य इमारत, न्यायसभेंतील अथेन्स शहरवासी प्रेक्षकांची गर्दी, साक्रेतिसाचे मत्सरग्रस्त शत्रू, दुःखानें विव्हळ झालेले त्याचे मित्र (ज्यांचीं नांवें अमर आहेत व आपणांस अद्यापि प्रिय वाटतात), हीं सर्व आपणापुढें स्पष्ट दिसत आहेत. ह्या सर्वांच्या मध्यभागीं जाडेभरडे गरिबीचे कपडे घातलेला एकच मनुष्य दिसत आहे. हिंवाळा असो; उन्हाळा असो, सदोदित तेच कपडे तो घालतो. त्याचा चेहरा इतका साधा आहे कीं, कित्येकांस तो कुरूप वाटेल. पण त्या चेहेऱ्यावर मानसिक धैर्याचें व आत्मनिग्रहाचें असें अप्रतिम तेज झळकत आहे कीं, तें ओढूनताणून कधींहि येणार नाहीं. अशा त्या व्यक्तीच्या मुखांतून गंभीर वाणीनें शब्द येण्यास नुकती सुरवात झाली आहे, अशा वेळीं आपणास कोणीं त्रास न देतां जर आपलें वाचन शेवटास गेलें तर त्या घटकेंत जो अनिर्वाच्य आनंद आपणास होईल त्यासारखें मानसिक श्रमाचें अत्यंत श्रेष्ठ फळ दुसरें नाहीं.

चांगलें व मनोरंजक पुस्तक वाचून ज्याचें मन उन्नत होत नाहीं व ज्याला धन्यता वाटत नाहीं असा मनुष्य विरळा. अशा पुस्तकाचा केवळ क्षणिक परिणाम होत नाहीं. आपल्या मनावर थोडाबहुत तरी कायमचा संस्कार होऊन कांहीं उन्नत विचारांचा संग्रह आपल्या मनांत होतो व त्याचा आपणास हवा तेव्हां उपयोग होतो.

आपल्या देशांत जें वाङ्मय आजपर्यंत निर्माण झालें आहे त्याची योग्यता अवर्णनीय आहे. तें वाङ्मय आमचें सर्वोत्कृष्ट धन आहे. तें आमच्या देशाचें अत्यंत सुंदर भूषण आहे. व तें आपणास प्राप्त झालें हें आमचें थोर भाग्य समजलें पाहिजे.

रामदासस्वामींनीं कवींची थोरवी वर्णिली आहे ती अगदीं यथार्थ आहे.—

(ओंव्या)

कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसांचे ओघ लोटले ॥
नाना सुखांचें उचंबळलें । सरोवर हें ॥ १
कीं हीं विवेकनिधीचीं भांडारें ॥ प्रकट जाहलीं मनुष्याकारें ॥
नानावस्तूंचेनि विचारें । कोंदाटिले हे ॥ २
कीं हीं सुखाचीं तारवें लोटलीं । अक्षय आनंदें उतटलीं ॥
विश्वजनांसी उपयोगा आलीं । नाना प्रयोगांकारणें ॥ ३

प्रकरण १०

देशभक्ति

(श्लोकार्ध)

दुर्लभं भारते जन्म । मानुष्यं तत्र दुर्लभं ॥

भावार्थः—भरतखंडांत जन्म होणें हें दुर्लभ आहे व त्यांत-हि मनुष्याचा जन्म पावणें अत्यंत दुर्लभ होय.

प्रकरण १०

देशभक्ति

ज्या गुणाच्या अभावीं मनुष्यास मनुष्य हें नांव शोभणार नाहीं असा जर एकादा गुण असेल तर तो स्वदेशप्रीति हा होय. हा माझा देश, ही माझी जन्मभूमि असे प्रेमळ उद्गार ज्याच्या तोंडांतून कधींहि निघत नाहींत तो मनुष्य केवळ पशूच होय. ज्या देशांत परमेश्वरानें आपणास जन्मास घातलें आहे त्या हिंदुस्थान देशासारखी सुंदर आणि चमत्कारपूर्ण भूमि साऱ्या दुनियेंत दुसरी नसेल. पृथ्वीमातेची आर्यभूमि ही सर्वांत लाडकी कन्या आहे ह्यांत संशय नाहीं. तिनें आपला सर्वोत्कृष्ट आणि बहुमोलाचा शिरोऽलंकार जो हिमनग तो आर्यभूमीच्या वेणींत गुंफिला आहे त्यामुळें तिला अवर्णनीय शोभा आली आहे. तिनें गंगा, यमुना, कृष्णा, गोदावरी इत्यादि पवित्र आणि उज्ज्वल मुक्ताहार तिच्या गळ्यांत घातले आहेत. ती निरनिराळ्या ऋतूंत तिला नवीन नवीन उंची वस्त्रें परिधान करण्याकरितां देते. आपली आर्यभूमि प्राचीन काळापासून लक्ष्मीचें व सरस्वतीचें केवळ माहेरघर आहे. अशा ह्या देशजननीच्या हितार्थ रात्रंदिवस झटण्यास प्रत्येक आर्यपुत्रास अभिमान आणि आनंद वाटला पाहिजे.

हिंदुस्थान देशांत पृथ्वीवरील सर्व देशांतील हवेचा व देखाव्यांचा नमुना दृष्टीस पडतो. पृथ्वीवरील सर्व प्रकारचीं धान्यें व फळें एथें होतात. आम्रवृक्षासारखीं उत्तम

फळझाडें, चंदनासारखे सुवासिक वृक्ष, चंपक, पारिजात, मालती, केतकी, मोगरा, जाई, जुई इत्यादिकांसारखे उत्कृष्ट पुष्पवृक्ष आणि लता हिंदुस्थानाबाहेर क्वचित् दृष्टीस पडतील.

ज्या देशांत ऋग्वेद, उपनिषदें, भगवद्गीता इत्यादिक महाग्रंथ निर्माण झाले; व्यास, वाल्मीकी, याज्ञवल्क्य इत्यादिक महामुनी झाले; कालिदास, भवभूती ह्यांसारखे कवीश्वर झाले; रामचंद्र, धर्म, नल, ह्यांसारखे पुण्यश्लोक राजे उत्पन्न झाले; भीष्म, द्रोण, अर्जुन, कर्ण, ह्यांसारखे वीरशिरोमणी निपजले; जेथें आत्मज्ञानाचा प्रथम उदय होऊन अत्यंत उत्कर्ष झाला; ज्या देशानें गणित, ज्योतिष इत्यादि शास्त्रें सर्व जगास शिकविलीं; त्या देशाचें महत्त्व काय वर्णन करावें ? अशा देशांत जन्म प्राप्त झाल्याबद्दल कोणास अभिमान वाटणार नाहीं ?

ज्या लोकांमध्यें अगदीं परवांपर्यंत शिवाजी, पहिले बाजीराव, थोरले माधवराव, ह्यांसारखे शूर व शहाणे राजे झाले; परशुरामभाऊ पटवर्धन, बापू गोखले, जिवबा बक्षी ह्यांसारखे पराक्रमी सरदार झाले; नाना फडणविसासारखे थोर मुत्सद्दी झाले; रामदास, तुकाराम ह्यांसारखे महान् साधु झाले ज्या ;लोकांत न्यायमूर्ती रानडे, तेलंग, दादाभाई नवरोजी, डॉ. राजेंद्रलाल मित्र, डॉ. भांडारकर, नामदार गोखले ह्यांसारखे विद्वन्मणी; डॉ. बोस् व मि. गज्जर ह्यांसारखे शास्त्रविशारद, कै॰ केरूनाना छत्रे, व परांजपे ह्यांसारखे गणिती; व सर जमशेटजी, मि॰ टाटा ह्यांसारखे दानशूर निर्माण होत आहेत त्या

लोकांस आपल्या भावी उत्कर्षाबद्दल निराश होण्याचें मुळींच कारण नाहीं.

आपलें हिंदु राष्ट्र ग्रीक, रोमन इत्यादि प्राचीन राष्ट्रांपेक्षां फार प्राचीन आहे. इतर जुन्या राष्ट्रांचा नायनाट होऊन हजारों वर्षें झालीं, तथापि आमचें राष्ट्र अद्यापि आपल्या भरज्वानींत आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. ऐहिक वैभवाचीं चिन्हें प्रस्तुतकाळीं एथें दिसत नाहींत म्हणून आमचें राष्ट्र निकृष्टावस्थेप्रत पोंचलें आहे असें मानण्याचें मुळींच कारण नाहीं. समुद्रास ज्या वेळीं ओहोटी होते तेव्हां किनाऱ्यावर उभा राहून पहाणारास समुद्र आटल्यासारखा दिसतो. पण जो अंमळ पुढें जाऊन पाहील त्याला तो नेहमीं भरलेला दिसतो. ऐहिक वैभव आणि ऐहिक दारिद्र्य हीं समुद्राच्या भरतीओहोटीप्रमाणें एकामागून एक येतात आणि जातात. आत्मनिग्रह, शांति, दया, क्षमा, संतोष, सद्वर्तन आणि उद्यमशीलता, इत्यादिक दैवी संपत्ति जोंपर्यंत आपणांमध्यें वास करीत आहेत, तोंपर्यंत आपण दरिद्री झालों किंवा निकृष्ट झालों असें म्हणण्याचें कारण नाहीं. ही संपत्ति आमच्यामध्यें असल्यावर ऐहिक संपत्ति कैक वेळां येईल आणि कैकवेळां जाईल. रोमन लोकांजवळ पुष्कळ ऐहिक संपत्ति होती. पण त्यांची दैवी संपत्ति नष्ट झाल्याबरोबर ते आपल्या वैभवासकट केव्हांच लयास गेले.

देशभक्ति म्हटली म्हणजे केवळ देशांतील भूमीची भक्ति नव्हे. आपल्या देशांत जें जें कांहीं चांगलें आहे त्याविषयीं आपणास प्रेम व योग्य अभिमान वाटला पा-

हिजे. आपला धर्म, आपले ग्रंथ, आपल्या प्राचीन व अ-
र्वाचीन भाषा, आपले ग्रंथकार, कवि, मुत्सद्दी, आपला
इतिहास, आपल्या चालीरीती, पोषाख, वगैरे गोष्टींब-
द्दल योग्य स्वाभिमान असला पाहिजे. आपल्या पूर्वजांनीं
ईश्वरभक्तीकडे व परमार्थाकडे जितकें लक्ष पुरविलें आहे
तितकें दुसऱ्या कोणत्याहि राष्ट्रांतील लोकांनीं पुरविलें न-
सेल. ह्यामुळें आमच्या इकडील धर्मविषयक ग्रंथांमध्यें आ-
ध्यात्मिक ज्ञानाचा अमोलिक संग्रह झालेला आहे. व तें
ज्ञानामृत प्राशन करण्यास इतर राष्ट्रेंहि उत्कंठित होऊं
लागलीं आहेत. अलीकडील पिढीच्या लोकांचें लक्ष ह्या
ज्ञानभांडाराकडे लागलें आहे ही आनंदाची गोष्ट आहे.
तथापि अजून त्यासंबंधानें वरीच उदासीनता आहे ह्यांत
शंका नाहीं. धर्म हा नीतीचा व राष्ट्रोन्नतीचा पाया आहे
हें इतिहाससिद्ध आहे. म्हणून आपल्या धर्मविषयीं जा-
गृति ठेवणें हें प्रत्येक सुजाण मनुष्याचें कर्तव्य आहे.

आपल्या संस्कृत भाषेंत व मराठी भाषेंत मोठमोठ्या
नामांकित कवींनीं काव्यें रचून आमच्या देशास मोठें
भूषण करून ठेविलें आहे. तथापि सुशिक्षित लोकांमध्यें
ज्ञानेश्वर व तुकाराम ह्यांसारख्या प्रासादिक कवींच्या कृ-
तींचे भोक्ते किती थोडे आहेत ह्याचा विचार केला अ-
सतां अत्यंत खेद वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

आपल्या देशांत ज्या कांहीं वाईट गोष्टी असतील त्या
नाहींतशा करण्यासाठीं यथाशक्ति व योग्य मार्गानें प्र-
यत्न करणें हेंहि प्रत्येक देशभक्ताचें काम आहे. तथापि
वाईटावरोवर चांगलेंहि न जाईल असा वंदोवस्त ठेविला

पाहिजे. समाजाची सुधारणा लौकर होत नाहीं म्हणून अधीर होण्याचें कारण नाहीं. सर्व सुधारणा एका पिढींत व आपल्या डोळ्यांसमोर व्हाव्या अशी हांव धरणें हें योग्य नाहीं. सुधारणा घडवून आणण्यांत आपला पामरांचा कितीसा अंश असणार? परमेश्वराचें लक्ष मनुष्यजातीच्या कल्याणाकडे आहे हें ध्यानांत वागवून आपल्या हातून होईल तेवढी समाजसेवा निरपेक्ष व निरभिमानबुद्धीनें करणें हें आपलें काम आहे. पण त्या सेवेपासून लौकर फलनिष्पत्ति झाली नाहीं तरी आपल्या मनाची शांतता कायम ठेविली पाहिजे. समाजामध्यें एकाएकीं फेरफार होत नाहींत हें समाजाच्या चिरस्थायित्वाचें एक लक्षण आहे असें म्हटल्यास काय हरकत आहे?

परकीय राष्ट्रांपासून ग्रहण करण्यासारखे जे गुण असतील ते घेणें हें देशभक्तीच्या विरुद्ध नाहीं एवढेंच नाहीं, तर प्रत्येकाचें कर्तव्य आहे. पण ते गुण खरोखर घेण्यासारखे आहेत अशी प्रथम खातरी करून घेतली पाहिजे. दुसऱ्याचे दुर्गुण घेणें फार सोपें आहे; पण दुसऱ्याचे सद्गुण घेणें फार कठिण आहे. युरोपियन लोकांपासून आपल्या लोकांनीं घेण्यासारखे पुष्कळ गुण आहेत. त्यांची देशभक्ति, त्यांची एकी, त्यांचा नियमितपणा व टापटीप, त्यांचा दृढ निश्चय, दीर्घ उद्योग, पराक्रम, शौर्य इत्यादि अमोलिक गुण प्रत्येकानें अनुकरण करण्यासारखे आहेत. देशहितापुढें स्वहित तुच्छ मानण्याचा तर त्यांचा बाणाच आहे. हे गुण त्यांचा पेहेराव व खाण्यापिण्याच्या रीती उचलल्यानें कधींहि येणार नाहींत. आपण त्यांच्या

पोषाखाचें अनुकरण करितों. पण त्यामुळें स्वकीयांच्या व परकीयांच्याहि दृष्टीनें तुच्छ ठरतों. स्वतःच्या राष्ट्रीय पोषाखाविषयीं युरोपियन लोकांमध्यें जो अभिमान आहे त्याचें आपण अनुकरण करीत नाहीं.

आपला पोषाख हिंदुस्थानच्या स्थितीस व हवेस योग्य असाच आहे. तो थोड्या खर्चानें होत असून, आपल्या लोकांस चांगला शोभतो, तथापि त्यांत कालमानाप्रमाणें थोडाबहुत फेरफार होणें साहजिक आहे. पण तो फेरफार करतांना आपल्या पोषाखाचें राष्ट्रीयत्व नष्ट होऊं देतां कामा नये.

इतर राष्ट्रांच्या पोषाखाप्रमाणें त्यांच्यामध्यें जे ऐषआरामाचे प्रकार आहेत त्यांचेंहि अनुकरण आपल्या देशांत होण्याची फार भीति आहे. हे प्रकार आपल्या समाजांत शिरूं नयेत म्हणून प्रत्येक देशभक्तानें दक्षता ठेविली पाहिजे. मादक पदार्थ सेवन करण्याची चाल युरोपियन लोकांमध्यें पूर्वीपासून आहे, व ती त्यांची त्यांनाच नकोशी झाली आहे, हें इकडील अनुकरणशील लोकांनीं ध्यानांत ठेवून अशा प्रकारची संवय आपणांस लागूं नये म्हणून फार जपलें पाहिजे.

आपल्या देशांतील लोकांची रहाणी फार साधी व मितव्ययाची आहे. तिच्या ऐवजीं युरोपियन तऱ्हेची रहाणी आणण्याचा प्रयत्न करण्यांत कांहीं फायदा नाहीं. मितव्ययी मनुष्यास उधळेपणाची संवय लागणें फार सोपें आहे. पण उधळ्या मनुष्यास मितव्ययाची संवय लागणें फार कठीण आहे, म्हणून पूर्वापार चालत आलेल्या आपल्या

मितव्ययाच्या संबयीं फार उपयुक्त आहेत हें जाणून त्या मोठ्या काळजीनें रक्षिल्या पाहिजेत.

(अभंगचरण)

आलिया वाटांचें न मोडावे माग ।

—एकनाथ

(अभंगचरण)

जाळूं नये नाव पावलेनि पार । मागील आधार बहुतांचा ॥

—तुकाराम

आपला निर्वाह आपणांस फार थोड्या खर्चानें करितां येतो ही गोष्ट हल्लींच्या चढाओढीच्या काळीं आपणांस फार फायदेशीर आहे. ज्या राष्ट्रांतील लोक मितव्ययी आहेत त्या राष्ट्राची उन्नति केव्हां ना केव्हां झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

